नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २२० * * अमरावती * गुरुवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## सुनेत्रा पवारांनी घेतली पीएम मोदींची भेट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**
दिवंगत अजित पवार यांच्या पत्नी तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दोघांमध्ये जवळपास ४० मिनिटे चर्चा झाल्याची माहिती आहे. तत्पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि पदाधिकारी यांच्याशी जवळपास ३० मिनिटे पक्षाच्या ध्येयधोरणांवर चर्चा केली आहे.

सुनेत्रा पवार यांनी आज उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांचीही भेट घेत राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा सादर केल्याचे समजते. यापूर्वी राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्यासोबत त्यांची एक बैठक पार पडली.

## जमिनीचे कोडे सुटले




आज मंत्रिमंडळाने अनेक निर्णय घेतलेले आहेत. जे जनतेच्या हिताचे आहेत आणि लालफीतशाही पासून जनतेची सुटका करणारे आणि जनतेला वाचवणारे आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जनतेच्या मूलभूत प्रश्नांची जाण आहे लहान-सहान गोष्टीसाठी असो किंवा महत्त्वाच्या बाबींसाठी असो, वेळकाढूपणा करून अनेकदा तारखांवर तारीख देऊन जनतेची साधीसाधी कामे होत नाहीत ती लाल फितीमध्ये अडकून पडतात. अशाच महत्त्वाच्या कामांशी संबंधित अकृषक जमिनीचा वापर करण्यासाठी जे नियम आणि अटी, शर्ती आतापर्यंत निर्धारित करण्यात आलेल्या होत्या, त्यात आता महत्त्वाचे बदल करण्यात आलेले आहेत. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य शासनाने जमीन महसूल कायद्यात एक ऐतिहासिक सुधारणा केलेली आहे ती म्हणजे आता अकृषक किंवा बिगर शेती वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची अट रद्द करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनांमुळेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे अधोरेखित झाले आहे. यामुळेच मूळ जमीन मालकांना आता प्रशासनाकडे माराव्या लागणाऱ्या चकरांमधून सुटका मिळालेली आहे. जमिनीच्या वापराचे रूपांतर सुलभ, वेगवान आणि पारदर्शक होणार असल्यामुळे या बदलास मान्यता देण्यात आलेली आहे. या बदलांमध्ये एक खऱ्या अर्थाने गेमचेंजर ठरणारा मुद्दा म्हणजे जर एखाद्या जमिनीचा बांधकाम आराखडा म्हणजेच बिल्डिंग प्लॅन सुयोग्य आणि सक्षम प्राधिकरणाकडून मंजूर झालेला असेल. तर त्याला नॉन एग्रीकल्चर म्हणजेच बिगर शेती किंवा अकृषक परवानगी मानले जाणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात कुठल्याही प्रकारची सनद मिळवण्यासाठी अर्ज करण्याची गरज नाही. विशेष म्हणजे याची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्यात येणार आहे. यापूर्वी शेतजमिनीचे बिगर शेतीकरण करण्यासाठी अकृषक कर आकारण्यात येत होता. त्याऐवजी जमीन मालकांना जमिनीच्या क्षेत्रफळानुसार रूपांतरण अधिमूल्य फक्त एकदाच भरल्यावर ती जमीन अधिकृतपणे बिगर कृषी वापरासाठी रूपांतरण करण्यात येणार आहे. त्यामुळे दरवर्षीच्या कर भरण्याच्या कटकटीतून जनता खऱ्या अर्थाने मुक्त होणार आहे. या गोष्टीसाठी पूर्वी सहा महिने ते दोन ते अडीच वर्ष प्रतीक्षा करावी लागत होती. अनेक कागदपत्रांची पूर्तता करताना सामान्य नागरिकांना नाकीनऊ येत होते. मात्र या नवीन निर्णयामुळे प्रक्रियेतील बरेचसे अडथळे दूर झालेले आहेत. यामध्ये पारदर्शकता वाढल्यामुळे गैर व्यवहारांना आळा बसणार आहे आणि त्यासोबतच वैयक्तिक घर बांधणाऱ्या व्यक्तींसह रिअल इस्टेट क्षेत्रालाही याचा मोठा आर्थिक फायदा मिळून जाईल. या सर्वाचा एकूण विचार करता राज्य शासनाच्या किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जनताभिमुख धोरणामुळे आजचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे. जे काम केवळ एक अर्ज आणि त्यासाठी लागणारे सरकारी मूल्य यांनी होऊ शकते. त्यासाठी नायब तहसीलदारापासून जिल्हाधिकाऱ्यापर्यंत किंवा त्यापेक्षाही बड्या अधिकाऱ्यापर्यंत खेटे मारून चपला झिजवण्याचे कार्य सामान्य जनांना करावे लागत होते. मुख्यमंत्र्यांच्या दूरदर्शीपणामुळे यापुढे अकृषक म्हणजेच बिगर शेती जमिनीसाठी नव्या बदलामुळे तात्काळ मान्यता मिळणार आहे. वषार्नुवर्षे नको ते विषय चघळत बसण्यापेक्षा इतर महत्त्वाची कामे वेळ न दवडता होऊ शकत असतील, तर जनतेला विनाकारण आपल्या श्रम, शक्ती, वेळ आणि पैसा खर्च करण्याची गरज राहणार नाही. असा लोकांच्या फायद्याचा लोकोपयोगी निर्णय आतापर्यंत का घेण्यात आला नाही, हेच एक कोडे आहे. तरीही जे झाले ते झाले पण आता जे झाले आहे. म्हणजे जो आजचा निर्णय झाला आहे तो १००% जनताभिमुख निर्णय आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळाचे अभिनंदन केलेच पाहिजे. महाराष्ट्राला अशाच प्रकारचे व्यवहारी धोरणात्मक निर्णय गरजेचे आहेत. त्या दृष्टीने सरकारची सुरू असलेली घोडदौड निश्चितच अत्यंत कौतुकास्पद आहे, असेच म्हणावे लागेल.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## मुंबईच्या विकासासाठी सर्वतोपरी मदत

### मुंबईच्या महापौर आणि उपमहापौरांच्या स्वागतप्रसंगी मुख्यमंत्र्यांची ग्वाही

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :**
मुंबईच्या विकासाचा अजेंडा आता महापौर व उपमहापौरांना विचारला पाहिजे. आता त्यांचे काम त्यांना करायचे आहे. त्यांना जी मदत लागेल ती देण्याचे का आम्ही करू, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मुंबई महापालिकेच्या महापौर व उपमहापौरपदाच्या निवडणुकीची आज औपचारिकता पार पडली. महापौरपदी भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेविका रितू राजेश तावडे यांची, तर उपमहापौरपदी शिवसेनेचे संजय घाडी यांची नियुक्ती झाली. त्यांचे अभिनंदन आणि स्वागत करताना फडणवीस बोलत होते.

ते म्हणाले, मुंबई महापालिकेच्या महापौर व उपमहापौरपदी शिवसेना - भाजप महायुतीचे सदस्य विराजमान झालेत. महापौर सौ. रितू तावडे अनुभवी व अस्सल मराठी चेहरा आहेत. त्यांनी मागच्या काळातही मुंबईकरांच्या प्रश्नांसाठी नेहमीच आक्रमक भूमिका घेतली होती. मला विश्वास आहे की, त्यांच्या माध्यमातून मुंबईच्या विकासाचा कार्यक्रम यशस्वीपणे राबवला जाईल.



लोकशाहीला प्रशासकाचे राज्य अपेक्षित नाही. लोकप्रतिनिधींचे राज्य हे लोकशाहीला अपेक्षित आहे. ते राज्य पुन्हा एका प्रस्थापित झाले आहे. तो परिणाम यापुढे दिसून येईल, असे ते म्हणाले. उपमहापौरपदी संजय घाडी यांची निवड झाली आहे. त्यांच्याही अनुभवाचा फायदा हा निश्चितपणे होईल.

आमचा हा प्रयत्न असेल की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांना अपेक्षित अशा प्रकारचे प्रशासन या महापालिकेच्या माध्यमातून आम्ही चालवू.

आमचे महापौर, उपमहापौर व आमचे सर्व पदाधिकारी मिळून या महापालिकेला एक दिशा देतील. सामान्य मुंबईकरांची स्वप्न पूर्ण करण्याचे काम करतील. त्याला पूर्ण ताकद देण्याचे काम महायुतीचे काम करेल. मी व एकनाथ शिंदे पूर्ण ताकदीने त्यांच्या मागे उभे राहू. त्यांच्या माध्यमातून जे आपण नवी मुंबई घडवत आहोत, त्याला गती देण्याचे काम करू, असेही फडणवीस म्हणाले.

याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही महापौर, उपमहापौर यांचे स्वागत केले.

## अजितदादांचा पायलटच नव्हे तर विमानही बदलले

### पिंकी माळीच्या वडीलांचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**
दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा पायलटच नव्हे तर विमानही ऐनवेळी बदलण्यात आले होते, असा आरोप या दुर्घटनेत ठार झालेल्या फ्लाईट अटेंडन्ट पिंकी माळी यांच्या वडिलांनी केला आहे.

त्यांनी बारामतील येथील विमान दुर्घटना अपघात नव्हे तर घातपातच असल्याचा दावा केला आहे. अजित पवारांच्या मृत्यूविषयी ना-ना प्रकारचे तर्कवितर्क व्यक्त केले जात असताना पिंकी माळीच्या वडिलांनी हा आरोप केल्यामुळे राज्यात एकच खळबळ माजली आहे.

अजित पवार यांच्या विमानाचा गत २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळावर अपघात झाला होता. त्यात अजित पवार व पिंकी माळी यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर पिंकी माळी यांचे वडील शिवकुमार माळी यांनी हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा संशय व्यक्त केला आहे. ते म्हणाले, अपघाताच्या दिवशी फक्त वैमानिक नव्हे तर विमानही बदलण्यात आले होते. यापूर्वी पिंकी माळीने ४ वेळा अजित पवारांसोबत काळ्या व करड्या रंगाच्या विमानातून प्रवास केला होता. अपघाताच्या दिवशी मात्र त्यांना पांढऱ्या रंगाचे विमान देण्यात आले.

मुंबईतील वाहतूक कोंडीमुळे विमानाचा पायलट पोहोचू शकला नाही, हा दावाही शिवकुमार माळी यांनी खोडून काढला आहे. मुंबईत सकाळी ६ वाजता कोणत्या भागात ट्रॅफिक असते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

### तपास यंत्रणांचा तपास धिम्या गतीने

आमदार रोहित पवार यांनी आत दिल्लीत पत्रकार परिषद घेत अजित पवार यांच्या बारामतीतील विमान दुर्घटनेबाबत पुन्हा एकदा ठोस भूमिका मांडली. या अपघाताबाबत अनेक प्रश्न आम्ही उपस्थित केल्याचे सांगत राज्य आणि केंद्र सरकार तसेच तपास यंत्रणांकडून सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा आहे, असे ते म्हणाले.

दिल्लीतील प्रेस क्लबमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी सांगितले की, अजित पवार यांच्या पार्थिव देहात असामान्य सूज दिसून आली होती. आगीत मृत्यू झाल्यानंतर शरीरात सूज येऊ शकते, असे डॉक्टरांनी मान्य केले, मात्र सूज प्रमाणापेक्षा अधिक असल्याचे त्यांनी नमूद केले, अशी माहिती रोहित पवारांनी दिली.

## अजित पवारांच्या मृत्यूचे सत्य निश्चितपणे बाहेर येईल

### मुख्यमंत्र्यांचा ठाम विश्वास

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचे सत्य निश्चितच बाहेर येईल असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.

या प्रकरणी त्यांनी आमदार रोहित पवार यांना त्यांच्याकडील पुरावे तपास यंत्रणांना देण्याचे आवाहन केले आहे. अजित पवार आपल्या सर्वांचे लाडके नेते होते. त्यांच्या निधनाचे सत्य बाहेर यावे असे प्रत्येकाला वाटत आहे. या प्रकरणी योग्य तो तपास सुरू असून, सर्वांनी भारतीय तपास यंत्रणांवर विश्वास दाखवला पाहिजे. रोहित पवारांनीही त्यांच्याकडील पुरावे तपास यंत्रणांना दिले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, मी रोहित पवार काय बोलले हे मी ऐकले नाही. माझ्याकडे जी काही माहिती आहे, त्यानुसार त्यांनी काही प्रेझेंटेशन केले आहे. अजित पवारांच्या मृत्यूविषयी वेगवेगळ्या माध्यमांनी व लोकांनी ज्या शंका उपस्थित केल्यात, त्याच शंका त्यांनी उपस्थित केल्यात.

अजित पवार हे महाराष्ट्राचे लाडके व वरिष्ठ नेतृत्व होते. त्यामुळे त्यांच्या अपघाताची पूर्ण, सखोल व नीट चौकशी झाली पाहिजे. ही मागणी चुकीची नाही. मीच सर्वप्रथम ही मागणी केली होती. मी या प्रकरणी केंद्र सरकारला पत्र लिहून या अपघाताची योग्य प्रकारे चौकशी करावी असे सांगितले होते. यासंदर्भात जी काही चौकशी सुरू आहे ती पूर्ण न होता आपण तर्कवितर्क लढवले तर संभ्रम निर्माण होतो.

## मोदींनी देश विकायला काढला..

■ **वृत्तसंस्था नवी दिल्ली, दि. ११ :**
संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बुधवारी विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर अमेरिकेशी व्यापार कराराबाबत सुरू असलेल्या वाटाघाटीवरून टीका केली.



राहुल गांधी यांनी केंद्र सरकारने भारताचा वस्त्रोद्योग, शेतकरी, आयटी कर्मचारी आणि सुरक्षा दलाचा सौदा केल्याचा आरोप केला. इंडिया आघाडी सत्तेत असती, तर अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला बरोबरीने वागणूक दिली असती असेही गांधी म्हणाले.

या वक्तव्यावरून लोकसभेत बराच गदारोळ पहायला मिळाला. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात जोरदार खडाजंगी झाली.

राहुल गांधी आपल्या भाषणादरम्यान, एस्टिन फाईल, अनिल अंबानी आणि हरदीप पुरी यांचा देखील उल्लेख केला. त्यानंतर त्यांनी अमेरिकेसोबत अशा प्रकारची डील भारताच्या कुठल्याही पंतप्रधानांनी केली नसती असेही ते म्हणाले. नंतर सत्ताधारी खासदारांनी जोरदार गदारोळ केला. पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल यांनी राहुल गांधी यांना अर्थसंकल्पावर बोला असे म्हणत ही वक्तव्ये संसदेच्या पटलावरून काढण्यास सांगितले.

## १ कोटीची बनावट दारू जप्त

■ **महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ११ :**
गोवा आणि मध्यप्रदेशातील दारुची यवतमाळ जिल्ह्यात अवैधरीत्या विक्री होत असल्याच्या प्रकाराचा राज्य उत्पादन शुल्क विभागाने भंडाफोड केला. बनावट दारुची तब्बल तीन वाहने पकडण्यात आली असून त्यात वाहनांसह १ कोटी ५ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मात्र यातील तिन्ही आरोपी फरार झालेत. ही कारवाई मंगळवारी (दि. १०) मध्यरात्री राळेगाव ते अल्लीपूर रोडवरील कळमनेर फाटा येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने पार पाडली.

पथकाने राळेगाव ते अल्लीपूर रोडवरील कळमनेर या ठिकाणी सापळा लावला होता. त्यावेळी अशोक लेलॅंडच्या कंपनीच्या दहा चाकी कंटेनरची तपासणी करण्यात आली. त्यात प्रथमदर्शनी अंड्याचे कागदी कॅरेट ठेवल्याचे आढळून आले. मात्र पथकाने बारकाईने पाहणी केली असता अंड्याच्या कॅरेटच्या आडून गोवा व मध्यप्रदेशात तयार केलेल्या देशी विदेशी मद्याचे ६१३ बॉक्स दडवून ठेवल्याचे निदर्शनास आले.

त्याचवेळी टाटा कंपनीचे योद्धा १७०० हे मालवाहू वाहनही तपासण्यात आले. त्यात देशी मद्याचे ३० बॉक्स आढळून आले. ही तपासणी सुरु असतानाच तेथे दारु भरण्यासाठी तिसरे वाहनही आले. मात्र कारवाई सुरु असल्याचा संशय येताच संबंधित वाहन चालक भरधाव वाहन घेऊन वर्धा जिल्ह्याकडे पळाला. ही माहिती वरिष्ठांना कळवून पथकाने त्या तिस?्या वाहनाचा पाठलाग सुरु केला. शेवटी हे वाहन म्हणजेच किया कंपनीची सेलटॉस कार वर्धा जिल्ह्याच्या हद्दीत पकडण्यात आली. त्यातही देशी मद्याचे ४० बॉक्स आढळून आले. मात्र तिन्ही वाहनांतील चालक अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. ही कारवाई उत्पादन शुल्क विभागाचे उप आयुकत डॉ. पराग नवलकर, आयुक्त गणेश पाटील, नागपूर अधीक्षक शशिकांत गर्जे, यवतमाळ अधीक्षक नितेश शेंडे, वर्धा अधीक्षक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पी. एस. बोढारे यांच्या पथकाने पार पाडली .

## 'स्वस्त विजे'चे आश्वासन म्हणजे धूळफेक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**
राज्यातील जनतेला ५० टक्के स्वस्त वीज देऊ, असे आश्वासन देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रत्यक्षात जनतेची फसवणूक करत असून, वीज स्वस्त होण्याऐवजी १६ टक्क्यांनी महाग होणार असल्याचा आरोप काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे.

अदानी समूहाच्या फायद्यासाठी महाराष्ट्रातील सामान्य जनता आणि लघुउद्योजकांचे कंबरडे मोडण्याचा घाट सरकारने घातला असून, फडणवीसांनी यावर तातडीने खुलासा करावा, अशी आक्रमक मागणीही त्यांनी पत्रकार परिषदेत केली. टिळक भवन येथे बोलताना लोंढे यांनी महावितरण आणि राज्य सरकारवर प्रश्नांची सरबत्ती केली.

## उपचाराच्या नावाखाली डॉक्टरने बालिकेला अडीच लाखात विकले

■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ११ :**
स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने १० दिवसाच्या नवजात बालिकेला उपचारासाठी नागपूरला पाठवतो सांगून तिची अन्य व्यक्तीला अडीच लाखात विक्री करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाचा सूत्रधार गोंदिया येथील एक डॉक्टर असून त्याच्यासह पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आला आहे.

मोहाडी तालुक्यातील पांढराबोडी येथील मालती प्रकाश वाघमारे या महिलेच्या घरी दहा दिवसाची नवजात बालिका असल्याची माहिती महिला व बालकल्याण विकास विभागाच्या चाइल्ड हेल्पलाइनवर मिळाली. हेल्पलाइन समन्वयक महिला वाघमारे यांच्या घरी पोहोचल्या. तेथे त्यांना बालिका आढळून आली. गोंदिया येथून मुलीला आणले, असे मालतीने सांगितले.


दरम्यान अधिक चौकशीसाठी मालती वाघमारे हिला भंडारा येथे महिला बालकल्याण विभागात बोलविण्यात आले होते. मात्र ती उपस्थित झाली नाही. त्यामुळे चाईल्ड हेल्पलाइनच्या पथकाने ही माहिती मोहाडी पोलिसांना दिली. मोहाडी पोलीस वाघमारे यांच्या घरी पोहचले मात्र, महिला बालिकेला घेऊन चारचाकीने निघून घेल्याचे शेतकऱ्यांनी सांगताच पोलिसांनी नाकाबंदी करीत कुशारी फाटा येथे वाहन अडविले. वाहनात पूर्णिमा धुर्वे बालिकेसोबत सापडल्या.



बालिकेच्या अधिकृत माता-पित्या संदर्भात किंवा कागदपत्राच्या अनुषंगाने त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाही. सोबतच गोंदिया येथील एका डॉक्टरांच्या सांगण्यावरून आपण मुलीला गोंदियाला घेऊन जात असल्याचे त्यांनी सांगितले. बालिकेच्या खऱ्या आई वडिलांनी बाल कल्याण समिती पुढे येऊन जे सांगितले त्यावरून बाळ विक्रीचा प्रकार उघड झाला.

झालेली मुलगी तिसरे अपत्य होते. वेळेच्या आधीच जन्मास आल्याने, बाळाची तबेत बरी नव्हती. त्यामुळे गोंदिया येथील डॉ. नितेश बाजपेयी यांच्याकडे उपचारासाठी दाखल केले. उपचार करण्याइतपत पैसे नसल्याने एका स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून नागपूर येथे बाळाला उपचारासाठी पाठवतो असेल डॉक्टरांनी सांगितल्याचे आई-वडिलांचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात डॉक्टरांनी मुलीला उपचारासाठी नागपूरला न पाठवता हस्तक महिलेच्या मदतीने बाळाला मालती वाघमारे हिला विकले. यासाठी मालती हिने ललेश्वरी हिच्या खात्यात सौद्यातील अडीच लाखापैकी एका लाख धनादेशाद्वारे आणि उर्वरित रक्कम नगदी दिल्याचे समजते. यातील ललेश्वरी सादेपाच हिला अटक करण्यात आली असून डॉक्टर व त्याचे सहकारी फरार असल्याचे समजते.

तुमच्या बँकेकडून केवायसी अपडेट्चा अलर्ट आला आहे?
काळजी करू नका-केवायसी अद्ययावत ठेवल्याने अखंड बँकींग सेवांची निश्चिती होते.



तुमचे केवायसी अपडेट करणे नूडल्स बनवण्याइतके सोपे आहे!

कसे?

जर केवायसीमध्ये काहीही बदल नसेल किंवा फक्त पत्त्यामध्ये बदल असेल तर खालीलपैकी कोणत्याही प्रकारे केवायसी अपडेट करू शकता.

- नोंदणीकृत इमेल आयडी/मोबाईल नंबर
- ऑनलाईन बँकींग/मोबाईल बँकींग
- एटीएम
- बँकेचे व्यवसाय प्रतिनिधी
- पत्र इ.

केवायसी तपशीलात खालील दिलेल्या पर्यायांचा वापर करून बदल करू शकता,

- आधार ओटीपी आधारित इ केवायसी
- व्हिडीओ केवायसी (जिथे दिले जाऊ शकते)

किंवा

बँकेच्या शाखेकडे अपडेटेड **ऑफिशियली वैध दस्तावेज(ओव्हीडी)*** जमा करणे.

*ओव्हीडी: पासपोर्ट/ड्रायव्हिंग लायसन्स/व्होटर आयडी कार्ड/आधार कार्ड/ नरेगा जॉब कार्ड/नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर (एनपीआर) यांनी जारी केलेले पत्र

केवायसी आता जलद आणि सोपे झाले आहे
केवायसी फक्त बँक प्रमाणित चॅनल्सद्वारेच अपडेट करा

**तुम्हाला माहित आहे का?** एका बँकेमध्ये केलेले केवायसी अपडेशन तुमच्या इतर सर्व बँका/आर्थिक संस्थांमध्ये सीकेवायसीआरद्वारे अपडेट होते.

https://rbikehtahai.rbi.org.in
rbikehtahai@rbi.org.in
अधिकृत व्हॉट्सअॅप नंबर 99990 41935 / 99309 91935

जनहितार्थ जारी
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

# गेली २५ वर्षे मुंबईचा विकास ठप्प

## एकनाथ शिंदेंची उबाठावर टीका : आता फडणवीसांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामे सुरू

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :**
मुंबईकर गेल्या २५ वर्षांपासून विकासापासून वंचित होते, आणि शहराला जलद आणि व्यापक विकासाची आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महायुती सरकार मुंबईच्या विकासासाठी सातत्याने काम करत आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महापौर-उपमहापौर यांच्या निवडीनंतर माध्यमांशी बोलताना म्हटले आहे. तर मुंबईकरांच्या विकासासाठी महायुती सरकारने विविध उपक्रम राबवत असल्याचेही त्यांनी सांगितले.

एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते की झोपडपट्टी मुक्त मुंबई करायची त्यासाठी आम्ही ४० लाख लोकांना घरे देणार आहोत, याची सुरुवात एसआरएच्या माध्यमातून आम्ही केली आहे. मुंबईकरांनी महायुतीला कौल देत खऱ्या अर्थाने विकासाला स्वीकारले आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले की, महापौरपदी बिनविरोध रितू तावडे तर उपमहापौरपदी संजय घाडी यांची निवड झाली आहे त्यांचे मी अभिनंदन करतो. हे दोघेही अनुभवी नेतृत्व आहेत. गेल्या साडेतीन वर्षांमध्ये आम्ही मुंबईच्या विकासाला आम्ही चालना दिली त्यामुळे जनतेने आम्हाला निवडून दिले आहे. आमच्या आश्वासनावर आणि वचनावर मुंबईकरांनी विश्वास दाखवत त्यांनी आम्हाला निवडून दिले आहे.



**खड्डेमुक्त, भ्रष्टाचारमुक्त, प्रदूषणमुक्त मुंबई करणार**

एकनाथ शिंदे म्हणाले की, मुंबईकरांना विकास पाहिजे म्हणून त्यांनी महायुतीला स्वीकारले आहे. शहरातील नागरिकांना खड्डेमुक्त मुंबई पाहिजे, भ्रष्टाचारमुक्त, आणि प्रदूषणमुक्त मुंबई झाली पाहिजे. तर शुद्ध पिण्याचे पाणी नागरिकांना मिळाले पाहिजे, अशी भूमिका महायुतीची आहे.

महायुती सरकार या ध्येयासाठी कटिबद्ध असून, शहराच्या जागतिक स्तरावरील विकासासाठी राज्य सरकार आवश्यक ती मदत करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बाळासाहेब ठाकरे यांना अपेक्षित असलेली मुंबई महाराष्ट्र करेल.

महायुतीचे सरकार हे नियमबाह्य काम करत नाही. दोन्ही राष्ट्रवादीने विकासाला पाठिंबा दिला आहे त्यांना माहिती आहे महायुती विकास करत आहे, त्यांना विकास पाहिजे म्हणून ते आमच्यासोबत येत आहेत, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## माझ्या हत्येचा कट



■ **मुंबई :** भाजपचे माजी आमदार राम सातपुते यांनी आपल्या जीवाला धोका असल्याचा गंभीर दावा करत, आपल्या हत्येचा कट रचला गेल्याचे म्हटले आहे. या संदर्भात पोलिसांना आधीच गुप्त माहिती मिळाल्याने माळशिरस तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून पोलिसांनी तळ ठोकल्याची माहिती त्यांनी दिली. काही व्यक्तींना ताब्यात घेऊन चौकशी सुरू असल्याचे, तसेच त्यांच्या बँक व्यवहारांचीही तपासणी होत असल्याचे सातपुते यांनी सांगितले. हा प्रकार कॉन्ट्रॅक्ट किलिंग स्वरूपाचा असल्याचा संशय पोलिस आणि गुप्तचर यंत्रणांनी व्यक्त केल्याचे ते म्हणाले.

ग्रामविकास मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यापूर्वीच सातपुते यांच्या हत्येचा कट रचला गेल्याची माहिती मिळाल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर सातपुते यांनी माध्यमांशी संवाद साधत या विषयावर आपली भूमिका स्पष्ट केली. निवडणुकीच्या काळातच गुप्तचर विभाग आणि जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांना याबाबत काही माहिती मिळाली होती, त्यावरून तपास सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

## भाजपचा बंडखोरांना दणका

■ **पुणे :** भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरोधात बंडखोरी करणाऱ्या पुण्यातील ६९ पदाधिकाऱ्यांवर ६ वर्षे निलंबनाची कारवाई केली आहे.

राज्यात नुकत्याच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पार पडली. त्यात पक्षाने उमेदवारी नाकारल्यामुळे जवळपास सर्वच पक्षांना बंडखोरीचे ग्रहण लागले. विशेषतः भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात बंडखोरी उफाळून आली होती. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवणाऱ्या बंडखोरांवर ६ वर्षांच्या निलंबनाची कठोर कारवाई केली. या प्रकरणी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना अपक्ष किंवा इतर पक्षाच्या माध्यमातून निवडणूक लढवणाऱ्या कार्यकर्त्यांवर पक्षशिस्तीचा भंग केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

निलंबित पदाधिकाऱ्यांना ६ वर्षांपर्यंत पक्षाच्या कामकाजापासून दूर ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत त्यांना कोणतीही संघटनात्मक जबाबदारी किंवा पद दिले जाणार नाही. त्यांच्याविषयी कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नाही, असा कठोर संदेश या कारवाईच्या माध्यमातून भाजपने दिला आहे.

## काकूने केले पुतणीचे अपहरण

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि.११ :**
जिल्ह्यात युवती बेपत्ता होण्याचे, युवतींचे अपहरण किंवा फूस लावून पळवून नेण्याच्या घटनेत लक्षणीय वाढ झाली आहे. सिंदखेड राजा तालुक्यातील साखर खेर्डा या गावातील एका घटनेने याचा कळस गाठला आहे.

साखरखेर्डा येथील एका महिलेने चक्क आपल्या अल्पवयीन पुतणीचे अपहरण करुन तीचे परस्पर लग्नही लावून दिले. साखरखेर्डा पोलीस ठाण्याच्या एका पथकाने केलेल्या कारवाईतून हा प्रकार उघडकीस आला.

पोलिसांनी काकू आणि पुतणीच्या कथित पतीला उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातून जेरबंद केले आहे. साखरखेर्डा येथील एक अल्पवयीन मुलगी २९ डिसेंबर रोजी सायंकाळी घरातून अचानक बेपत्ता झाली होती. या प्रकरणी मुलींची आजी केसरबाई पारधे यांनी साखरखेर्डा पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता.

पोलिसांनी सदर बाब गांभीर्याने घेत तपासचक्रे फिरवली. तांत्रिक व गोपनीय माहिती काढून मीराबाई पारथे आणि शुभम पाटील याच्या जळगाव खांदेश येथून मुसक्या आवळल्या. आरोपींची कसून चौकशी केली असता, नात्याने काकू लागणाऱ्या मीराबाई पारथे हिने सदर मुलीला काळी-पिवळी वाहनाले चिखली येथे बोलावले. तेथून मुलीला सोबत घेऊन जळगाव खांदेश येथे नेले. तेथील शुभम विनोद पाटील या युवकासोबत तीचा विवाह लावून दिला. या व्यवसायात काकूने काही पैसे घेतल्याचे देखील पोलीस चौकशीत समोर आले आहे.

विशेष म्हणजे सदर महिलेचे गुजरात राज्यात अनेक व्यक्तींसोबत कनेक्शन असल्याचेही निष्पन्न झाले. या अगोदर अशाच प्रकारे काही मुलींना आपल्या जाळ्यात अडकवून तीने सदर मुलींचे इतर समाजातील गरजू मुलांसोबत लावल्याचे समजते. मुलीचे अन्य कोणी नव्हे तर नात्याने काकु असलेल्या महिलेने मुलीला पळवून नेत एका युवकासोबत तीचे लग्न लावून दिल्याचे तपासात उघड झाले आहे. आरोपी काकुसह एका युवकाला साखरखेर्डा पोलिसांनी जळगाव खांदेश येथून बेड्या ठोकल्या.

दरम्यान, त्यांना सिंदखेड राजा न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने काकूची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली असून, युवकाला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर गुन्ह्याचा तपास ठाणेदार गजानन करेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली साखरखेर्डा पोलीस करीत आहेत.

## काँग्रेसला लाज वाटली पाहिजे...

### संजय राऊत भडकले



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :**
चंद्रपूर महानगरपालिकेत घडलेल्या एका निर्णयाने राज्याच्या राजकारणात नवा वाद पेटला आहे. शिवसेना ठाकरे गटाने स्थानिक पातळीवर भाजपला पाठिंबा दिल्यानंतर सर्वत्र चर्चेला उधाण आले.

कोणत्याही परिस्थितीत भाजपसोबत जाणार नाही, अशी सातत्याने भूमिका मांडणाऱ्या ठाकरे गटाने चंद्रपूरमध्ये घेतलेली भूमिका काँग्रेसच्या टीकेचे कारण ठरली. मात्र, या टीकेला उत्तर देताना शिवसेना खासदार संजय राऊत यांनी थेट काँग्रेसवर हल्ला चढवला. चंद्रपूर महानगरपालिकेत २७ नगरसेवक निवडून आणूनही सत्ता मिळवता आली नाही, याची काँग्रेसला लाज वाटली पाहिजे, असे ते म्हणाले.

राऊत यांच्या मते, काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदांमुळेच ही परिस्थिती निर्माण झाली. ज्यांनी पाठिंबा द्यायचा होता, त्यांनाही वेगळा निर्णय घ्यावा लागला, असे सांगत त्यांनी शिवसेनेला दोष देण्यात अर्थ नसल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, स्थानिक राजकारणातील गुंतागुंत आणि काँग्रेसमधील दोन गटांतील संघर्ष यामुळे सत्ता हातातून गेली. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने घेतलेला निर्णय हा परिस्थितीजन्य होता, असा त्यांचा सूर होता.

दरम्यान, संजय राऊत यांनी हेही स्पष्ट केले की, स्थानिक पदाधिकाऱ्यांना भाजपसोबत कोणत्याही परिस्थितीत जाऊ नका, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. मुंबईत गेल्यानंतर या विषयावर सविस्तर चर्चा केली जाईल, असे त्यांनी सांगितले. म्हणजेच, पक्ष पातळीवर या निर्णयाचा आढावा घेतला जाणार असल्याचे संकेत त्यांनी दिले. चंद्रपूरमधील घडामोडी केवळ स्थानिक मर्यादेत राहिलेल्या नसून, त्याचे पडसाद राज्य पातळीवर उमटत असल्याचे चित्र दिसू लागले आहे.

काँग्रेसमधील संघर्षाचा उल्लेख करताना राऊत यांनी प्रतिभा धानोरकर आणि विजय वडेट्टीवार यांच्यातील मतभेदांवर बोट ठेवले. या दोन गटांतील संघर्षामुळेच काँग्रेसला सत्ता गमवावी लागली, असे ते म्हणाले.

## राज ठाकरेंनी मोदींच्या जवळ जावे!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका कार्यक्रमात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी संघाची भूमिका, कार्यपद्धती आणि समाजातील योगदान याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला चित्रपटसृष्टीतील काही नामांकित कलाकार उपस्थित राहिल्याने या कार्यक्रमाची चर्चा अधिकच रंगली. सलमान खान, रणबीर कपूर, विकी कौशल यांच्यासह इतर काही व्यक्ती कार्यक्रमात दिसल्याने सामाजिक आणि राजकीय पातळीवर प्रतिक्रिया उमटू लागल्या.



या उपस्थितीवरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर एक लांबलचक पोस्ट लिहित टीका केली.

राज ठाकरेंच्या या टीकेवर महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी प्रतिक्रिया दिली. नाशिकमध्ये माध्यमांशी बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत राज ठाकरे यांना उत्तर दिले. संघाच्या कार्यक्रमाला आलेले लोक मोदींना घाबरून आले नव्हते, असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी राज ठाकरे यांचा आदर असल्याचे नमूद करत, त्यांच्या विधानावर भाष्य केले.

कोश्यारी पुढे म्हणाले की, मला असे वाटते की राज ठाकरेच नरेंद्र मोदींना जास्त घाबरत आहेत. त्यांनी राज ठाकरेंना सल्ला देत म्हटले की, त्यांनी मोदींपासून घाबरू नये, उलट त्यांच्या जवळ जावे. मोदींसाठी सर्व जनता समान आहे, असे सांगताना त्यांनी राम आणि त्यांच्या प्रजेचा दाखला दिला. ज्या पद्धतीने रामाला सर्व प्रजा समान होती, मोदींसाठीही सर्व नागरिक समान आहेत, असे ते म्हणाले.

भगतसिंह कोश्यारी यांनी राज ठाकरे यांना लहान भाऊ संबोधत, ते कडक आणि चांगले नेते असल्याचेही म्हटले. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्मभूमीत राहणाऱ्यांनी घाबरण्याचे कारण नाही. चुकीचे काम करण्यास घाबरावे, पण व्यक्तींना घाबरू नये, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज ठाकरे यांच्या पोस्टला थेट उत्तर मिळाले.

या सर्व घडामोडींमुळे आरएसएसचा कार्यक्रम केवळ संघाच्या कार्याविषयी मर्यादित न राहता, तो राजकीय चर्चेचा विषय ठरला. मान्यवरांची उपस्थिती, राज ठाकरे यांची टीका आणि त्यावर कोश्यारींची प्रतिक्रिया यामुळे या कार्यक्रमाला वेगळीच राजकीय किनार मिळाली आहे. या विषयावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू असून, विविध स्तरांवर मतप्रवाह उमटताना दिसत आहेत.

## राज्यातील पहिल्या खाजगी 'पिल्लई विद्यापीठाचे' पनवेलमध्ये उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**
नवी मुंबई, पनवेल येथे 'पिल्लई विद्यापीठा'चे उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

हे राज्यातील पहिले खाजगी विद्यापीठ असून, महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील हे एक महत्त्वाचे आणि ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, आमदार महेश बालदी, नवी मुंबई महापालिका आयुक्त मंगेश चितळे, डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई, डॉ. डॅफ्ने पिल्लई यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.




कार्यक्रमात बोलताना मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, स्वायत्ततेचा अर्थ केवळ अधिकार नसून ती गुणवत्ता सिद्ध करण्याची आणि जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याची मोठी जबाबदारी आहे. १९७० साली अवघ्या २० विद्यार्थ्यांच्या साक्षीने 'महात्मा एज्युकेशन सोसायटी'ने लावलेले छोटेसे रोपटे आज ३० हजार विद्यार्थ्यांचे भविष्य उजळणा?या एका महाकाय वटवृक्षात रूपांतरित झाले आहे, अशा शब्दांत त्यांनी संस्थेच्या प्रगतीचे कौतुक केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' मधील संकल्पनांना मूर्त स्वरूप देत हे विद्यापीठ आता व्यवसायाभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षणावर विशेष भर देणार आहे. भविष्यात नवी मुंबईत ५ आंतरराष्ट्रीय विद्यापीठे स्थापन होणार असून, यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना मायदेशातच जागतिक दर्जाचे शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

पिल्लई विद्यापीठ हे ड्रोन तंत्रज्ञान, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (अक) आणि सायबर सुरक्षा यांसारख्या आधुनिक विषयांत संशोधनाला चालना देईल, असा विश्वासही पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

हे विद्यापीठ अभियांत्रिकी, वास्तुकला, व्यवस्थापन, कला आणि वाणिज्य या क्षेत्रांत उत्कृष्टतेचा मानदंड निर्माण करतानाच उद्योग-शिक्षण सहकार्यावर विशेष भर देणार आहे. बहुविषयक शिक्षण आणि नवोपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासह त्यांना उद्योजक म्हणून सक्षम करणे, हे या विद्यापीठाचे प्रमुख उद्दिष्ट असणार आहे.

## पार्थ पवारांचे नोटिसीला आव्हान

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ११ :**
दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ यांनी पुण्यातील मुंढवा येथे १८०० कोटी रुपयांची सरकारी जमीन ३०० कोटींतच खरेदी केली. विरोधकांच्या टीकेनंतर अजित पवारांनी व्यवहार रद्द केला. नियमानुसार असा व्यवहार रद्द करण्यापूर्वी २१ कोटी रुपये मुद्रांक शुल्कापोटी भरावे लागतील, अशी नोटीस पार्थ यांना बजावली होती. त्याला पार्थच्या मालकीच्या अमेडिया कंपनीने आव्हान दिले आहे.

महाराष्ट्र नोंदणी विभागाने अमेडिया व पार्थ यांचे भागीदार यांना १० फेब्रुवारीपर्यंत रक्कम भरण्याची नोटीस बजावली होती. पार्थ यांनी बरोबर १० फेब्रुवारी रोजीच या आदेशवजा नोटिसीला आव्हान दिले आहे. त्यावर आता महानिरीक्षक नोंदणी (आयजीआर) यांच्यासमोर सुनावणी होईल, असे विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मात्र, पार्थ यांनी कोणत्या मुद्द्यांच्या आधारे नोटिसीला आव्हान दिले आहे.

**बँक खाते जप्तीचा अधिकार**

समजा नोंदणी महानिरीक्षकांसमोरील सुनावणीत पार्थ यांचे अपील फेटाळले गेले तरीही त्यांनी रक्कम भरण्यास नकार दिला तर काय? या प्रश्नावर तज्ज्ञांनी सांगितले की, अशा प्रकरणात महसूल वसूल करण्याचा अधिकार सरकारला आहे. ज्यामध्ये बँक खाते जप्त करणे आणि स्थावर मालमत्ता जप्तीच्या निश्चित प्रक्रिया आहेत. फक्त त्याचा किती प्रभावाने वापर करायचा याचा निर्णय मंत्रीस्तरावर होऊ शकतो.

## माळी महासंघाचे तीव्र निषेध आंदोलन

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ११ :**
तेलंगणा राज्यातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर गावात क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ पुणे शहरात माळी महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी माळी समाज बांधव आणि फुले प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आंदोलनात माळी महासंघ पुणे शहर अध्यक्ष दीपक जगताप, महिला अध्यक्ष स्मिता लडकत, नाना कुदळे, बाळासाहेब लडकत, सोमनाथ बटवाल, यशोधन आखाडे, चांगदेव पिंगळे, शशिकला ढोले पाटील, राजेंद्र लडकत, प्रज्वल बनकर, रीमाताई लडकत, गिरीश झगडे, रवी सहाणे, प्रतिभा झगडे, विजय कोठावळे, अभिजीत भुजबळ, शांताताई नेवसे, मारुती भुजबळ, सारंग राऊत आणि गणेश वाडकर यांच्यासह अनेक समाजबांधव व फुले प्रेमी सहभागी झाले होते.

आंदोलकांनी ही घटना अत्यंत निंदनीय असल्याचे म्हटले. समाजकंटकांनी केलेल्या या हीन कृत्याचा आणि त्यात सहभागी असलेल्यांचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी, ही केवळ महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना नसून, त्यांच्या सामाजिक विचारांवर आणि समतेच्या मूल्यांवर केलेला हल्ला असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

माळी महासंघ पुणे शहर अध्यक्ष दीपक जगताप यांनी यावेळी बोलताना सांगितले की, महात्मा फुले यांनी पुणे शहरातून शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिला शिक्षणासाठी मोठे योगदान दिले. अशा महान व्यक्तिमत्त्वाच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्यांचा आम्ही निषेध करीत असल्याचे जगताप यांनी यावेळी सांगितले.

## सूर्यदत्तचे शैक्षणिक, सामाजिक कार्य हा प्रबोधनाचा प्रभावी मार्ग

### माजी सरन्यायाधीश उदय लळीत यांचे गौरवोद्गार : २८ व्या स्थापनादिनी सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कारांचे वितरण

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ११ :**
समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना एकाच व्यासपीठावर सन्मानित करण्याची संधी म्हणजे समाजाच्या प्रबोधनाचा प्रभावी मार्ग आहे. कला, क्रीडा, विज्ञान, अर्थशास्त्र, लेखा, प्रशासन आदी विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा समावेश असलेला हा समाजाचा विविधांगी प्रेरणादायी कार्यक्रम अनुभवता आल्याचे समाधान आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश उदय लळित यांनी केले.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' व सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' वितरण समारंभात उदय लळीत बोलत होते. बाणेर येथील बंटारा भवनमध्ये झालेल्या समारंभावेळी माजी केंद्रीय निवडणूक आयुक्त टी. एस. कृष्णमूर्ती, भारतीय जनता पार्टीचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम जाजू, एअरमार्शल (निवृत्त) भूषण गोखले, एमआयटीचे अधिष्ठाता प्रा. डॉ. शरदचंद्र दराडे, 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, स्नेहल नवलखा, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया आदी उपस्थित होते.



पद्मश्री परमपूज्य आचार्य डॉ. चंदना महाराज (ताई माँ) यांना 'सूर्यदत्त ग्लोबल पीस गांधीयन फिलॉसॉफी अवॉर्ड २०२६', तर माजी सरन्यायाधीश उदय लळित यांच्यासह ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, विठ्ठल काटे, माजी सनदी अधिकारी शेखर गायकवाड, अभिनेते राकेश बेदी, बांधकाम व्यावसायिक विलासकुमार पालरेषा, दिग्दर्शक सुभाष सेहगल, अशोककुमार ठाकूर, शास्त्रज्ञ डॉ. आनंद भाडळकर, विधिज्ञ ॲड. प्रमोद आडकर, प्रा. सुरेखा कटारिया, उद्योजक प्रकाश गांधी यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे महेश सूर्यवंशी, योगसद्गुरू डॉ. कृष्णदेव गिरी, अभिनेत्री व स्टँडअप कॉमेडियन उपासना सिंग, भारतीय बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर अभिजित कुंटे, सर्वोच्च न्यायालयातील वकील ॲड. आशुतोष श्रीवास्तव, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुरेंद्रा कुमारी, योग प्रशिक्षक राखी गुगळे, अवकाशशास्त्रज्ञ डॉ. कनक सहा, बासरीवादक पारस नाथ, ग्लोबल युथ अँबेसेडर दारासिंग खुराणा, डॉ. प्रमोद त्रिपाठी, गियारोहक आशिष माने यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार', सीए मोहित धांड, गायिका प्रीती दवे व पिंकी दवे, जलतरणपटू हातवी शहा यांना 'सूर्यदत्त नॅशनल यंग अचिव्हर अवॉर्ड', तर मास्टर ऋषी शिव प्रसन्न आणि मास्टर राघव मालपाणी यांना 'सूर्यदत्त लिटल मास्टर नॅशनल अवॉर्ड' देण्यात आला.

उदय लळीत म्हणाले, यशस्वी होऊ की नाही, हा प्रश्न प्रत्येक तरुणाच्या मनात असतो. मात्र स्वतःवरचा विश्वास, सातत्यपूर्ण मेहनत आणि कामातील उत्कृष्टता यामुळेच यशाचे टप्पे गाठता येतात. भारताची लोकसंख्या तरुण असून ३५ वर्षांखालील नागरिकांचे प्रमाण लक्षणीय आहे. हे मनुष्यबळ सक्षमपणे घडवणे हे राष्ट्रनिर्मितीतील मोठे कार्य आहे.

अशोक सराफ म्हणाले, वेगवेगळ्या क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या व्यक्तींना समोर आणून सन्मानित करण्याचा चोरडिया दाम्पत्याचा हा उपक्रम समाजाला प्रेरणादायी आहे. माज्या प्रवासात निवेदिताची मोलाची साथ लाभली. चांगले झाले तर कौतुक आणि काही चुकले तर स्पष्टपणे सांगणाऱ्या निवेदिता आणि माझ्या सहवासाची ३७ वर्षे झाली. सभागृहात उपस्थित प्रत्येकाची साथ मला लाभली. तुम्हा प्रेक्षकांच्या पावतीमुळेच काम करताना हुरूप येतो आणि आणखी जोमाने काम करता येते.

प्रास्ताविकात प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, सूर्यदत्त शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर दिला आहे.

चांगला नागरिक घडवण्यासाठी समाजातील आदर्श व्यक्तिमत्त्वांना विद्यार्थ्यांसमोर आणले जाते. उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त पुरस्काराने सन्मानित केले जाते.

एअरमार्शल भूषण गोखले म्हणाले, आपण कितीही यशाची शिखरे गाठली, तरी मातीशी नाळ जोडून ठेवायला हवी. शिक्षणसंस्था चालवण्यासह सामाजिक कार्यातही सक्रिय राहून सूर्यदत्त परिवाराने आदर्श निर्माण केला आहे. मूल्याधिष्ठित, समाजहिताचे शिक्षण नव्या पिढीला घडवण्यासाठी उपयुक्त आहे.

प्रा. शरदचंद्र दराडे यांनी सूर्यदत्त संस्थेच्या प्रगतीचे कौतुक करीत आपल्या विद्यार्थ्याने केलेल्या या कार्याचा आनंद वाटतो, असे नमूद केले. सर्व पुरस्कारार्थींनी सत्काराला उत्तर दिले. श्वेता राठोड व संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सुषमा चोरडिया यांनी आभार मानले.

## एस.टी. प्रवासाचा नवा डिजिटल पॅटर्न

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सुविधेसाठी आणि पारदर्शकतेसाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे.

एस.टी. महामंडळाच्या प्रवासात आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एन.सी. एम. सी) प्रणाली लागू करण्यात येणार असून, विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे कार्ड आता अनिवार्य असेल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

या निर्णयामुळे एस.टी.चा प्रवास आता 'डिजिटल' होणार असून, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविरहित व्यवहारांना गती मिळणार आहे. महामंडळाने मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि एन.एस.डी. एल. पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला असून, लवकरच सर्व आगारांमध्ये नोंदणी मोहीम सुरू होणार आहे. प्रमुख लाभार्थी आणि नोंदणी प्रक्रिया या योजनेत समाजातील सर्व घटकांचा विचार करण्यात आला आहे.

**विद्यार्थी:** शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सरल क्रमांकाशी जोडलेले कार्ड मिळेल.

**ज्येष्ठ नागरिक व महिला:** अमृत ज्येष्ठ, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना 'आधार' संलग्न कार्ड दिले जाईल.

**दिव्यांग:** युडीआयडी क्रमांकाचा वापर करून विशेष सुविधा असलेले कार्ड प्राप्त होईल.

**पुरस्कारार्थी, पत्रकार:** स्वातंत्र्यसैनिक आणि अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना विभागीय कार्यालयामार्फत कार्डाचे वितरण केले जाईल.

प्रवाशांना हे कार्ड सहज उपलब्ध व्हावे यासाठी सवलतीचा दरही निश्चित करण्यात आला आहे. नवीन कार्डसाठी १९९ रुपये मोजावे लागतील. मात्र, ज्यांच्याकडे जुने स्मार्ट कार्ड आहे, त्यांना ते जमा केल्यास केवळ १४९ रुपयांत नवीन कार्ड मिळेल.

**रिचार्ज :** कार्डमध्ये किमान १०० रुपये शिल्लक ठेवणे आवश्यक आहे. ५० रुपयांच्या पटीत ईटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ किंवा मोबाईल ॲपवरून रिचार्ज करता येईल.

ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी राज्यभरात ३००० हून अधिक अधिकृत एजंट नियुक्त करण्यात आले आहेत.

बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारे पाऊल असल्याचे प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# कालव्याच्या फॉलमध्ये ‘पेटता’ मृतदेह!

## शहानूर धरण परिसर हादरला; हत्या करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न?



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.11 )** – शहानूर धरणाच्या पायथ्याशी असलेल्या जहानपूर (वाघडोह) शेतशिवारात आज सकाळी उघडकीस आलेल्या भीषण घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरले आहे. कालव्याच्या फॉलमधील विहिरीसारख्या खोल खड्डयात अर्धवट जळालेल्या अवस्थेतील एका अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने नागरिकांत एकच खळबळ उडाली.

सकाळी साडेसातच्या शेतकरी जनार्दन गभणे हे सकाळी साडेसातच्या सुमारास शहानूर धरणावरून खोडगाव पांढरीकडे जाणाऱ्या कालव्यालगत नितीन केशवराव बडवाईक यांच्या शेतात पिकावर फवारणीसाठी गेले होते. यावेळी त्यांना कालव्याच्या फॉलमधून धूर निघताना दिसला. उग्र वासामुळे संशय बळावल्याने त्यांनी जवळ जाऊन पाहणी केली असता अंगावर काटा आणणारे दृश्य समोर आले, फॉलच्या खड्डयात मृतदेह जळत होता! काही तासांपूर्वीच मृतदेह पेटविण्यात आल्याचा कयास व्यक्त केला जात आहे. माहिती मिळताच पथ्रोट पोलीस ठाण्याचे ठाणेदार अभय चौथणकर घटनास्थळी दाखल झाले. पंचनाम्यात मृतदेहाच्या डोक्याला मार लागल्याच्या खुणा तसेच हातापायांवर बांधल्याच्या खुणा आढळल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे हा प्रकार अपघाती नसून नियोजनपूर्वक घडविण्यात आल्याचा संशय गडद झाला आहे.

### घटनास्थळी ‘संशयास्पद’ठसे

घटनास्थळी चारचाकी वाहनाच्या टायरचे ठसे आढळले. तसेच मृतदेह जाळण्यासाठी ज्वलनशील पदार्थ (ऑइल) वापरल्याचे डाग दिसून आल्याने प्रकरण अधिकच गूढ बनले आहे.



### ‘आंबट शौकीनांचा अड्डा’ चर्चा

दरम्यान, शहानूर जलाशय परिसर हा आंबट शौकीन आणि प्रेमी युगुलांचा अड्डा बनत असल्याची चर्चा स्थानिक नागरिकांत रंगत आहे. या पार्श्वभूमीवर घटनेमागे काही काळेबेर असावे, अशी दाट शंका व्यक्त केली जात आहे. शांत व निर्जन मानल्या जाणाऱ्या शहानूर परिसरात उघडकीस आलेल्या या धक्कादायक प्रकाराने नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या रहस्यमय मृत्यूमागील सत्य काय, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### हत्या करून पुरावे नष्ट?

तरुणाची हत्या करून मृतदेह जाळण्याचा प्रयत्न झाला असावा का, या प्रश्नाने परिसरात चर्चांना उधाण आले आहे. मात्र पोलिसांनी अधिकृत पुष्टी करण्यास टाळाटाळ केली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे तसेच फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून ओळख पटविणे हे पोलिसांसमोरील सर्वात मोठे आव्हान ठरत आहे. दरम्यान, शांत मानल्या जाणाऱ्या शहानूर परिसरात उघडकीस आलेल्या या धक्कादायक प्रकाराने नागरिकांत प्रचंड भीती निर्माण झाली आहे. सत्य काय उघड होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



ध्येयाकडे धाव....







**अमरावती–** पोलीस बनण्याच्या ध्येयाकडे धाव घेत अमरावती ग्रामीण पोलिस भरतीच्या पहिल्याच दिवशी (11 फेब्रुवारी 2026) शारीरिक चाचणीसाठी बोलाविण्यात आलेल्या 800 पैकी 575 उमेदवारांनी आपली उपस्थिती लावली. तर 225 गैरहजर होते. हजर उमेदवारांपैकी 526 उमेदवारांची यशस्वीरित्या शारीरिक चाचणी झाली, तर उर्वरित 49 उमेदवार शारीरिक मोजमाप व कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरले.

# सोन्याचे दागिने चोरी प्रकरणात डॉक्टरसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )** – शहरातील पीडीएमसी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झालेल्या महिलेच्या गळ्यातील सुमारे 80 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचा गंभीर आरोप करण्यात आले होते. या प्रकरणी ड्युटीवरील डॉक्टरसह दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवी वस्ती, बडनेरा येथील रहिवासी अनिल गणपत श्रीरामवार (वय 52) यांनी तक्रार दाखल केली होती. त्यांची पत्नी नलिनी अनिल श्रीरामवार यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना सुरुवातीला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचाराचा खर्च परवडण्यासारखा नसल्याने त्यांना पीडीएमसी रुग्णालयात हलविण्यात आले. पीडीएमसी रुग्णालयाच्या आयसीयू विभागात डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी नलिनी यांच्यावर उपचार सुरू केले. काही तासांनंतर डॉक्टरांनी त्यांच्या मृत्यूची माहिती पती अनिल यांना दिली. मृतदेह कपड्यात गुंडाळण्याची प्रक्रिया सुरू असताना पती तेथे पोहोचले असता, पत्नीच्या कानातील 80 हजार रुपये किमतीचे सोन्याचे टॉप्स गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत उपस्थित कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यामुळे ड्युटीवरील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी दागिने चोरल्याचा संशय व्यक्त करत अनिल श्रीरामवार यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी डॉ. श्रेयस पटवारी यांच्यासह अन्य दोन व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# कर्तव्यावर जाताना मुख्याध्यापकाचा हृदयविकाराने मृत्यू



### कार पठार मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी (दि. 11)** – विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी आयुष्य वाहणाऱ्या एका शिक्षकावर मंगळवारी काळाने अचानक झडप घातली. राजनीकुंड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुनिल झारखंडे (रा. परतवाडा) यांना शाळेत जात असताना तीव्र हृदयविकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकस्मात जाण्याने शिक्षण क्षेत्रात शोककळा पसरली असून शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ हळहळ व्यक्त करत आहेत. मंगळवारी सकाळी सुमारे 9 वाजता सुनिल झारखंडे हे परतवाडा येथील राहत्या घरातून मध्य प्रदेशातील सावलमेडा–जडवाली–गारपठार मार्गे राजनीकुंड येथील शाळेत दुचाकीवरून जात होते. गारपठार रस्त्यावर अचानक त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला. झटका इतका तीव्र होता की ते दुचाकीवरून खाली कोसळले आणि रस्त्यावरच बेशुद्ध पडले.

रस्त्याच्या कडेला शेतात काम करणाऱ्या एका शेतकऱ्याच्या ही घटना लक्षात आली. त्यांनी तत्काळ मध्यप्रदेशातील भैसदैही पोलिस ठाण्याला माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन झारखंडे यांना भैसदैही येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

सुनिल झारखंडे हे कर्तव्यदक्ष, प्रेमळ आणि विद्यार्थ्यांसाठी सदैव झटणारे शिक्षक म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या अचानक जाण्याने राजनीकुंड, बामादेही, काटकुंभ परिसरात शोककळा पसरली आहे. शाळेतील विद्यार्थी, सहकारी शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी त्यांच्या निधनावर तीव्र दुःख व्यक्त केले आहे. कर्तव्यावर जाताना शिक्षकाचे असे अकाली जाणे संपूर्ण शिक्षण क्षेत्रासाठी मोठी हानी मानली जात आहे

# महानगरपालिकेत शिवसेना (शिंदे) -बसपा स्वतंत्र आघाडीची स्थापना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )** – अमरावती महानगरपालिकेच्या राजकारणाला सोमवारी अनपेक्षित वळण मिळाले. राज्यात महायुती सरकारचा भाग असलेल्या शिवसेना (शिंदे गट) आणि विरोधी भूमिका निभावणाऱ्या बहुजन समाज पक्षाने (बसपा) महापालिका पातळीवर स्वतंत्र आघाडी स्थापन केली आहे. या नव्या आघाडीला शिवसेना–बसपा आघाडीअसे नाव देण्यात आले असून, विभागीय आयुक्त कार्यालयात अधिकृत नोंदणी करण्यात आली आहे.

या आघाडीमध्ये प्रत्येकी 3 नगरसेवक सहभागी झाले आहेत. शिवसेना (शिंदे गट) चे डॉ. राजेंद्र तायडे गटनेतेपदी नियुक्त करण्यात आले आहेत. विभागीय आयुक्त नितीन कापडणीस यांनी आघाडीची



अधिकृत नोंदणी केली असल्याचे सांगितले. महानगरपालिकेच्या स्थापनेवेळी शिवसेना (शिंदे) ने महायुतीला पाठिंबा दिला होता, तर बसपा विरोधी बाकावर होती. त्यामुळे ही नवीन आघाडी शहरातील राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. तज्ज्ञांच्या मते, या आघाडीमुळे महापालिकेतील सत्ता समीकरण बदलण्याची शक्यता आहे आणि आगामी राजकीय हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेना (शिंदे) कडून स्नेहा आशिष लुल्ला (प्रभाग 7, जवाहर स्टेडियम), डॉ. राजेंद्र तायडे (प्रभाग 20, सुतागिरीणीङ्कसामरा नगर), मंजुषा जाधव (प्रभाग 19, साईनगरङ्कअकोली) तर बसपाकडून विद्या मते, इस्माइल कासम लालुवाले, सचिन किसनराव वैद्य (प्रभाग 11, रुक्मिणी नगर) हे नगरसेवक म्हणून निवडूण आले आहे.

# दोन ठिकाणी अवैध सावकारीविरोधी धाडी

## अनेक महत्वपूर्ण दस्तावेज घेतले ताब्यात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.11 )**– सहायक निबंधक, सहकारी संस्था दर्यापूर यांच्या कार्यालयात प्राप्त तक्रारिच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार (सहकारी संस्था) यांच्या आदेशावरुन शहरात फ्रेजरपूरा व वडाळी या दोन ठिकाणी अवैध सावकार विरोधी कारवाई मंगळवारी करण्यात आली.

पहिल्या पथकात प्रमुख असलेले किशोर बलीगे (सहायक निबंधक सहकारी संस्था दर्यापूर), चंद्रशेखर मुळे, सुश्मिता सुपले, अमोल लोमटे, पंच नितीन वाधाळे व कौस्तुभ गोरडे, तसेच फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी मनोज काळपांडे व माधुरी अंभोरे यांनी शक्तीसिंह विरेंद्र दिक्षीत (रा. गगलानी नगर, वडाळी, अमरावती) यांच्या घरी धाड टाकून झडतीची कार्यवाही केली. सदर कार्यवाहीमध्ये पथकास अवैध सावकारी संबंधाने 05 संशयास्पद दस्तऐवज प्राप्त झालेले आहे. त्यामध्ये 02 कोरे धनादेश, स्थावर मालमत्ता खरेदीखत, असे दस्तऐवज धाड पथकाने जप्त केलेली आहे.

तर दुसऱ्या पथकात प्रमुख किशोर इंगळे (सहायक निबंधक सहकारी संस्था चांदुर रेल्वे), अविनाश महल्ले, चेतना कुचे, नरेंद्र आगरकर, पंच गौरव घाटोळ व ईश्वर कंठाळे तसेच फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी सूरज यादव व मालू चापरे यांनी सुमंत अरविद पाटील (रा. कांग्रेस नगर, अमरावती) यांच्या घरी धाड करुन येथून 14 संशयास्पद दस्तऐवज प्राप्त केले. त्यामध्ये 02 कोरे धनादेश, स्थावर मालमत्ता खरेदीखत, असे दस्तऐवज धाड पथकाने जप्त केलेली आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.

# चार वर्षाच्या बालिकेवर यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट

## सार्वजनिक आरोग्य विभागातील तिसरी यशस्वी शस्त्रक्रिया

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )**– विभागीय संदर्भ सेवा (सुपर स्पेशालिटी ) रुग्णालयामध्ये चार वर्षाच्या बालिकेवर अत्यंत महत्त्वपूर्ण व आव्हानात्मक कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ही शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागातील तिसरी यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट सर्जरी ठरली असून, बालिकेला नव्या ऐकू येण्याच्या जगाची दारे खुली झाली आहेत.

सदर रुग्ण 4 वर्षाची असल्याने महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजने मार्फत उपचार



मिळू शकत नव्हता. त्यामुळे या शस्त्रक्रियेसाठी संपूर्ण निधीची उपलब्धता अमरावती जिल्हा नियोजन समिती मार्फत करण्यात आली आहे. सदर रुग्ण ही आष्टी जि. वर्धा येथील रहिवाशी असून जन्मत: ती ऐकण्यास अक्षम होती. रुग्ण 9 महिन्यांची झाल्यानंतर तिच्या कुटुंबियांना समजले की ती ऐकू शकत नाही. रुग्णाचे नातेवाईक नागपूर येथील खासगी रुग्णालयात सोबत इतर रुग्णालयात उपचार घेण्यास गेले होते. मात्र, आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने तेथे उपचार घेणे शक्य नव्हते. अखेर प्रसार माध्यमांमध्ये सूपर स्पेशालिटी रुग्णालयातील कॉक्लियर इंप्लांटच्या झालेल्या यशस्वी शस्त्रक्रिया बघून रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्णास सूपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती येथे आणले. सूपर स्पेशालिटी रुग्णालयात रुग्णाच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या व शेवटी 05 फेब्रुवारी रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रिये मधे अत्याधुनिक तंत्रज्ञान जसे स्मार्ट नेव व कन्व्हेंशनल या तंत्रज्ञानाचा वापर करून शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. ही जटिल शस्त्रक्रिया रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयातील इ.एन.टी विभागप्रमुख डॉ जीवन वेदी, डॉ. रितेश शेलकर व सूपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे विशेष कार्य अधिकारी तसेच इ.एन.टी सर्जन डॉ मंगेश मेंढे , डॉ. अनिता पटवरकर, न्यूरो फिजिशियन डॉ अनिता अंभोरे, पीडियाट्रिशियन डॉ ऋषिकेश नागलकर, ऑडियोलॉजिस्ट लक्ष्मण मोरे, बधिरीकरण तज्ञ डॉ.बाळकृष्ण बागवाले, डॉ. दिपाली देशमुख, डॉ. शीतल सोळंके, डॉ. अश्विनी मढावी, डॉ. रमणिका ढोमणे यांच्या मार्फत करण्यात आली.

### रॉप्टरने मारहाण केल्याने एक जखमी

**अमरावती** – चांदूर रेल्वे पोलीस ठाणे हद्दीतील मांडवा येथे रॉप्टरने मारहाण केल्याने एक जण जखमी झाले. ही घटना 8 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. माहितीनुसार, वीरेंद्र सोनोने (वय 35) यांच्यावर दीपक देवकिसन ठुणकुळे याने रॅप्टरने मारहाण केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात वीरेंद्र सोनोने जखमी झाले. याप्रकरणी नीलिमा सोनोने यांच्या तक्रारीवरून दीपक ठुणकुळे याच्याविरुद्ध चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रेल्वेत अज्ञात मृतदेह आढळले

**अमरावती** – रेल्वेगाडीमध्ये अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला. ही घटना सोमवारी सायंकाळी 7.30 वाजताच्या सुमारास बडनेरा रेल्वे पोलिसांच्या लक्षात आली. शालीमार एक्स्प्रेसच्या एक कोचच्या दाराजवळ इसम बेशुद्धवस्थेत पोलिसांना आढळून आला.

# दुचाकीची धडक लागण्याच्या कारणाहून हत्या

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ,( दि.11 )** – नांदगाव पेठ पोलीस स्टेशन हद्दीत एक धक्कादायक खुनाची घटना उघडकीस आली आहे. परिसरात मोटर सायकलला कट लागल्याच्या कारणावरून अज्ञात ट्रिपल सीट गाडीवरील तीन आरोपींनी चाकूहल्ला केला. या घटनेत जखमीमध्ये सौरभ सुधाकरराव घोटेकार (वय 30, अंजनगाव सुर्जी) आणि त्याचा मोठा भाव गौरव सुधाकरराव घोटेकार (वय 33, अंजनगाव सुर्जी) यांचा समावेश आहे. यामध्ये गौरवचा मृत्यू झाला. तर सौरभवर सध्या उपचार सुरू आहे. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यामध्ये आरोपींचा शोध सुरू आहे. स्थानिक लोकांमध्ये घटना पसरल्यानंतर भीतीचे वातावरण पसरले आहे.

# मुंबई काँग्रेसला संजिवनी कधी मिळणार?

ठाकरेंची शिवसेना आणि मोदी शहांची भाजपा यांच्यातील मुंबईत लढत देताना काँग्रेसची दमछाक होते आहे. ठाकरे बंधुंनी एकत्र येऊन विरोधी बाकांवर पुरेशी जागावर पुरेशी जागा तरी मिळवली. काँग्रेसने प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजनशी युती करूनही त्याचा अपेक्षित लाभ दोन्ही पक्षांना झाला नाही. एवढेच नव्हे तर काँग्रेसची मुंबई महापालिकेत सर्वात खराब कामगिरी यंदाच्या निवडणुकीत बघायला मिळाली. महापालिकेच्या २२७ जागा वंचितशी युती करून लढवल्या तरी जेमतेम २४ जागांवर नगरसेवक निवडून आणताना काँग्रेसला घाम फुटला.

------------

निवडणूक प्रचारात ठाकरे बंधुंचा व महायुतीचा ( भाजपा व शिंदेंची शिवसेना ) धुमधडाका चालू असताना काँग्रेस कुठे दिसत नव्हती. काँग्रेसच्या सभा कुठे नाहीत, जाहीर सभा नाहीत किंवा कुठे रोड शो झाले नाहीत.

भाजपाच्या प्रचारासाठी विविध प्रांतांतील भाषिक नेते मुंबईत आले होते. पण काँग्रेसच्या प्रचारासाठी अन्य राज्यातून कुमक आली नाही किंवा काँग्रेसचे स्टार प्रचारकही फिरताना दिसले नाहीत. प्रचाराची आखणी आणि रणनिती यामधेही काँग्रेसची कुठे चमक दिसली नाही. राज्यावर व देशावर अनेक वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या एका राष्ट्रीय पक्षाची मुंबईत दयनिय अवस्था झाली आहे.

मुंबई काँग्रेसचे अध्यक्षपद वर्षा गायकवाड यांच्याकडे आहे. त्यांचे वडिल एकनाथ गायकवाड हे मुंबई काँग्रेसचे आघाडीचे नेते होते. पक्षाचे मुंबईचे अध्यक्ष होते, खासदार होते व राज्यात मंत्रीही राहिले. स्वतः वर्षा गायकवाड या खासदार आहेत. आमदार व मंत्रीही होत्या. त्यांची बहिण डॉ. ज्योती गायकवाड या धारावीतून आमदार आहेत.

घरात राजकीय वारसा असताना व पक्षाने त्यांना व त्यांच्या परिवाराला भरपूर काही दिलेले असताना वर्षा गायकवाड या पक्षाला यश मिळवून देण्यात असमर्थ का ठरल्या? १८८५ साली ज्या शहरात काँग्रेसची स्थापना झाली, त्याच मुंबई शहरात काँग्रेस संकुचित आणि दुर्बल झाल्याचे बघायला मिळत आहे.

पक्षाचे संघटन कमकुवत असल्याने मुंबईत काँग्रेसची ताकद दिवसेंदिवस कमी होत आहे. नऊ वर्षापूर्वी सन २०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसचे ३१ नगरसेवक निवडून आले होते. त्याच निवडणुकीत स्वतंत्रपणे लढलेल्या भाजपाचे ८२ आणि अविभाजित शिवसेनेचे ८४ नगरसेवक विजयी झाले होते. यंदा झालेल्या निवडणुकीत भाजपाचे ८९, ठाकरेंच्या शिवसेनेचे ६५, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे २९ त्यानंतर काँग्रेसचे २४ नगरसेवक निवडून आले.

काँग्रेसचे संख्याबळ महापालिका निवडणुकीत चौथ्या क्रमांकावर आले. काँग्रेसच्या अधोगतीला जबाबदार कोण आहे ? निवडणुकीतील दारूण पराभवानंतर वर्षा गायकवाड यांनी मुंबई काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा अशी पक्षातूनच मागणी झाली. त्या स्वतःहून राजीनामा देणार नाहीत, पक्ष त्यांना पद सोडायला सांगणार नाही आणि वर्षा गायकवाड यांना हटवले तरी मुंबई काँग्रेसला सक्षम पर्याय देऊ शकेल असे पर्यायी नेतृत्व तरी कोण आहे ?

काँग्रेस पक्षाने मुंबईत २२७ पैकी १५२ जागा लढविल्या. प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी, महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष, राजेंद्र गवई यांचा रिपब्लिकन पक्ष ( गवई ) यांच्याशी काँग्रेसने आघाडी केली होती.

मुस्लिम, दलित व उत्तर भारतीय ही काँग्रेसची परंपरागत व्होट बँक गेल्या दहा वर्षात दुरावत चालली आहे. उत्तर भारतीय मतदारांना जपण्यासाठी काँग्रेसने ठाकरे बंधुबरोबर जाण्यास नकार दिला. पण त्याचा फारसा लाभ पक्षाला झाला नाही. अमराठी मते भाजपाकडे जातात हेच अनुभवायला मिळाले.

मुस्लिम मतदारांना आता एमआयएम चा पर्याय मिळाल्याने ती मतेही काही अपवाद वगळता काँग्रेसला मिळाली नाहीत. उद्धव ठाकरे हे भाजपाला कठोर विरोध करीत असल्यामळे मुस्लिम मतदारांची पसंती लोकसभा व विधानसभा निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेला होती. आता बहुसंख्य मुस्लिम मतदार एमआयएमकडे झुकला असल्याचे पाहायला मिळाले. मुंबईतून प्रथमच मुस्लिम प्रबाल्य असलेल्या मतदारसंघातून एमआयएमचे ८ नगरसेवक निवडून आले आहेत.

**मुंबई कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

काँग्रेसने वंचित बहुजन आघाडी सोबत युती केली असली तरी प्रचारात तसे दिसले नाही. वर्षा गायकवाड व प्रकाश आंबेडकर यांनी संयुक्त प्रचार सभा कुठे घेतली नाही किंवा दोन्ही नेत्यांनी मिळून शहर व उपनगरात रोड शो केले नाहीत. प्रचारात दोन्ही नेते एकत्र दिसले असते तर त्याचा लाभ काँग्रेसला निश्चित झाला असता.

काँग्रेस- वंचित व राष्ट्रीय समाज पक्षाला निवडून द्या असे कोणीही मतदारांना आवाहन करताना दिसले नाही. मग काँग्रेसने युती केली तरी कशाला? गेली काही वर्षे मुंबई काँग्रेसला गटबाजाने पोखरले आहे. उमेदवार ठरवताना या गटबाजीचा फटका कार्यकर्त्यांना बसतो. पक्षाच्या अध्यक्षाच्या विरोधात इतर सर्वजण असे चित्र गेली अनेक वर्ष आहे. पक्षाचे अन्य नेते पक्षाच्या अध्यक्षाला साथ देत नाहीत आणि अध्यक्षही त्यांना कोणाला विचारत घेत नाहीत, मग पक्ष वाढणार कसा?

२०२४ मधे झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने बऱ्यापैकी यश मिळवले होते पण तसे महापालिका निवडणुकीत झाले नाही. २००७ मधे झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसचे ७१ नगरसेवक निवडून आले होते. २०१२ च्या निवडणुकीत ५२ नगरसेवक विजयी झाले. २०१७ च्या निवडणुकीत ३१ तर २०२६ च्या निवडणुकीत काँग्रेसचे २४ नगरसेवक महापालिकेत पोचले आहेत.

उत्तर भारतीय, दाक्षिणात्य आणि मुस्लिम मतदार काँग्रेसपासून दुरावत चालला आहे. वर्षा गायकवाड या पक्षाच्या प्रमुख असल्या तरी आमदार अमिन पटेल व अस्लम शेख या दोन नेत्यांनाच पक्षात महत्व आहे. त्यांच्या भरंवशावर पक्ष चालला आहे असे चित्र आहे.

पक्षातील अनुभवी नेत्यांना विश्वासात घेतले जात नाही, पक्षाच्या अध्यक्ष मुंबईत वॉर्डनिहाय भेटी देत नाहीत. स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी संवाद नाही. त्यामुळे तळागाळात काय घडते हे नेतृत्वाला समजतच नाही. अनेक ठिकाणी ज्यांचे काम चांगले आहे, नेटवर्क उत्तम आहे, तिथे जागा वंचित किंवा जानकरांच्या पक्षाला सोडली. वंचितकडे उमेदवारच नाहीत म्हणून अनेक जागा त्यांनी काँग्रेसला परत केल्या. मग ऐनवेळी तरी काँग्रेस कुठून उमेदवार आणणार ?

नेत्यांच्या घरातच तिकीटे दिली गेली अशी उदाहरणेही बरीच आहेत. अनेक जण त्यांना उमेदवारी नाकारल्यामुळे दुसऱ्या पक्षात गेले पण त्यांना दुसरीकडे जाण्यापासून कोणी रोखले नाही. पक्षाच्या अध्यक्षांनी स्वतःच्या घरातच दोन तिकीटे दिली मग अन्य नेत्यांना त्या कसे रोखू शकणार ? जागा वाटप करताना त्या वॉर्डातील परिस्थिती काय आहे याचा नीट अभ्यासही केला गेला नाही. २२७ पैकी २७ वॉर्डात काँग्रेसला उमेदवार सापडले नाहीत यापेक्षा दुर्दैव कोणते असू शकते ?

महायुती विरूध्द ठाकरे बंधू अशा घनघोर संघर्षात काँग्रेस पक्षाचे चोवीस नगरसेवक निवडून आले ही मोठी कामगिरी आहे असे काहींना वाटते. पक्षाच्या दहा उमेदवारांचा पराभव तर पाचशेपेक्षा कमी मतांनी झाला आहे.

एमआयएमचा उदय ही तर काँग्रेसला धोक्याची घंटा आहे. राज्यात भाजपाची सत्ता आल्यापासून गेल्या दहा- बारा वर्षांत सर्व राजकीय पक्षांना फुटीचा धोका निर्माण झाला आहे. भाजपाकडे जाणे म्हणजे सत्तेच्या परिघात जाणे . कामे करून घ्यायची असतील व प्रशासनाकडून कोणताही त्रास नको असेल तर भाजपाकडे जाणे हा एकच मार्ग आहे.

काँग्रसचे २४ नगरसेवक सत्तेचा मोह, अमिषे आणि आश्वासनांपासून किती काळ दूर राहतील, याची चर्चा सुरू झाली आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वर्षा गायकवाड यांनी लोकसभेत पंतप्रधानांच्या आसनासमोर घोषणा देऊन रणरागिणीचा अवतार दाखवला. आता मुंबईत काँग्रेस संघटनेला संजिवनी कधी देणार याची कार्यकर्ते वाट पाहात आहेत.

# दीनदयाळ उपाध्याय : गरिबांचे कैवारी

**(कालच्या अंकावरून पुढे)**

----------------

दीनदयाळची वेशभूषा नेहमीच अगदी साधी असायची. सामान्य माणसांशी बोलणं सुद्धा अगदी सामान्य माणसाप्रमाणे! त्यामुळे ते कोणी नेते आहेत असं ते कुठे फिरताना पाहणाऱ्याला वाटायचं नाही.

एकदा लखनऊ येथे असताना कार्यक्रम किंवा सभा असल्यामुळे पंडितजींना केस कापून घ्यायचे होते. ते कार्यालयातून निघाले आणि नेहमीचे केश कर्तनालय बंद असल्यामुळे थोडा शोध घेऊ लागले. परंतु कुठे गर्दी जास्त तर काही कारणाने काही दुकानं बंद!

थोड्या वेळाने ते परत कार्यालयात आले. सोबतच्या कार्यकर्त्यांनी केस कुठे कापले म्हणून विचारलं तेव्हा फिरत्या सलून मध्ये असं उत्तर दीनदयाळजींनी दिलं. स्पष्टीकरण देताना त्यांनी रस्त्यावर धोपटे घेऊन फिरणाऱ्या आणि पोतं टाकून केस कापणाऱ्या व्यक्तीकडे केस कापून घेतले होते हे त्यांनी सांगितले.

**प्रा.डॉ. केदार ठोसर**
**चिखली.**

ते म्हणाले माझ्यापाशी जास्त वेळ नव्हता, त्याच्याकडे गिऱ्हाईक नव्हते; दोघांचीही सोय झाली. एका गरजू कारागिराला संधी दिली, याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर होते. दीनदयाळजींच्या जीवनात श्रमाचे थोडे पैसे गरिबांना मिळावे, याला महत्व होते. सोबतच अशा निमित्ताने सामान्य लोकांच्या तसेच गोरगरिबांच्या समस्या काय आहेत ते सहज गप्पा करताना माहीत करून घेत. या माहितीचा उपयोग अंत्योदय ही कल्पना साकार करण्यासाठी त्यांनी निश्चितच करून घेतला.

दीनदयाळजींचा स्वावलंबी भारत स्वातंत्र्यानंतर लवकरात लवकर झाला पाहिजे हा आग्रह होता. त्यावेळी पूर्णतः कृषीप्रधान असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचे क्षेत्र अधिकाधिक प्रगत होण्यासाठी हर हाथ को काम - हर खेत को पानी, हा नारा पंडितजींनी दिला होता.

त्यामधे जनसामान्यांचा विकास झाला पाहिजे तसेच ७० टक्के भारतीय जनता कृषी आणि कृषी संबंधित रोजगारावर अवलंबून असल्यामुळे ते रोजगार सुरक्षित राहिले पाहिजे हा सुद्धा त्यांचा विचार होता.

भारत सरकारने त्यादरम्यान अमेरिकेतून गहू आयात करण्यासाठी पी एल ४८० असा करार केला. या कराराला पंडित दीनदयाळनी संपूर्ण ताकतीने विरोध केला. यामध्ये दोन मुद्द्यांचा ते उल्लेख करत असत.

एक तर अन्नधान्याच्या बाबतीत स्वतंत्र भारताने स्वयंपूर्ण, स्वावलंबी होणे आवश्यक आहे. दुसरा भाग म्हणजे अमेरिका या कराराचा उपयोग भारतावर काश्मीर प्रश्नावर वाटाघाटी संबंधी दडपण आणण्यासाठी करू शकतो आणि त्यामध्ये पाकिस्तानचा फायदा आणि भारताचा तोटा होऊ शकतो. आणि? त्यामुळेच अमेरिकन गव्हाच्या आयातीवर जनतेने पूर्ण शक्तीने विरोध करावा वेळ आल्यास बहिष्कार टाकावा, असेही आवाहन त्यांनी केले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार आजही विकसित भारतासाठी आणि बंधू भावाच्या आधारावर मानवी समाज चालण्यासाठी सुसंगत आहेत. त्यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन.

■ ■ ■

# उत्क्रांतीवादाचा जनक चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते.

त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते.

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत.

त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले.

त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसगार्शी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले.

या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले.

या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली.

डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते.

बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

■ ■ ■

## प्रेम की भ्रम? व्हॅलेंटाईन संस्कृतीमागील वास्तव

**वाचक लिहितात**

आज खरे प्रेम हे एका विशिष्ट दिवसापुरते मर्यादित न राहता संपूर्ण आयुष्यभर जपले जाणारे मूल्य असायला हवे. प्रेम म्हणजे केवळ आकर्षण, जवळीक किंवा शारीरिक ओढ नसून त्यामागे जबाबदारी, आदर आणि निष्ठा असणे आवश्यक आहे.

युवक - युवतींनी समाजमाध्यमांवर दिसणाऱ्या चमकदार चित्रांमागील वास्तव ओळखणे गरजेचे आहे. प्रत्येक नातं सोशल मीडियावर दाखवण्यासारखं किंवा प्रदर्शनासाठी नसतं. भावनांच्या भरात कोणताही निर्णय न घेता, विचारपूर्वक आणि सजगपणे वागणे हाच खरा शहाणपणाचा मार्ग आहे.

तरुण वर्गासाठी फेब्रुवारी महिना विशेष महत्त्वाचा मानला जातो. हा महिना प्रेमाचा महिना म्हणून ओळखला जातो. रोझ डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग डे, किस डे आणि शेवटी व्हॅलेंटाईन डे–असा हा संपूर्ण आठवडा साजरा केला जातो. प्रत्यक्षात, एवढ्या प्रमाणात हे दिवस विदेशातही साजरे केले जात नाहीत. अशा प्रकारे साजरे केलेले प्रेम खरोखर टिकते का? प्रेम म्हणजे जिथे आपुलकी, विश्वास आणि समजूतदारपणा असायला हवा, तिथे आज बाजारूपणाची अंध स्पर्धा सुरू आहे. व्हॅलेंटाईन डे हा प्रेमाचा दिवस नसून अनेक अर्थांनी काळा दिवस ठरत असल्याचे म्हणणे गैर ठरणार नाही.

■ **कु. राधा प्रमोद पिंपळापुरे, उमरेड.**

# दृढ, नीतिमान, प्रामाणिक, ख्यातनाम वकील ॲड. शर्वरी तुपकर



**माणूसपणाची पाऊलवाट**



**सुजाता बंडावार**
mahasagarngp@gmail.com

वकिली पेशाचं बाळकडू घरातूनच मिळाल्याने वकिल या व्यवसायाभोवती जितकी प्रतिष्ठेची वलयं असतात, तेवढीच त्यामागील नवनवीन आव्हाने, संघर्ष, रात्रीचा दिवस करून अखंड घ्यावी लागणारी मेहनत, अभ्यास, संशोधन, समोरील कठीण व्यक्तीशी करावा लागणारा संयमित पण तेवढाच तर्कशुद्ध संवाद या कसोटींवर शर्वरी तुपकर खऱ्या उतरल्या आहेत. एवढेच नाही तर दृढ नीतिमान, प्रामाणिक, मूल्यांशी तडजोड न करणाऱ्या वकील म्हणून बुलढाणा जिल्ह्यात त्या ख्यातनाम झालेल्या आहेत. त्यांचा प्रवास जेवढा खडतर आहे तेवढाच रोमहर्षक आणि जिद्दीची पराकाष्ठा करणारा आहे.

सिविल केसेस, कौटुंबिक वाद आणि विशेषतः अँटी करप्शन आणि क्रिमिनल च्या केसेस यशस्वीपणे हाताळणारे लीडिंग प्रॅक्टिशनर म्हणून बुलढाणा जिल्ह्यात मोठं प्रस्थ असलेले वडील अशोक सावजी बुलढाणा जिल्ह्याच्या सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय असलेले वकील आहेत. बुलढाणा जिल्ह्याचा पाण्याचा प्रश्न, रस्ते, नगरपालिकेची अरेरावी, कष्टकऱ्यांवर होणारा अन्याय यासाठी लोकांना एकत्रित करणे, सामाजिक कार्यकर्त्यांवर सरकारने केस केल्यास त्यांच्या बाजूने एकही पैसा न घेता किंवा कोणत्याही खर्चाची अपेक्षा न बाळगता त्यांना न्याय मिळवून देणे यासाठी प्रयत्नशील धडपडणारे वडील यांच्या मूल्यधिष्ठित तालमीत शर्वरी तुपकर जेवढ्या वकील म्हणून घडल्या तेवढ्याच त्या संवेदनशील सामाजिक समस्येची जाण असणाऱ्या व्यक्ती म्हणून सुद्धा घडल्या. वडिलांप्रमाणेच स्वच्छ प्रतिमा असलेल्या वकील म्हणून त्यांनी आपली छाप सोडली आहे.

त्या आपल्या जीवनातील विसंगती सांगतात की मला जरी वडिलांनी एखाद्या मुलाप्रमाणे वाढविले असले काही बंधने माझ्यावर घातली नसली तरी, आजोबा आणि वडील दोघेही वकील असले तरी वकिलीची परंपरा मात्र आपल्या मुलीने चालवू नये असे त्यांच्या वडिलांना वाटत होते. पण जेव्हापासून समजायला लागलं तेव्हापासूनच वकील होण्याचे ध्येय बाळगणाऱ्या शर्वरी तुपकर यांनी घरातून असलेल्या प्रचंड विरोधाला न जुमानता वकील होण्याचा निर्णय घेतला.

नागपूरला त्यांनी एलएलबीचे शिक्षण पूर्ण करीत असतानाच वडिलांच्या मार्गदर्शनामध्ये त्या प्रॅक्टिस करू लागल्या. वडिलांकडे येणाऱ्या सिविल केसेस, कौटुंबिक केसेस, महसूल विषयक केसेस, क्रिमिनल आणि अँटी करप्शन च्या केसेस त्या हाताळू लागल्या. यामध्ये माहिती घेणे, ड्राफ्टिंग करणे, संबंधित फायलिंग करणे यासारखी कामे त्या करू लागल्या आणि हळूहळू त्या निष्णात होऊ लागल्या.

एका टप्प्यानंतर वडिल अँटी करप्शन आणि क्रिमिनलच्याच केसेस बघू लागले त्यामुळे सिविल केसेस, फॅमिली केसेस, महसूल विषयक वाद आपसुकच शर्वरी यांच्याकडे आल्या आणि हळूहळू त्या आपल्या कामात वडिलांच्या मार्गदर्शनामध्ये निष्णात होऊ लागल्या. सिव्हिल केसेस हाताळण्यात त्यांनी हातखंडा निर्माण केला.

त्या एक किस्सा सांगतात की वडिलांकडे एक अँटी करप्शन ची केस आली होती पण त्यांना दुसरीकडे ट्रायल साठी जायचे होते. तेव्हा वडिलांनी या अँटीकरप्शन केसची जबाबदारी शर्वरी तुपकर यांच्याकडे सोपविली. पण जेव्हा त्या आरोपीला कळले की ही केस अशोक सावजी नाही तर त्यांची मुलगी हाताळणार आहे तेव्हा त्या व्यक्तीने अँटी करप्शनचे ज्ञानही नसणाऱ्या व्यक्तीला ही केस सोपवली.

या घटनेमुळे शर्वरी या हादरून गेल्या आणि आपल्या महिला असल्यामुळे आपल्या क्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे असे त्यांना वाटले. महिला म्हणून दुय्यम वागणूक मिळण्याचे अनेक प्रसंग त्यांचे समोर आले पण आपल्या कर्तुत्वाने त्यांनी आपल्यातील महिला म्हणून येणाऱ्या मर्यादांवर मात केली.

आपल्या उमेदीच्या काळातच शेतकरी, तरुण, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सदैव उग्र आणि प्रखर आंदोलन करणारे सक्रिय कार्यकर्ते रविकांत तुपकर यांच्या आंदोलनांच्या केसेसच्या अनुषंगाने त्या दोघांची ओळखी झाली आणि त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. त्यांचे लग्नच या अटीवर झाले की मी सदैव शेतकरी आंदोलनामध्ये कार्यरत राहील आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी हि तुला सांभाळावी लागेल. पण कशाचीही तमा न बाळगता आणि त्यांच्या आंदोलनामध्ये खांद्याला खांदा लावून काम करेल असे आश्वासन देत त्या चतुर्भुज झाल्या.

त्या सांगतात, खऱ्या अर्थाने मी सामाजिक कार्यामध्ये सक्रिय झाली ती लग्नानंतर. शेतकऱ्यांचे आंदोलन, त्यांच्या न्यायासाठी धरणे आंदोलन, महिला मिळावे, कष्टकरी आणि तरुणांच्या न्यायासाठी हक्काच्या लढाया या सर्व सामाजिक कार्यांमध्ये त्या आपल्या पतीसोबत सहभाग दर्शवितानाच या सामाजिक कार्यकर्त्यांच्या बाजूने त्या न्यायदानाच्या प्रक्रियेमध्ये स्वतःला झोकून देतात.

आपल्या व्यवसायामध्ये सुरुवातीला महिला म्हणून मिळालेली दुय्यम वागणूक याचा दूरगामी परिणाम झालेल्या शर्वरी तुपकर यांनी गर्भनिदान परीक्षण करणाऱ्या केंद्रामध्ये स्टिंग ऑपरेशन केले आणि गरोदर अवस्थेतही जीव धोक्यात घालून डॉक्टर उमेश लोंढे यांना तुरुंगात टाकले. हा अनुभव फारच थरारक असा आहे, असे त्या म्हणाल्या.

लग्नानंतर पाच महिन्याच्या गरोदर असताना त्यांच्या परिचित असलेल्या वषाताई देशपांडे यांच्या मार्गदर्शनातून त्यांनी लिंगनिदान केंद्राचे स्टिंग ऑपरेशन करण्याचे ठरविले. टी.व्ही. नाईनच्या रिपोर्टर त्या आणि जाऊ म्हणून आलेल्या शैलाताई या तिघीजणी मुंबई येथे डॉक्टर उमेश लोंढे यांच्या केंद्रात गेल्या. लिंगनिदान परीक्षण करण्यासाठी डॉक्टरांनी त्यांना गाडीतून १५ किलोमीटर अंतरावर दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये नेले. त्यांच्याजवळ केवळ एक रेकॉर्डर होता जो त्यांनी छातीजवळ ठेवला होता. त्या ठिकाणी डॉक्टर, त्या आणि सोनोग्राफी करणारे डॉक्टर असे तिघेच जण होते. एवढ्या वेळात त्यांनी पुरावा गोळा केला आणि कशाबशा तेथून निसटल्या. त्यांची मेडिकल कंडिशन नाजूक असतानाही अगदी जीवावर उदार होऊन त्यांनी स्टिंग ऑपरेशन केले आणि त्या डॉक्टरांना गजाआड केले. त्या अभिमानाने सांगतात की मी अशा चार केंद्रांचे स्टिंग ऑपरेशन केले आहे.

आपले जीवन संपूर्णपणे शेतकरी आंदोलनाला वाहिलेल्या पतीवर आलेला एक अतिप्रसंग आणि एक पत्नी आणि सक्षम वकील म्हणून त्यांची केलेली सुटका याचा एक हृदय द्रावक प्रसंग त्या सांगतात. शेतकऱ्यांना त्यांचा पीक विमा मिळावा म्हणून त्यांच्या पतीने आत्मदहनाची घोषणा केली होती. पत्रकार परिषद घेतली आणि ते गायब झाले.

जेव्हा ब्रेकिंग न्यूज सुरू झाल्या तेव्हा तुपकर यांना कळले की त्यांचे पती आत्मदहन करणार आहेत. त्यांच्या घराभोवती पोलिसांनी गराडा घातला, फोन टॅपिंग होत होते, पोलीस वारंवार त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलवत होते. पण त्या म्हणाल्या मला याबद्दल काहीही माहित नाही ते जर म्हणत आहे की ते आत्मदहन करणार आहेत तर ते नक्की करणार.

आत्मदहनाच्या आदल्या दिवशी त्यांच्या पतीचा फोन आला की तुम्ही कलेक्टर ऑफिस कडे या. कलेक्टर ऑफिसच्या अलीकडील चौकामध्ये पोलिसाच्या वेशात त्यांचे पती आले आणि स्वतःवर पेट्रोल ओतून आत्मदहनाची घोषणा करू लागले. सर्वत्र ओरड सुरू झाली. त्यांच्या हातातून माचिसची काडी घेण्याचा मी पुरेपूर प्रयत्न करत होते पण ते बधत नव्हते.

हे आंदोलन उधळून लावण्यासाठी तेथील खासदारांच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केली आणि लाठीचार्ज सुरू झाला. ३५ लोकांवर गुन्हे दाखल झाले आणि तुरुंगात डांबण्यात आले. यावेळेस माझ्यावरही लाठी हल्ला झाला असे त्या म्हणाल्या. आता तुरुंगात असलेल्या पतीची बेल करण्याची जबाबदारी पूर्णपणे माझ्यावर आली.

एक पत्नी आता वकील म्हणून पतीच्या सुटकेसाठी स्वतःचे कौशल्य पणाला लावणार होती. हे फार मोठे आव्हानही होते आणि तेवढेच दडपण ही होते. पण पण वडिलांच्या तालमीत तयार झालेली मी या दोघांचा सुवर्ण मध्ये साधला आणि हीटिंग अग्युमेंट करत मीही केस जिंकली. ही जिंकलेली लढाई माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी आव्हानात्मक आणि तेवढीच कौशल्यांची परीक्षा घेणारी ठरली असे त्या सांगतात.

पती सदैव आंदोलनात आणि तुरुंगात असतात त्यांच्या प्रत्येक केसेस मी तेवढ्याच निष्पक्षपणे लढते. माझ्यातील ही प्रामाणिकता, लढाववृत्ती, आणि नीतिमत्ता यामुळे विरोधी पक्ष सुद्धा ही कधीच मॅनेज होणार नाही या विश्वासाने माझ्याकडे आपली केस घेऊन येतात. आतापर्यंतच्या २२ वर्षांच्या काळात अनेक सिविल केसेस, फॅमिली केसेस, महसूल विषयक वाद लढवल्या आहेत पण आता अँटी करप्शन च्या केसेस आणि क्रिमिनलच्या केसेस लढवत सिव्हिल केसेस लढणाऱ्या वकील म्हणून माझ्यावर जो शिक्का बसला होता तो मी बऱ्यापैकी पुसला आहे असे त्या म्हणतात.

त्यांचे पती रविकांत तुपकर असे म्हणतात की मी तुरुंगाची लढाई लढत असताना बाहेरील लढाई माझी पत्नी लढते आणि सदैव माझ्या आंदोलनात पाठराखीण असलेली माझी पत्नी माझी खरी ताकद आहे.

असे म्हणतात की शंभर गुन्हेगार सुटले तरी चालेल पण एका निर्दोष व्यक्तीवर अन्याय होता कामा नये. याच जबाबदारीचे भान सदैव ठेवत, भावना आणि बौद्धिक तर्क यात संतुलन साधत आपल्या वडिलांची स्वच्छ, नीतिमान, प्रामाणिक आणि तडजोड न करणारी परंपरा त्या राखतच नाही आहेत तर त्यात त्यांनी पराकोटीचे यश प्राप्त केले आहे. आपल्यातील महिला म्हणून येणाऱ्या मयार्दांवर मात करत त्यांनी बुलढाण्याच्या कधीही तडजोड न करणाऱ्या वकील म्हणून आपले स्थान निर्माण केले आहे.

आपल्या पतीच्या आंदोलनांमध्ये खांद्याला खांदा लावून सहकार्य करून हक्कासाठी लढणाऱ्या हक्कांना काम प्राप्त करून द्यायचे आहे. पतीच्या पुढील लोकसभा जिंकण्याच्या मार्गाची तयारी करायची आहे असे त्या म्हणाल्या. एक कणखर, स्वच्छ, नीतिमान प्रामाणिक वकील म्हणून शर्वरी तुपकर यांचा प्रवास सदैव यशाच्या शिखरावर चालो यासाठी आमच्या शुभेच्छा.

--------------------

**ॲड. शर्वरी तुपकर संपर्क क्रमांक**
**735097 5086**

■ ■ ■

# काँग्रेसची वेगळी रणनिती!

**(कालच्या अंकावरून पुढे)**

----------------

अर्थात पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसकडे गमावण्यासारखे काहीच नसल्याने, एकट्याच्या बळावर लढू इच्छिणाऱ्या काँग्रेसचा २०२१ प्रमाणे दारुण पराभव झाला तरी काँग्रेसला काही फरक पडणार नाही. एकट्याच्या बळावर लढल्यास काँग्रेसला पश्चिम बंगाल विधानसभेच्या सर्व जागांवर (२९४) आपले उमेदवार उभे करता येतील आणि त्या निमित्ताने आपली संघटना तळागाळापर्यंत पोहोचवता येईल.

महत्वाचे म्हणजे काँग्रेसला नवीन चेहऱ्यांना उमेदवारी देता येईल. सध्या काँग्रेस पक्ष, मुर्शिदाबाद आणि माल्डा या विभागांपुरता मर्यादित राह्यल्याचे चित्र दिसत आहे. काँग्रेसला लवकरच होणाऱ्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत कितपत यश मिळेल हे आताच सांगता येणार नाही.

परंतु काँग्रेस, तृणमूल काँग्रेसची व्होट बँक असलेल्या मुस्लिम मतांमध्ये काही प्रमाणात विभाजन घडवून, भाजपाचा फायदा करू शकेल. विशेषतः माल्डा आणि मुर्शिदाबाद या मुस्लिम बहुल भागात मुस्लिम समाजाच्या मतांमध्ये विभाजन घडवून, काँग्रेस, तृणमूल काँग्रेसचे नुकसान करू शकेल.

माल्डा आणि मुर्शिदाबाद विभागातील मुस्लिम समाज हा पुर्वीपासून काँग्रेसचा पाठिराखा राहिला आहे. काँग्रेसचे नेते ए.बी.ए. घनीखान चौधरी हे माल्डा मधील अतिशय लोकप्रिय नेते होते. तेंव्हा पासून माल्डा हा काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत (२०२१) काँग्रेसचा एकही आमदार निवडून आला नसला तरी २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत माल्डा उत्तर मतदारसंघातून काँग्रेसचा उमेदवार निवडून आलेला आहे.

त्यामुळे विधानसभा निवडणुकीत माल्डा आणि मुर्शिदाबाद या विभागातील विधानसभेच्या जागांवर मुख्य लढत ही काँग्रेस, भाजपा आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात होईल. येथे काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात मुस्लिम मतांचे मोठ्या प्रमाणात विभाजन झाल्यास त्याचा फायदा भाजपाला मिळू शकेल.

काँग्रेसने कोणत्याही पक्षाशी आघाडी करण्यास नकार दिल्याने, त्याचा सर्वात मोठा फटका मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला बसू शकेल. तृणमूल काँग्रेस आणि भाजपा बरोबर एकट्याने सामना करण्याइतकी ताकद आता मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीकडे राहिलेली नाही.

त्यामुळे तृणमूल काँग्रेसला कडवा विरोध करणारे, डाव्या आघाडीचे जे समर्थक आहेत त्यापैकी काही समर्थक तृणमूल काँग्रेसचा पराभव करण्यासाठी भाजपाला मतदान करु शकतील. कारण तृणमूल काँग्रेसचा पराभव फक्त भाजपाच करु शकेल ही वस्तुस्थिती आहे.

मध्यंतरी तृणमूल काँग्रेस मधून बाहेर पडलेले मुस्लिम नेते हुमायून कबीर हे ममता बॅनर्जी यांना आव्हान देत आहेत. हुमायून कबीर यांनी जनता उन्नयन पार्टी या पक्षाची मध्यंतरी स्थापना केली आहे.त्यांनी ओवैसी यांच्या मजलिसे इत्तेहादूल मुस्लिमीन या पक्षाशी तसेच नौशाद सिद्दीकी यांच्या इंडियन सेक्युलर फ्रंट या पक्षाशी आघाडी करण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत.

ती आघाडी अस्तित्वात आली तर तृणमूल काँग्रेस समोर मोठे आव्हान उभे राहू शकेल. या आघाडीला पश्चिम बंगाल मधील मुस्लिम समाजाचा बऱ्यापैकी पाठिंबा मिळाला तर, ममतांच्या मुस्लिम व्होट बँकेला खिंडार पडू शकेल आणि त्याचा फायदा भाजपाला मिळेल.

काँग्रेसने एकट्याच्या बळावर पश्चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुका लढण्याचा जो निर्णय घेतला आहे,त्याचा कितपत फायदा काँग्रेसला मिळेल, हे पाहण्यापेक्षा, त्यामुळे तृणमूल काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीचे किती नुकसान होईल, ते पाहणे महत्त्वाचे ठरेल.

----------------

■ **अभय गोखले**

**अशोकायन**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## व्हॅलेंटाईन डे?

पाण्यावाचून मासोळी
जशी तडफडते
तशी प्रेमी युगलांची
आंतरिक ओढ असते ..

आत्यंतिक विश्वासावर
असते हे टिकून नाते
विश्वासघात झाला कदाचित
तर आत्मक्लेश करून घेते ..

बावनकशी सोन्या सारखं
तावून निघालेलं असतं प्रेम
'व्हॅलेंटाईन डे' सारखे
उगीच खेळत नाहीत ते गेम ..

परस्पर हृदयांची
असते अनामिक ओढ
ते घेऊ शकत नाही
एकमेकांशी काडीमोड ..

## एचसीजी कॅन्सर सेंटरतर्फे जनजागृती उपक्रमांचे आयोजन



**नागपूर, ११ फेब्रुवारी :** जागतिक कॅन्सर दिनाच्या निमित्ताने एचसीजी कॅन्सर सेंटर, नागपूर यांनी ८ फेब्रुवारी रोजी व्हीआर मॉल, नागपूर येथे कलर्स ऑफ होप आर्ट गॅलरीचे आयोजन केले. कला आणि सामुदायिक सहभागाच्या माध्यमातून कॅन्सरविषयी जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या गॅलरीमध्ये कलर्स ऑफ होप कॅनव्हास पेंटिंग स्पर्धेतून निवडलेल्या कलाकृती प्रदर्शित करण्यात आल्या. या कलाकृतींमध्ये आशा, धैर्य आणि जिद्द या विषयांचे प्रभावी चित्रण करण्यात आले होते. शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या मॉलमध्ये आयोजित या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि मोठी उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाला सीओओ सौ. नीता राजवार यांची मान्यवर उपस्थिती लाभली. रुग्णालयाच्या चौकटीबाहेर जाऊन कॅन्सरविषयी जनजागृती करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यावेळी बोलताना एचसीजी कॅन्सर सेंटर, नागपूर यांच्या सीओओ सौ. नीता राजवार म्हणाल्या,

कॅन्सरविषयी जनजागृती तेव्हाच प्रभावी ठरते जेव्हा ती लोकांपर्यंत त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील ठिकाणी पोहोचते. कलर्स ऑफ होपच्या माध्यमातून आम्ही लवकर निदानासाठी प्रेरणा देणे, वेळेवर उपचाराला प्रोत्साहन देणे आणि समाजाला हा संदेश देणे हा आमचा उद्देश आहे की जागरूकता, संवेदनशीलता आणि सामूहिक पाठिंब्याच्या जोरावर कॅन्सरशी लढा देता येतो.

आर्ट प्रदर्शनासोबतच कॅन्सर प्रतिबंध आणि लवकर निदानाबाबत जनजागृती करण्यासाठी नुक्कड नाटकांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला अधिक बळ देण्यासाठी डॉ. वैभव सोनवाणी आणि डॉ. मंगेश पाटील (रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट), डॉ. शांतनू पेंडसे (मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट) आणि डॉ. रजत बजाज (हेमॅटोलॉजिस्ट) यांनी संवादात्मक जनजागृती सत्रे घेतली. त्यांनी उपस्थित नागरिकांशी कॅन्सरविषयी जागरूकता आणि वेळेवर उपचाराचे महत्त्व यावर संवाद साधला.

## नागपूरातील ॲडव्हान्टेज विदर्भ औद्योगिक प्रदर्शनात भारतीय रोखे बाजार दालनाचे आयोजन

नागपूर, ११ फेब्रुवारी : भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (एसईबीआय) च्या मार्गदर्शनाखाली, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया (एनएसई), इतर बाजार पायाभूत संस्था आणि एएमएफआय यांच्या सहकार्याने 'ॲडव्हान्टेज विदर्भ' या प्रदर्शनात 'भारतीय रोखे बाजार' दालन उभारण्यात आले होते. नागपुरातील आरटीएमनू कॅम्पस मैदानावर ६ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हे प्रदर्शन पार पडले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आणि राज्याचे महसूल व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. या महाकुंभात २० हून अधिक देशांतील प्रतिनिधी, २०० हून अधिक उद्योग तज्ज्ञ आणि २५ पेक्षा जास्त ज्ञानसत्रे आयोजित करण्यात आली होती.

केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) राज्यमंत्री श्रीमती शोभा करंदलाजे यांनी या दालनाला भेट दिली. यावेळी सेबीचे कार्यकारी संचालक जीवन सोनपरोटे, एनएसईचे मुख्य नियामक अधिकारी पीयूष चौरसिया आणि इतर वरिष्ठ प्रतिनिधींच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी एमएसएमईसाठी विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये रोखे बाजारातून निधी उभारणीची प्रक्रिया आणि विविध नियामक अनुपालनांची माहिती देण्यात आली.

गुंतवणूकदार जागृती आणि सुरक्षा: सेबीचे कार्यकारी संचालक जीवन सोनपरोटे आणि एनएसईचे पीयूष चौरसिया यांनी गुंतवणूकदारांना आर्थिक साक्षरतेचे महत्त्व पटवून दिले. सोनपरोटे यांनी जनतेशी संवाद साधताना रोखे बाजारातील संधी आणि जोखीम यावर प्रकाश टाकला. फसवणूक आणि घोटाळ्यांपासून संरक्षण मिळवण्यासाठी त्यांनी 'SEBI Check' या सुविधेबद्दल माहिती दिली, ज्याद्वारे गुंतवणूकदार नोंदणीकृत मध्यस्थांचे यूपीआय आयडी आणि बँक तपशील सत्यापित करू शकतात.



या दालनाचे उद्घाटन अविष्कार नाईक (वरिष्ठ उपाध्यक्ष, एनएसई), कृष्णन अय्यर (वरिष्ठ उपाध्यक्ष, एनएसई), श्रीमती बाला कुमारी (उपमहा व्यवस्थापक, एसईबीआय), राहुल केलापुरे (सहायक महाव्यवस्थापक, एसईबीआय) आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाले.

## मोबाईलमधील ओटीपीमुळे होणाऱ्या ऑनलाइन चोरीला आळा घालण्यासाठी एअरटेलची नवी यंत्रणा कार्यान्वित

**नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी :** स्पॅम आणि ऑनलाइन फसवणूकीच्या वाढत्या समस्येला आळा घालण्यासाठी एअरटेलने आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून फ्रॉड अलर्ट ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवी अत्याधुनिक सुविधा सुरु केली आहे. फ्रॉड अलर्ट ही नाविन्यपूर्ण प्रणाली ग्राहकांच्या वन-टाइम पासवर्ड संबंधित बँक फसवणूकींपासून तत्काळ प्रभावीपणे संरक्षण देते. ही प्रणाली कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असल्याने संशयास्पद व्यवहार ओळखते. फसवणूकीचे व्यवहार होण्याची शक्यता असल्यास ही प्रणाली तत्काळ ग्राहकांना संबंधित व्यवहाराबद्दल सूचित करते. त्यामुळे एअरटेलचे ग्राहक ऑनलाइन फसवणूकीच्या व्यवहारातून पूर्णपणे सुरक्षित झाले आहे.

घरात ऑनलाईन ऑर्डरच्या माध्यमातून येणारे पार्सल किंवा अन्नपदार्थांचे वितरण होण्याकरिता ग्राहकांच्या मोबाईलनंबरवर येणा-याओटीपीची मागणी केली जाते. घरपोच होणारे वितरण स्विकारताना अनेकांची लगबग सुरु असते. सायबर भामटे लोकांची होणारी धावपळ लक्षात घेत त्याचा गैरफायदा घेतात. अनेकदा वस्तू वितरण करण्याच्या बहाण्याने किंवा तातडीची सेवा देण्याच्या नावाखाली हे सायबर भामटे ग्राहकांकडून ओटीपीची मागणी करतात. कामाच्या व्यापात अडकलेल्या ग्राहकाला संबंधित ओटीपी हा बँकेऐवजी वितरणसेवेशी संबंधित असल्याचा गैरसमज होतो. प्रत्यक्षात हा ओटीपी ग्राहकांच्या बँकेतील व्यवहारांशी संबंधित गोपनीय ओटीपी असण्याची शक्यता असते. ग्राहकांकडून अनावधानाने दिलेला ओटीपी सायबर भामटे ऑनलाइन चोरीकरिता वापरुन ग्राहकांना लुबाडतात.

एअरटेलच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नव्या प्रणालीबाबत एअरटेल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शाश्वत शर्मा यांनी आपले मत मांडले. ते म्हणाले, एअरटेल हे सुरक्षित नेटवर्क असावे, हे आमचे ध्येय आहे. एअरटेल सुरक्षित ठेवण्याकरिता उपाययोजना शोधताना आम्हांला मोबाईलमधील वनटाइम पासवर्ड (ओटीपी)च्या माध्यमातून होणारा चोरीचा मार्ग लक्षात आला. डिजिटल व्यवहार सुरक्षित ठेवण्यासाठी ओटीपी महत्त्वाची भूमिका साकारत असले तरीही चोरीसाठीही ओटीपीचा गैरवापर होतो. यावर उपाययोजना म्हणून आम्ही तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्याचे ठरवले. एअरटेल नेटवर्कमध्ये या तंत्रज्ञानच्या मदतीने ग्राहक ऑनलाइन चोरींपासून सुरक्षित असल्याचे आम्हांला निश्चितच समाधान आहे.

आमच्या नव्याने विकसित आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित या प्रणालीतून थेट नेटवर्क स्तरावर काम केले जाते. सायबर भामट्यांकडून फसवणूकीच्या हालचाली सुरु होताच ही यंत्रणा संभाव्य धोके ओळखते. वेळीच हस्तक्षेप करुन सायबर गुन्हे रोखते. सायबर फसवणूकीच्या घटना आटोक्यात आणण्यात ही प्रणाली अत्यंत अचूकतेने आणि प्रभावीपणे काम करत असल्याचे विविध चाचण्यांतून सिद्ध झाले आहे. एअरटेलच्या हरियाणा येथील ग्राहकांना कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नव्या प्रणालीची सुविधा अगोदरपासूनच उपलब्ध करण्यात आली आहे. येत्या दोन आठवड्यात एअरटेलच्या देशभरातील सर्व ग्राहकांना ही सुविधा पुरवली जाईल.

## अझीम प्रेमजी विद्यापीठाकडून पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**नागपूर, ११ जानेवारी :** अझीम प्रेमजी विद्यापीठाने त्यांच्या बंगळूरु, भोपाळ आणि रांची येथील कॅम्पसमध्ये आगामी शैक्षणिक वर्षासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया जाहीर केली आहे. या अभ्यासक्रमांसाठी इच्छुक असणाऱ्यांना २२ फेब्रुवारी २०२ पर्यंत अर्ज करता येणार आहेत.

विद्यापीठामध्ये शिक्षणशास्त्र, विकासशास्त्र, पूर्व प्राथमिक शिक्षण (अर्ली चाइल्डहूड एज्युकेशन), अर्थशास्त्र, उपयोजित अर्थशास्त्र, सार्वजनिक आरोग्य आणि हवामान बदल व शाश्वतता या विषयांत पदव्युत्तर पदवी घेता येईल. कॅम्पसनुसार हे अभ्यासक्रम अशा विद्यार्थ्यांसाठी तयार केले गेले आहेत, ज्यांना भक्कम शैक्षणिक पाया रचण्याबरोबरच समकालीन सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांचा सखोल अभ्यास करायचा आहे.

विद्यापीठाच्या बंगळूरु कॅम्पसमध्ये एम.ए. अर्थशास्त्र, एम. ए. विकासशास्त्र (डेव्हलपमेंट) एम. ए. शिक्षणशास्त्र (एज्युकेशन), एम. ए. पूर्व प्राथमिक शिक्षणशास्त्र, एम. एस्सी. हवामान बदल व शाश्वतता; भोपाळ कॅम्पसमध्ये एम. ए. विकासशास्त्र, मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ (एमपीएच); तर रांची कॅम्पसमध्ये एम. ए. उपयोजित अर्थशास्त्र, एम. ए. विकासशास्त्र आदी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेता येणार आहे.

सर्व कॅम्पसमधील हे पदव्युत्तर अभ्यासक्रम आंतरशाखीय शिक्षण, तज्ज्ञ प्राध्यापकांद्वारे अध्यापन आणि वास्तव जगातील परिस्थितींशी सतत जोडलेले राहण्यावर भर देतात. विद्यार्थी वर्गातील अभ्यासाबरोबर प्रत्यक्ष क्षेत्रीय अनुभव आणि प्रकल्पांच्या माध्यमातून शिक्षण घेतात. तसेच, शैक्षणिक आणि व्यावसायिक अशा दोन्ही पार्श्वभूमी असलेल्या प्राध्यापकांबरोबर त्यांना काम करण्याची संधी मिळते. हे अभ्यासक्रम शिक्षण, विकास, अर्थशास्त्र, सार्वजनिक आरोग्य, हवामान बदल आणि संबंधित क्षेत्रांतील करिअरमध्ये रस असलेल्या विविध शाखांमधील पदवीधरांसाठी खुले आहेत. तसेच, ज्यांना पुढील शैक्षणिक अभ्यास आणि संशोधनासाठी भक्कम पाया हवा आहे, त्यांच्यासाठीही हे अभ्यासक्रम उपयुक्त आहेत.

अभ्यासक्रमासाठी २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करण्याची शेवटची संधी मिळणार आहे. अधिक माहिती व अर्जासाठी अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या https://azimpremjiuniversity.edu.in/postgraduate या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## 'फ्लेक्सी कॅप फंड्स'ला पहिली पसंती: बाजारातील चढ उतारांमध्ये नागपूरच्या गुंतवणूकदारांचा विश्वास

**नागपूर, ११ फेब्रुवारी :** बदलत्या जागतिक घडामोडी आणि बाजारातील अस्थिरतेच्या काळात, 'फ्लेक्सी कॅप फंड्स' किरकोळ गुंतवणूकदारांची पहिली पसंती ठरत आहेत. कमी जोखीम आणि उत्तम परतावा यांचा समतोल शोधणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी हे फंड एक महत्त्वाचा पर्याय म्हणून समोर आले आहेत. गुंतवणूकदारांचा कल आता बदलताना दिसत आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये गुंतवणूकदारांनी इतर फंड्सच्या तुलनेत फ्लेक्सी कॅप फंड्सवर सर्वाधिक विश्वास दर्शवला असून यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे.

एएमएफआय च्या ताज्या आकडेवारीनुसार, २०२५ या वर्षात गुंतवणूकदारांनी फ्लेक्सी कॅप फंड्समध्ये विक्रमी ८०,९७८ कोटींची गुंतवणूक केली आहे. ही रक्कम स्मॉल-कॅप(५२,३२१ कोटी) आणि मिड-कॅप(४९,९३९ कोटी) सारख्या मोठ्या श्रेणींमधील गुंतवणुकीच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. गुंतवणुकीचा हा वेग डिसेंबर २०२५ मध्ये सर्वाधिक होता, जेव्हा एकाच महिन्यात १०,०१९.२७ कोटींची गुंतवणूक झाली; जी मागील महिन्याच्या तुलनेत २३% जास्त आहे.

टाटा एसेट मॅनेजमेंटचे सीआयओ (इक्विटीज) राहुल सिंह म्हणतात, बाजार नेहमी एकसारखा राहत नाही. फ्लेक्सी कॅप धोरण आम्हाला बाजाराच्या बदलत्या परिस्थितीनुसार चालण्याचे स्वातंत्र्य देते. जेव्हा गरज असते, तेव्हा आम्ही महागड्या स्मॉल आणि मिड-कॅपशेअर्समधून बाहेर पडून मोठ्या आणि सुरक्षित कंपन्यांमध्ये गुंतवणूक करतो. यामुळे गुंतवणूकदारांना बाजारानुसार कधी पैसा लावायचा किंवा कधी काढायचा, याचा स्वतः विचार करावा लागत नाही; अशा प्रकारे, त्यांच्या गुंतवणुकीची सुरक्षा आणि वाढीचा वेग एका कुशल फंड मॅनेजरच्या हातात राहतो.

या अष्टपैलू फंड श्रेणीबद्दल गुंतवणूकदारांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी, टाटा म्युच्युअल फंडने आपला नवा 'फुल फ्लेक्सी' उपक्रम लाँच केला आहे. दीर्घकालीन गुंतवणुकीतून चांगला फायदा मिळवण्यासाठी बाजारानुसार गुंतवणुकीत बदल करणे (फ्लेक्सिबल राहणे) किती गरजेचे आहे, हे या मोहिमेद्वारे सांगितले जात आहे.

रिटेल गुंतवणूकदारांसाठी फ्लेक्सी-कॅपफंड खूप फायदेशीर आहेत, कारण हे फंड वेगवेगळ्या प्रकारच्या शेअर्समध्ये गुंतवणूक करून बाजारातील चढ-उतारांचा फायदा घेतात. गुंतवणूकदार एसआयपीच्या माध्यमातून अस्थिर बाजारपेठेतही थोडी-थोडीगुंतवणूक करून आपल्या पोर्टफोलिओचा धोका कमी करू शकतात आणि उत्तम परतावा मिळवू शकतात.

## क्वांटम एएमसीने विदर्भात आपली उपस्थिती वाढवली

**नागपूर, ११ जानेवारी :** क्वांटम ॲसेट मॅनेजमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (क्वांटम एएमसी) ने आज नागपूरमध्ये आपले नवीन ऑफिस सुरू केल्याची घोषणा केली. हे पाऊल विदर्भ क्षेत्रातील आपली उपस्थिती मजबूत करण्यासाठी आणि महाराष्ट्रातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या आर्थिक बाजाराशी अधिक जवळून संपर्क साधण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

भारताचे केंद्र म्हणून ओळखले जाणारे नागपूर हे मध्य भारताचे एक महत्त्वाचे आर्थिक आणि व्यावसायिक केंद्र बनले आहे. नागपूरचे चांगले स्थान, सुधारलेली रस्ते आणि पायाभूत सुविधा, आणि वाढती कनेक्टिव्हिटी यामुळे हे शहर विदर्भ आणि आसपासच्या भागांसाठी नैसर्गिक प्रवेशद्वार बनले आहे. गेल्या दहा वर्षांत नागपूरने देशाच्या सरासरीपेक्षा जास्त वाढ अनुभवली आहे आणि आर्थिक वर्ष २१ ते आर्थिक वर्ष २६ दरम्यान हे शहर सर्वात वेगाने वाढणाऱ्या शहरांपैकी एक आहे. सर्व प्रमुख टेक कंपन्यांनी नागपूरमध्ये आपले ऑफिस स्थापन केले असून सुमारे ७५,००० ते ८०,००० टेक व्यावसायिक येथे काम करत आहेत. त्यामुळे नागपूर फक्त खाणकाम आणि लॉजिस्टिक केंद्र राहिलेले नाही तर अनेक क्षेत्रांमध्ये वेगाने वाढणारे शहर बनले आहे. या परिवर्तनामुळे वेतनधारक व्यावसायिक, उद्योजक, लघु आणि मध्यम उद्योगांची संख्या वाढली आहे, ज्यामुळे लोकांमध्ये आर्थिक जागरूकता आणि गुंतवणुकीबाबत समज देखील वाढली आहे.

नागपूर हे भारताच्या आर्थिक क्षेत्रातील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास आले आहे आणि दीर्घकालीन, स्थिर वाढीसाठी त्याची क्षमता दाखवली आहे. शहराची एसेट्स अंडर मॅनेजमेंट (व्यवस्थापनाखालील मालमत्ता) जवळपास १७ पट वाढून मार्च २०१२ मधील २,५२५ कोटींहून डिसेंबर २०२५ पर्यंत सुमारे ४२,००० कोटींपर्यंत पोहोचली आहेत. ही २३.२% वाढ राष्ट्रीय सरासरी २०% पेक्षा जास्त आहे. विशेष म्हणजे, नागपूरच्या या जलद प्रगतीमुळे २०१२ मध्ये जास्त बाजारपेठेतील हिस्सा असलेली ४५ मोठी शहरे मागे पडली आहेत आणि नागपूरने टियर-२ शहरांमध्ये आपले अग्रगण्य स्थान मजबूत केले आहे.



या प्रसंगी बोलताना, सीमांत शुक्ला, चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर, क्वांटम एएमसी, यांनी सांगितले, भारतातील वेगाने वाढणाऱ्या प्रमुख बाजारात विस्ताराचा भाग म्हणून नागपूरमध्ये आपले ऑफिस सुरू करताना आम्हाला आनंद होत आहे. विदर्भ भागासाठी व्यावसायिक केंद्र म्हणून नागपूरचे महत्त्वाचे स्थान आमच्या वाढीसाठी नैसर्गिक विस्तार ठरते. या भागातील गुंतवणूकदारांचा सहभाग वाढत असल्यामुळे, आमचे नवीन ऑफिस आम्हाला वितरक आणि गुंतवणूकदारांसोबत अधिक जवळून काम करण्यास मदत करेल, तसेच क्वांटमच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाशी सुसंगत, पारदर्शक आणि संशोधनावर आधारित गुंतवणूक उपाय देईल.

नागपूर ऑफिसच्या उद्घाटनासह, क्वांटम एएमसीचे उद्दिष्ट उदयोन्मुख बाजारांमध्ये गुंतवणूकदारांपर्यंत दर्जेदार गुंतवणूक उपाय पोहोचवणे आणि भारतातील बदलत्या गुंतवणूकदारांच्या लँडस्केपला पाठिंबा देणे आहे. हे काम कंपनी प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि दीर्घकालीन लाभ देणाऱ्या दृष्टीकोनावर आधारित करते.

## ड्रोवीच्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वामध्ये होणार चिमुकल्या स्वप्नांची रंगीबेरंगी उधळण

**नागपूर, ११ फेब्रुवारी :** पहिल्या पर्वाला लहान मुलांकडून भरभरून मिळालेल्या प्रतिसादानंतर, ड्रोवी पुन्हा सज्ज आहे चिमुकल्यांच्या पसंतीस पडलेल्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेचे दुसरे पर्व म्हणजेच सीझन २ घेऊन येण्यासाठी. यानिमित्ताने त्यांना आपल्या मुक्त छंद विचारातून आणि कलेच्या माध्यमातून आपली कलाकृती साकारण्याची आणि व्यक्त होण्याची संधी मिळणार आहे.

मागील वर्षाप्रमाणे यावर्षीच्या स्पर्धेची थीम आहे "Bored? Good! Ideas Flood!". याच थीमच्या सहाय्याने ड्रोवी बॉय म्हणजेच, ड्रोवी या ब्रँडच्या खेळकर अशा मॅस्कॉटसोबत चिमुकल्यांना विविध रंगांच्या माध्यमांतून मनावरची मरगळ झटकून टाकण्यासाठी आणि कंटाळवाणी दिनचर्या मजेदार बनवण्याची संधी मिळणार आहे.

या स्पर्धेचे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये जसे की मुंबई, पुणे, संभाजी नगर, कोल्हापूर, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, नाशिक आणि सातारा इथे आयोजन केले जाणार आहे. यासोबतच मध्य प्रदेशातील इंदूर, रतलाम, खंडवा तसेच निजामाबादसारख्या इतर शहरांमध्येही याचे आयोजन करण्यात येणार आहे. या शहरांतील नामांकित बालरोगतज्ञांच्या सहयोगाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून त्यांचा सक्रिय पाठिंबा या स्पर्धेला असणार आहे. या आयोजनात संबंधित शहरांतील नामांकित बालरोगतज्ज्ञ सहकार्य करत असून ते पुरस्कार वितरणासाठी परीक्षक आणि प्रमुख अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत.

प्रत्येक स्पर्धकाला त्यांच्या प्रयत्नांबद्दल आणि सर्जनशीलतेबद्दल स्पर्धेतील सहभागाचे ई-प्रमाणपत्रदिले जाईल.

स्पर्धेची अंतिम तारीख २० फेब्रुवारी २०२६ असून, निकाल २८ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात येतील. इच्छुक स्पर्धक आपला सहभाग बालरोगतज्ज्ञांच्या दवाखान्यांमधून, रिटेल आउटलेट्समधून किंवा क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन नोंदवू शकतील.

स्पर्धक नोंदणी प्रक्रियेची माहिती मिळवण्यासाठी आणि आपला सहभाग नोंदवण्यासाठी खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करा किंवा व्हाट्सप वर ९९३००३१५८२ या क्रमांकावर असा मेसेज पाठवा.


गुरूवार दि. १२ फेब्रुवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १५७ | ७९० | १७९ | २३५ | ७८९ | २४९ | १७० | ४५० |
| ४९० | २४० | २६९ | ५७८ | २५७ | ४५६ | २६० | ३६० |
| ५८० | १६९ | ३६८ | ३७० | ६८० | ३५७ | ३५० | २७० |

| जोडी | जोडी |
|---|---|
| ३२ - ६२ - ७१ - ०१ | ४३ - ५३ - ८२ - ९२ |
| ३५ - ६५ - ७९ - ०९ | ४६ - ५६ - ८० - ९० |
| ३८ - ६८ - ७४ - ९४ | ४७ - ५७ - ८१ - ९१ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १२ फेब्रुवारी २०२६

गुरूवार दि. १२ फेब्रुवारी २०२६

सर्व बाजार साठी

१० - २० - ५३ - ८३
१९ - २९ - ५६ - ८६
१७ - २७ - ५४ - ८४
-------------------
१२८ - २०० - २४९ - १८९
२९० - ३९० - ३५७ - ३७८
५७९ - ५७० - ६९० - २६०

सर्व बाजारासाठी

| गुरू. ते शनि. ओपन डे | | | | | | गुरू. ते शनि. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७० | | २४९ | | १८० | | १२४ | | ११४ | | २३० | |
| ३६९ | ८ | १२२ | ५ | ३७९ | ९ | २७८ | ७ | २७७ | ६ | ३६६ | ५ |
| ४४० | | ४४७ | | ५६८ | | ४६७ | | ३३० | | ४४७ | |

| गुरू. ते शनि. क्लोज डे | | | | | | गुरू. ते शनि. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५७० | | ६८० | | ५६७ | | ६०० | | १२५ | | १२६ | |
| २२८ | २ | ३३८ | ४ | २६० | ८ | १२३ | ६ | २७९ | ८ | २८९ | ९ |
| १५६ | | ४०० | | ३५० | | ३६७ | | ४६८ | | ४७८ | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
० २ ४ ६ ८

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्ही दिवसभर विविध कामांमध्ये व्यस्त असाल. धावपळीपासून मुक्त होण्यासाठी स्वत:साठी थोडा वेळ काढा. तुम्ही तुमची वैयक्तिक कामे पूर्ण करण्यात व्यस्त असाल. अनावश्यक चिंता सोडून करिअरवर लक्ष द्या.

**वृषभ :** तुम्हाला कामासाठी परदेशात जावे लागू शकते. आज कोणतेही नवीन काम सुरू करण्यापूर्वी, वडिलांचा सल्ला घ्या, जे भविष्यात तुम्हाला नक्कीच फायदेशीर ठरेल. आज तुम्हाला आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते.

**मिथुन :** तुमचे आरोग्य चांगले राहील. ऑफिसमध्ये तुमच्यावर जास्त काम असेल. तुमच्या कामाच्या पद्धतींमध्ये काही बदल आवश्यक आहेत. भूतकाळातील चुकीमुळे ताणलेल्या मित्रांसोबतचे संबंध आज सुधारतील.

**कर्क :** आज नशीब तुमच्या बाजूने असेल, जे फायदेशीर ठरेल. तुमचे काम तुमच्या प्रयत्नांमध्ये गुंतलेले दिसेल. तुमची कार्यक्षमता तुम्हाला उत्कृष्ट कामे पूर्ण करण्यास सक्षम करेल. तुम्ही जमीन खरेदी करू शकता.

**सिंह :** आजचा दिवस आत्मविश्वासाने भरलेला असेल. कामाच्या ठिकाणी बढतीच्या संधी मिळतील. तुमच्या जोडीदाराचा आणि कुटुंबाचा पाठिंबा तुमच्या कामाच्या क्षमतेत आणखी सुधारणा करेल.

**कन्या :** आज नवीन माहिती मिळू शकते. अविवाहित व्यक्तींना लग्नाचे प्रस्ताव येतील. लग्नाच्या चर्चा अंतिम होतील. तुम्ही तुमच्या कुटुंबासह रात्रीच्या जेवणाची योजना आखू शकता.

**तुळ:** आज तुमच्या पद्धती बदलल्याने तुमच्या कामामध्ये सुधारणा होईल. तुमच्या दैनंदिन दिनचर्येत सकारात्मक बदल होतील. तुम्ही उधार दिलेले पैसे परत मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** दुसजयांच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका. महिलांना आज अनपेक्षित आर्थिक लाभ होऊ शकतो. जर तुम्ही नवीन जमीन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर आजचा दिवस शुभ आहे.


**धनु :** समस्येवर तोडगा काढण्यातही तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला आवडणाजया गोष्टींमध्ये तुम्ही थोडा वेळ घालवाल. यामुळे तुम्हाला आध्यात्मिक आणि मानसिक आनंद मिळेल.

**मकर:** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर असेल. या राशीखाली जन्मलेल्या बिझनेसमनना अनपेक्षित आर्थिक लाभ होतील. तुमची आर्थिक परिस्थिती चांगली असेल.

**कुंभ:** प्रेमी युगुलांसाठी आजचा दिवस खूप चांगला आहे. बाहेर थोडा वेळ घालवल्याने नाते अधिक मजबूत होईल. मार्केटिंगमध्ये काम करणाजयांचा दिवस चांगला जाईल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**मीन :** विद्यार्थ्यांना त्यांच्या मेहनतीचे चांगले परिणाम दिसतील. जर तुम्ही आज नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल तर तुमच्या कुटुंबातील सदस्यांचा सल्ला घ्या. कामात घाई नको.

## शब्दकोडे क्रमांक ३२५१




**आडवे शब्द :-**
१) कनिष्ठ व गौण गोष्टीला महत्व येणे (वा.प्र.)
७) ओझी वाहणारा
११) हात
१२) पराग
१३) विड्याची पाने कापण्याचे एक वाकडे हत्यार
१५) पुन्हा
१६) लोणच्यातील द्रवमसाला
१८) एक उभयचर प्राणी
२०) झाडाभोवतीचा कट्टा
२१) करंजी
२३) संगीतातील एक राग
२५) सर्प
२६) पिकलेली कैरी (अ.व.)
२७) लोणचे, चटणी पानात वाढून घेण्याचे छोटे साधन
२९) नोकर
३२) हिंदुस्थान
३४) नड, आवश्यकता
३६) तांबड्या पंखाचा पोपट
३९) एक शेंगभाजी
४१) वर-वधुची वाजत गाजत काढलेली मिरवणूक
४३) माघारी येणे
४४) एकत्रित रडणे
४७) चिखल
४८) गाल, तोंडाच्या दोन बाजू
५०) भूपती
५१) शिक्षक
५३) विश्रांती
५५) दुर्दशा, कष्ट, त्रास
५६) टपाल, संदेशाचा कागद
५७) अंग मोडून येणे
५८) स्तुतीस्तोत्र
५९) न वापरलेला
६०) लक्ष्मीचे एक नाव
६१) नक्षीदार ताटली
६२) समुद्रकिनारा
६७) वीर, पराक्रमी
६६) कदर करणारा
६८) कणीदार
६९) आवडणारा, प्रिय
७०) जननी
७१) नवरदेव, उर्ध्व दिशा

**उभे शब्द :-**
१) श्वसनेंद्रिय
२) कारखान्याचा मालक
३) मीठ
४) नेमका
५) पशू
६) भीती
७) तांदूळ शिजवून केलेला पदार्थ
८) उपयोग
९) शंकर
१०) काटकसर
१४) कपाटातील खण
१७) कीर्ती, आवाज
१९) बातमी
२०) पातक
२२) अवैध कामासाठी घेतलेला पैसा
३४) वाणी, बोलणे
३५) सातू, एक बारीक धान्य
३७) चाफा
३८) मान खाली घातलेला
४०) मोठी वाटी
४२) संताप, क्रोध
४५) डावखुरा
४६) यशस्वी
४७) पाच ठिपक्यांचे पत्त्याचे पाने
४९) छोटासा
५०) रजनी
५१) नमुना
५२) जिव्हा
५३) जकात
५४) डोके दुखणे
५६) तसराळे
५७) उणीव, न्यूनता
५९) औषधी गराचे कांटेरी पान
६३) रोखलेली नजर
६४) माणूस
६७) एक श्वासरोग.

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



# जिल्हा विदर्भात प्रथम, तर राज्यात तिसरा

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेत मोठी भरारी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )** - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत अमरावती जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत विदर्भात प्रथम तर राज्यात तिसरा क्रमांक मिळवला आहे. कर्ज मंजुरीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर 'ॲक्शन मोड'मध्ये असून, खाजगी बँकांच्या अनास्थेबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.



मंगळवारी (दि. 10) नियोजन भवन येथे झालेल्या जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत आर्थिक वर्ष 2025-26 साठी जिल्ह्याला 1,600 कर्ज प्रकरणांचे लक्ष्य देण्यात आले. आतापर्यंत प्रशासनाने 3,704 प्रस्ताव बँकांकडे पाठवले असून त्यापैकी 802 प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे. जिल्ह्याला अंतिम उद्दिष्ट पूर्ण करून राज्यात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी 25 फेब्रुवारी 2026 पर्यंत 100 टक्के उद्दिष्ट साधण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारी योजनांच्या कर्ज मंजुरीबाबत खाजगी बँकांकडून दाखवण्यात येणाऱ्या अनास्थेबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. आयसीआयसीआय, ॲक्सिस, एचडीएफसी आणि येस बँकांच्या अधिकाऱ्यांवर टीका करत त्यांनी भर सभेतून निघून जाण्याचे आदेश दिले. दरम्यान, नवउद्योजक युवक-युवतींच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस अमरावती येथे 'स्वरोजगार महासंमेलन' आयोजित करण्यात येणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनात स्वयंरोजगारातून तयार झालेल्या उत्पादनांसाठी विशेष स्टॉल्स उभारले जातील आणि नाविन्यपूर्ण उद्योगांना विशेष प्राधान्य दिले जाईल. प्रशासनाने बेरोजगार युवक-युवतींनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम - जिल्हा स्थिती**

| | |
|---|---|
| आर्थिक वर्ष | : 2025-26 |
| लक्ष्य कर्ज प्रकरणे | : 1,600 |
| बँकांकडे पाठवलेले प्रस्ताव | : 3,704 |
| मंजूर प्रकरणे | : 802 |
| स्थान | : विदर्भात प्रथम, राज्यात तिसरा |
| अंतिम उद्दिष्टपूर्ती मुदत | : 25 फेब्रुवारी 2026 |

# 300 कोटींच्या अतिरिक्त निधीच्या मागणीला मुख्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद

## राज्य नियोजन समितीची बैठक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )** - राज्य नियोजन समितीची बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडली. महसूल भवन येथून जिल्हाधिकारी आशिष येरेकर या बैठकीस उपस्थित होते. बैठकीदरम्यान जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी 300 कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला.

यावेळी आमदार सुलभा खोडके, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र, उपवनसंरक्षक अर्जुना के. आर., जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे तसेच संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी येरेकर यांनी जिल्ह्यातील विविध विभागांची कामे, सद्यस्थिती आणि भविष्यकालीन नियोजन याबाबत सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. अमरावती जिल्ह्यात 14 तालुके असून, इतर जिल्ह्यांच्या तुलनेत विकासकामांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सन 2025-26 च्या जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यानुसार 527 कोटी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. तर सन 2026-27 साठी 434.71 कोटी रुपयांचे स्पिलओव्हर निधीचे नियोजन करण्यात आले आहे. तथापि, लोकसंख्या, तालुक्यांची संख्या आणि भौगोलिक क्षेत्रफळ लक्षात घेता अतिरिक्त 300 कोटी रुपयांची गरज असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी आग्रहीपणे मांडले.



### गुणवत्तापूर्ण व प्रभावी कामांना निधी

मुख्यमंत्री फडणवीस यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याचा विश्वास व्यक्त केला. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून गुणवत्तापूर्ण व प्रभावी विकासकामांना आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांच्या मागणीनुसार निधीत वाढ होणार असल्याने ग्रामीण व शहरी भागातील प्रलंबित विकासकामांना गती मिळणार आहे. दरम्यान, आमदार सुलभा खोडके यांनी सन 2026-27 साठी मनपा अंतर्गत विविध विकासकामांसाठी 100 कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची विशेष मागणी केली. तसेच मनपाच्या 63 शाळांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यात नवीन लेखाशीर्ष समाविष्ट करण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली.

# चल अकेला चल अकेला.... गाण्याने दिली आत्मपरीक्षणाची हाक

## स्वामी विवेकानंद महाविद्यालयात रोजगार मेळावा संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.11 )** - कधी कधी एखादं गाणं फक्त ऐकण्यासाठी नसतं, तर ते मनाला आरसा दाखवण्यासाठी असतं. चल अकेला चल अकेला या गीताने योगेश बरडियांच्या सूरांनी संपूर्ण सभागृह काही क्षणासाठी अंतर्मुख झालं. हा फक्त सांस्कृतिक कार्यक्रम नव्हता, तर आजच्या तरुणाईला स्वत:शी संवाद साधायला लावणारा चिंतनशील क्षण होता.

आजचा युवक म्हणतो नोकरी मिळत नाही, आणि उद्योगजगत म्हणतं योग्य उमेदवार मिळत नाही. ही दरी का वाढतेय, यावर प्राची ठाकरे यांनी अत्यंत परखड पण भावनिक शब्दांत मार्गदर्शन केलं.




ओव्हरकॉन्फिडन्स, आपण सर्व जाणतो, आपल्याला शिकवायचं नाही या भावनेमुळे तरुणांच्या पायात अडथळा निर्माण होतो, असे त्यांनी स्पष्ट केले. आत्मविश्वास आणि अहंकार यातील सीमारेषा ओळखणे ही आजची खरी गरज असल्याचं त्यांचं मत होतं.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्राची विक्रम ठाकरे, (संचालक स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स अँड आर्ट्स) या उपस्थित होत्या. प्रांजली बारस्कर, सहआयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती यांनी युवकांना कौशल्य, संधी आणि वास्तव यांचा मेळ कसा घालावा, याबाबत मार्गदर्शन केलं. प्रमुख अतिथी डॉ. विवेक देशमुख, योगेश बरडिया, प्रा. किशोर तडस आणि डॉ. प्रशांत पानसे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची उंची वाढवली.

विविध कंपन्यांचे एच.आर. आणि प्रतिनिधी उपस्थित असल्याने कार्यक्रम प्रत्यक्ष रोजगाराच्या शक्यतांकडे नेणारा ठरला. प्रियंका इंगोले यांनी कार्यक्रमाचे प्रभावी संचालन केले, तर अमरदीप खाडे प्रास्ताविक मांडले आणि आशिष शहाणे कृतज्ञतेच्या शब्दांत सांगता केली. हा कार्यक्रम टाळ्यांचा गजर नव्हता, तर मनात घुमणारा प्रश्न आपण खरंच तयार आहोत का? आणि चल अकेला चल अकेला हे गाणं त्या प्रश्नाचे उत्तर शोधायला सांगणारी शांत, ठाम हाक ठरली.

## मंदिरात चोरी

**अमरावती** - चांदूर रेल्वे ठाण्याच्या हद्दीतील भिलटेक येथील मंदिरातील दानपेटीतून पन्नास हजारांची रोख लंपास करण्यात आली. भइलटेक येथील एका मंदिराच्या गाभार्याच्या आतील दाराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने दानपेटीतील रोख लांबविली.

# मोर्शीमध्ये शुक्रवारी 'मेगा कृषी क्रेडिट आऊटरीच' कार्यक्रम

## शेतकऱ्यांना कर्ज मंजुरी पत्रांचे वितरण

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि. 11 )** - सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने मोर्शी येथे येत्या शुक्रवारी, 13 फेब्रुवारी 2026 रोजी 'मेगा कृषी क्रेडिट आऊटरीच' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा शेतकरी मेळावा सकाळी 11 वाजता शिरभाते मंगलम, अमरावती रोड, मोर्शी येथे पार पडणार आहे. कार्यक्रमात बँकेच्या विविध नवीन शेती योजना सादर केल्या जातील आणि पात्र शेतकऱ्यांना प्रिन्सिपल सॅन्शन चेकचे वितरण केले जाईल. मुख्य अतिथी म्हणून मोर्शीचे उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार, गट विकास अधिकारी प्रिती खाटिंग, तसेच सेंट्रल बँकेच्या मुंबई कार्यालयाचे उपमहाव्यवस्थापक जयशंकर प्रसाद उपस्थित राहणार आहेत. बँक अधिकाऱ्यांमार्फत शेतकऱ्यांना कर्ज, शासनाच्या योजना, सबसिडी आणि व्याजदरातील सवलतींबाबत मार्गदर्शन केले जाईल. जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# अवैध रेती वाहतुकीवर महसूल विभागाची कारवाई



## निंभोरा येथे ट्रॅक्टर जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.11 )**- तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन आणि रेती वाहतुकीविरुद्ध महसूल विभागाने धडक कारवाई करत मौजा निंभोरा येथे अवैधरित्या रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त केला. ही कारवाई मंगळवारी (दि. 10) रात्री उशिरा करण्यात आली.

अचलपूर चे उपविभागीय अधिकारी आणि चांदूर बाजार चे तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचत रेतीची अवैध वाहतूक करत असलेला ट्रॅक्टर रंगेहात पकडण्यात आला. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेला ट्रॅक्टर (क्र. एमएच 29 बीसी 3763) हा दुर्योधन तायडे (रा. थुगांव पिपरी) यांचा आहे. ट्रॅक्टरसह अवैध रेती मुद्देमाल म्हणून जप्त करण्यात आली असून संबंधितांवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता तसेच गौण खनिज नियमांनुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या कारवाईत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) विलास ढोले, जगदीश पानसे, प्रतिक चव्हाण आणि पद्माकर झळके यांनी सहभाग घेतला. तालुक्यात अवैध उत्खनन व वाहतुकीविरुद्ध कारवाईची मोहीम सातत्याने सुरू असून पुढील काळातही अशा धडक कारवाया सुरू राहतील, असा इशारा महसूल विभागाने दिला आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैध रेती व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# नांदगावच्या नगराध्यक्षांनी शपथविधीच्या दिवशीच जनता दरबार घेत स्वीकारला पदभार

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर,( दि.11 )** - नगर पंचायतच्या थेट जनतेतून प्रथम महिला नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या सौ. प्राप्ती मारोटकर यांनी शपथविधीच्या दिवशीच जनता दरबार आयोजित करून पदभार स्वीकारला. यावेळी 487 नागरिकांनी आपली तक्रार लेखी स्वरूपात सादर केली. तसेच 107 लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकाम परवानगी वाटप करण्यात आली. नगराध्यक्षांनी शहरातील नाले, पाणीपुरवठा,




पथदिवे, स्वच्छता, घरकुल यासारख्या मूलभूत समस्या ऐकल्या व काही समस्यांचे तात्काळ निराकरण, तर काहींचे नियोजित निराकरण करण्याचे आश्वासन दिले. घरकुल लाभार्थ्यांना बांधकाम शुल्क पाच हजार रुपये माफ करण्यात आले. मारोटकर यांनी नगराध्यक्ष कक्षाचा खर्च स्वत: करणार असल्याचेही जनता दरबारात जाहीर केले. याआधी विरोधी गटातील नगरसेवकांनी कॅबिन खर्चाबाबत आरोप केले होते. जनता दरबारात उपनगराध्यक्ष, सभापती, महिला व बालकल्याण सभापती, नगरसेवक व कर्मचारी उपस्थित होते. शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला आणि खुल्या संवादातून प्रशासन-संवादाची नवीन परंपरा रेखाटली गेली.

# मुक्तागिरी परिसरातील मजारची तोडफोड

## कठोर कारवाईची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर (दि.11 )**- भैंसदही तालुक्यातील मुक्तागिरी परिसरातील सैय्यद शाह बाबा दर्ग्याच्या मजारची तोडफोड झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच खरपी, परतवाडा आणि अचलपूर येथील युवकांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.



युवकांनी या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवित, धार्मिक स्थळांची विटंबना सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. अशा घटना परिसरातील शांतता व सामाजिक सौहार्द बिघडवण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी म्हटले. मोहम्मद आदिल यांच्या नेतृत्वाखाली युवकांनी भैंसदही पोलीस ठाणे, तहसील कार्यालय तसेच संबंधित अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन दोषींवर कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली. मुक्तगिरी परिसरासह तालुक्यातील सर्व धार्मिक स्थळांची सुरक्षा वाढवावी व आरोपींना तातडीने अटक करावी, अशी मागणी करण्यात आली. ग्रामस्थांनीही शांतता, बंधुता आणि सामाजिक ऐक्य कायम राखण्याचे आवाहन करत प्रशासनाने त्वरित हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. निवेदन देताना रामदास बारस्कर, मोहम्मद आदिल, शोएब खान, तौफिक खान, महफूज अली, सोहेल, झिशान, अशपाक, समीर, अमीन, इमरान, नवेद, खलील, आलिम, रेहान, जुबेर, राजा, अयान, अदनान, सलमान, रिजवान, वसीम, सलीम उपस्थित होते.

## आयशर-ट्रेलर धडकेत चालकाचा मृत्यू

**अमरावती** - मंगरुळ चव्हाळा पोलीस स्टेशन हद्दीतील समृद्धी महामार्गावर आयशर ट्रक व ट्रेलर यांच्यात झालेल्या समोरासमोरच्या भीषण धडकेत चालकाचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्घटना रविवारी (दि.8) रोजी रात्री घडली. मृत चालकाचे नाव सुजित बाळू साताळकर (वय 30, रा. येवला, नाशिक) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्ग मुंबई कॉरिडॉरवरील चॅनेल 158 ते 800 दरम्यान एमएच 15/जेसी 2466 क्रमांकाचा आयशर ट्रक भरधाव व बेपर्वाईने चालविला जात होता. यावेळी ट्रकने एमएच 40/बीएल 2014 क्रमांकाच्या ट्रेलरला समोरासमोर जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की चालक सुजित साताळकर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

# साहेबराव लेंधे स्मृतिप्रीत्यर्थ भव्य महाआरोग्य शिबिर



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.11 )** - स्व. साहेबरावजी लेंधे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शालिनीताई मेघे हॉस्पिटल, नागपूर यांच्या सहकार्याने आश्रय निवास येथे भव्य मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सुमारे दोन हजार नागरिकांनी तपासणी व उपचारांचा लाभ घेतला.

शिबिराचे उद्घाटन स्वामी जितेंद्रनाथ महाराज यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार गजानन लवटे, नगराध्यक्ष अविनाश गायगोले, तहसीलदार पुष्पा सोळंके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिबिरात 1200 रुग्णांना मोफत चष्मे देण्यात आले. तसेच 60 रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. लाभार्थ्यांसाठी भोजन व्यवस्थाही करण्यात आली होती. उपक्रमाचे नियोजन वैभव लेंधे व मधुरा लेंधे यांनी केले. लेंधे परिवार व मित्रपरिवाराच्या सहकार्याने शिबिर यशस्वी ठरले. नागरिकांकडून आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पुसला पुनर्वसन भागातील विनापरवाना कॉंक्रीट मिक्सर प्लांटवरून नागरिकांमध्ये संताप

## प्रदूषणामुळे आरोग्यास धोका | तातडीने सील करण्याची मागणी







**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.11 )** - पुसला ग्रामपंचायत हद्दीत सुरू असलेला कॉंक्रीट मिक्सर प्लांट कोणतीही अधिकृत परवानगी न घेता गेल्या अनेक महिन्यांपासून कार्यरत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. संबंधित प्लांटमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात येत असून, स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पुसला पुनर्वसन भागात वसलेल्या या प्लांटमधून मोठ्या प्रमाणात धूळ, धूर आणि आवाजाचे प्रदूषण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सततच्या प्रदूषणामुळे श्वसनविकार, दमा, खोकला यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषत: लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर याचा गंभीर परिणाम होत असल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे. सकाळपासून उशिरापर्यंत सुरू असलेल्या यंत्रणेमुळे परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रारही करण्यात आली आहे.

या प्रकरणी संघर्ष सेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष टिंगणे यांनी सरपंच व सचिव, ग्रामपंचायत पुसला यांना तक्रार निवेदन सादर केले आहे. निवेदनात संबंधित कॉंक्रीट मिक्सर प्लांट विनापरवाना सुरू असल्याने तातडीने कारवाई करून तो सील करण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड मान्य नाही. नियमबाह्यपणे सुरू असलेला प्लांट तात्काळ बंद न केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा टिंगणे यांनी दिला आहे. दरम्यान, ग्रामपंचायत प्रशासन या तक्रारीची कोणती दखल घेते आणि संबंधित प्लांटवर कारवाई कधी होते, याकडे पुसला परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना कबूल केलेला पीक विमा तातडीने द्यावा!

## लोकविकास संघटनेचे मुख्यमंत्री यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि.11 )**- महाराष्ट्र शासनाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या विशेष पॅकेजमध्ये विमाधारक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर 17 हजार रुपये पीक विमा देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, घोषणा होऊनही आजपर्यंत अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा झालेली नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. राज्यात सुमारे 45 लाख विमाधारक शेतकरी असून त्यांच्यात नाराजीचे वातावरण आहे.

या पार्श्वभूमीवर लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव यांनी मुख्यमंत्री यांना तहसीलदार, चांदूरबाजार यांच्या मार्फत सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनात अतिवृष्टीमुळे उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. शासनाच्या पॅकेजमुळे दिलासा मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली होती. विशेषत: प्रति हेक्टर 17 हजार रुपयांच्या पीक विम्याची घोषणा ही अत्यंत महत्त्वाची ठरली होती. मात्र, प्रत्यक्ष मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक ताण वाढला आहे. बी-बियाणे, खते आणि दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाले असून कर्जाचा बोजा वाढत आहे. शासनाने दिलेल्या आश्वासनांची तात्काळ अंमलबजावणी करणे ही नैतिक व प्रशासकीय जबाबदारी असल्याचे निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे. पीक विम्याची रक्कम तातडीने वितरित करावी, अन्यथा राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. निवेदनावेळी गोरव वैद्य, अंकुश धाकडे, संविधान मोहोड, श्रेयस बर्वे, ऋषिकेश रडके, महादेव भालेराव, अजय सोनोने, शाम पारीसे, उमेश तायडे, जावेद पठाण, कमलेश धाडसे, आकाश खेलदार यांच्यासह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

RNINO-46975/1985 | Mahasagar Amravati | Printed published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no 9518934504 Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन. आय. नोंदणी क्र. ४६९७५/१९८५ | महासागर अमरावती | मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# अस्मिता

## दुधीचे पौष्टिक लाडू



रसगंधा

दुधीची भाजी म्हटल्यावर बरेचजण नाक मुरडतात. अनेक लहान मुलं ही भाजी खातही नाहीत. मग दुधीतले पौष्टिक घटक शरीरात जाणार तरी कसे? अशावेळी तुम्ही दुधीचे लाडू बनवू शकता. चला तर, मग ही सोपी रेसिपी जाणून घेऊ.

**साहित्य :** एक किलो दुधी, अर्धा कप तूप, २५० ग्रॅम खवा, २५० ग्रॅम साखर, चमचाभर वेलची, तीन ते चार चमचे कुटलेले काजू, बदाम, पिस्ते, एक कप डेसिगेटेड कोकोनट

**कृती:** दुधी नीट स्वच्छ करून सालं काढून छोटे तुकडे करून घ्या. बिया आणि थोडा गर काढून टाका. उरलेला दुधी किसून घ्या. एका कढईत तूप गरम करून दुधीचा किस घाला. दुधीतलं पाणी पूर्णपणे आटल्यानंतर त्यात साखर घालून परतून घ्या. मग यात खवा आणि सुका मेवा घालून मिश्रण एकजीव करून घ्या. साधारण दोन मिनिटांनी गॅस बंद करा. मिश्रण थोडं थंड झाल्यावर त्यात वेलची पूड घाला. आता या मिश्रणाचे लाडू वळायचे आहेत. हाताला थोडं तेल लावून लाडू वळायला घ्या. सर्व लाडू वळून झाल्यानंतर एका ताटलीत डेसिगेटेड कोकोनट काढून घ्या. त्यावर लाडू ठेवून नीट घोळवून घ्या. दुधीचे हे लाडू सगळ्यांना नक्कीच आवडतील.

## मिसाईल वुमन: डॉ. टेसी थॉमस

**डॉ. टेसी थॉमस या भारतातील एक अत्यंत कर्तबगार, बुद्धिमान आणि प्रेरणादायी महिला शास्त्रज्ञ आहेत. क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. देशाच्या संरक्षण क्षमतेला आधुनिक स्वरूप देण्यात त्यांचा मोठा वाटा असून त्या भारताची क्षेपणास्त्र महिला म्हणून ओळखल्या जातात. त्यांचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे अग्नी मालिकेतील क्षेपणास्त्रांच्या विकासात दिलेले नेतृत्व.**



मानिनी

डॉ. टेसी थॉमस या भारतातील एक अत्यंत कर्तबगार, बुद्धिमान आणि प्रेरणादायी महिला शास्त्रज्ञ आहेत. क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. देशाच्या संरक्षण क्षमतेला आधुनिक स्वरूप देण्यात त्यांचा मोठा वाटा असून त्या भारताची क्षेपणास्त्र महिला म्हणून ओळखल्या जातात. डॉ. टेसी थॉमस यांचा जन्मएप्रिल १९६३ मध्ये केरळ राज्यात झाला. लहानपणापासूनच गणित आणि विज्ञान विषयांमध्ये त्यांची विशेष गती होती. त्यांनी अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढे क्षेपणास्त्र तंत्रज्ञान या विषयात उच्च संशोधन केले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्या भारत सरकारच्या संरक्षण संशोधन क्षेत्राशी जोडल्या गेल्या. त्या काळात हे क्षेत्र पूर्णपणे पुरुषप्रधान होते. परंतु टेसी थॉमस यांनी आपल्या ज्ञानाच्या आणि कामाच्या जोरावर स्वतःचे स्थान निर्माण केले.

त्यांचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे अग्नी मालिकेतील क्षेपणास्त्रांच्या विकासात दिलेले नेतृत्व. या क्षेपणास्त्रांमुळे भारताची संरक्षण क्षमता अधिक मजबूत झाली. अत्यंत अचूकता, लांब पल्ल्याचे लक्ष्यभेदन आणि विश्वासार्हता ही या क्षेपणास्त्रांची वैशिष्ट्ये आहेत. या प्रकल्पाचे नेतृत्व एका महिलेने यशस्वीपणे करणे, ही बाब संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद ठरली. डॉ. टेसी थॉमस या केवळ शास्त्रज्ञ नाहीत, तर उत्कृष्ट प्रशासक आणि मार्गदर्शकदेखील आहेत. त्यांनी अनेक तरुण शास्त्रज्ञ घडवले आणि महिलांना विज्ञान क्षेत्रात पुढे येण्यासाठी प्रेरित केले. स्त्री असल्यामुळे मर्यादा येतात हा गैरसमज त्यांनी आपल्या कामातून खोडून काढला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक राष्ट्रीय सन्मान आणि पुरस्कार मिळाले आहेत. देशाच्या संरक्षणासाठी दिलेल्या सेवेमुळे त्यांचा उल्लेख भारतातील श्रेष्ठ शास्त्रज्ञांमध्ये केला जातो. मात्र, प्रसिद्धीपेक्षा कामाला प्राधान्य देणारी व्यक्ती अशीच त्यांची ओळख राहिली आहे. आजही डॉ. टेसी थॉमस या विज्ञान, संशोधन आणि संरक्षण क्षेत्राशी संबंधित कार्यात सक्रिय आहेत. त्यांचा जीवनप्रवास हे सांगतो की मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास असेल, तर कोणतीही स्त्री विज्ञानाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचू शकते. डॉ. टेसी थॉमस या केवळ क्षेपणास्त्रांची निर्माती नाहीत, तर भारताच्या सुरक्षित भविष्यासाठी काम करणाऱ्या एक शांत पण मजबूत स्त्रीशक्ती आहेत.

## डॉ. गुगलपासून सावधान

आजकाल थोडे अंग दुखतेय, ताप आलाय, पोट बिघडलेय किंवा थोडाफार त्रास होतोय असे वाटू लागले की अनेक जणी डॉक्टरकडे जाण्याआधी मोबाईल उघडतात आणि गुगलवर लक्षणे टाकतात. काही सेकंदांतच अनेक आजारांची नावे समोर येतात. वेगवेगळी माहिती मिळते. अर्थात सुरुवातीला साधी माहिती मिळाल्यासारखे वाटते. पण थोड्याच वेळात भीती वाढते. हे गंभीर तर नाही ना? असा प्रश्न मनात घर करू लागतो. म्हणूनच आरोग्याची माहिती गुगलवर शोधताना काय विश्वासार्ह आहे आणि काय धोकादायक, हे समजून घेणे फार गरजेचे आहे. सरकारी आरोग्य संस्था, मोठी रुग्णालये, मान्यताप्राप्त डॉक्टरांचे लेख, वैद्यकीय कॉलेज किंवा अधिकृत आरोग्य पोर्टल्सवर दिलेली माहिती साधारणपणे विश्वासार्ह असते. ही माहिती आजाराची ओळख, प्राथमिक काळजी, तपासणी कधी करावी याबाबत मार्गदर्शन देते. पण आपण लक्षणांवरून स्वतःच आजार ठरवायला लागलो तर मात्र प्रश्न निर्माण होतात. समजा, आपण डोकेदुखीविषयी विचारले की थेट ब्रेन ट्यूमर, छातीत दुखतेआहे असे लिहिले की हार्ट अटॅक असे टोकाचे निष्कर्ष समोर दिसतात. गुगल सर्वात वाईट शक्यता आधी दाखवतो. त्यामुळे भीती वाढते आणि लक्षणे अधिक तीव्र वाटू लागतात. व्हॉट्सॲप फॉरवर्ड्स, यूट्यूब व्हिडिओ, घरगुती उपायांचे चमत्कारिक दावे याबाबत तर विशेष सावध राहायला हवे. हे केलं की औषधांची गरज नाही, हा उपाय सर्व आजार बरे करतो अशा दाव्यांवर विश्वास ठेवणे धोकादायक ठरू शकते. काही वेळा चुकीचे उपाय शरीराला नुकसानही करू शकतात. एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, गुगल-वरची माहिती ही सर्वसाधारण असते. तुमचे वय, वजन, आधीचे आजार, चालू औषधे या गोष्टी गुगल लक्षात घेत नाही. त्यामुळे दुसऱ्याला योग्य ठरणारा सल्ला तुमच्यासाठी अपायकारक ठरू शकतो. म्हणूनच गुगलचा वापर माहिती मिळवण्यासाठी करा. उपचार ठरवण्यासाठी नाही.



प्रॅक्टीकल व्हा

## 'सवलतीं'पासून सांभाळून...




स्मार्ट शॉपिंग

इ-कॉमर्स वेबसाईट्सच्या फेस्टिवल ऑफर्समध्ये भरपूर सवलती दिल्या जातात. कपड्यांपासून विविध ॲक्सेसरीजवर ५० ते ८० टक्क्यांपर्यंत सवलत मिळते. सवलतींचे हे आकडे बघून आपले डोळेही विस्फारतात. पाच हजार रुपयांची साडी दीड हजार रुपयांना मिळतेय म्हटल्यावर आपणही खरेदी करून टाकतो. पण प्रत्यक्षात विक्रेत्यांना एवढी सवलत देणं शक्य नसतं. त्यामुळे दर्जाच्या बाबतीत फसवणूक होऊ शकते. चित्रात दिसणारा आणि प्रत्यक्षात आपल्या हातात येणारा माल कसा असेल याची अजिबात खात्री देता येत नाही. शॉपिंग वेबसाईट्स ८० टक्क्यांपर्यंत सवलती देण्याचा दावा करत असल्या तरी प्रत्यक्षात या सवलती मोजक्याच उत्पादनांवर दिल्या जातात. इतर उत्पादनांवर एवढी सवलत मिळत नाही. कपडे तसंच काही ॲक्सेसरीजवर ८० टक्के सवलत मिळते. असा सवलतीत घेतलेला माल बरेचदा जुनाही असू शकतो. तसंच काही दुकानदार जुना माल ८० टक्के सवलतीत देतात. त्यामुळे कोणतीही वस्तू खरेदी करण्यापूर्वी नीट पडताळणी करून घ्या. कमी दर्जाची वस्तू आली तर ती परत पाठवून द्या. खरेदी करण्याआधी वेगवेगळ्या साईट्स धुंडाळा. वस्तूची खरी किंमत आणि त्यावर दिली जाणारी सूट याबाबत माहिती घ्या. यानंतरच खरेदी करा. सवलतीत मिळणारी प्रत्येक वस्तू चांगली असेलच असं नाही. त्यामुळे उगाचच भरपूर खरेदी करू नका. आधी थोड्या वस्तू मागवून बघा. मगच पुढे जा. सवलतींना भुलून केलेली घाई महागात पडू शकते.

## शेंगा खाताय?



आरोग्यवेध

थंडीत भुईमुगाच्या शेंगा खाण्याचं प्रमाण वाढतं. त्यातही या दिवसात भाजलेल्या शेंगा खाल्ल्या जातात. या शेंगा खूप आरोग्यदायी असतात. शेंगांमुळे थंडीत ऊबही मिळते. मात्र अधिक प्रमाणात शेंगा खाल्ल्यास तुम्हाला त्रास होऊ शकतो. अतिप्रमाणात शेंगा खाल्ल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी...

* शेंगांमध्ये फॅट्सचं प्रमाण अधिक असतं. त्यामुळे सतत शेंगा खाल्ल्यामुळे हृदयाशी संबंधित आजार होऊ शकतात. लेक्टिन या घटकामुळे शेंगा लवकर पचत नाहीत. यामुळे आम्लपित्त, अपचनासारखे त्रास होऊ शकतात.

* शेंगा अतिप्रमाणात खाल्ल्यास यकृताला धोका निर्माण होऊ शकतो. यातल्या अफलेक्टोसिन या घटकामुळे शरीराचं नुकसान होऊ शकतं. आर्थ्रायटिसच्या रुग्णांनी शेंगा खाऊ नयेत.

* शेंगदाणे खाल्ल्याने ॲलर्जीही होऊ शकते. त्वचेवर पुरळ उठणं, खाज येणं, चेहरा सुजणं अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

* शेंगा अधिक प्रमाणात खाल्ल्यास श्वसनाशी संबंधित समस्या निर्माण होऊ शकतात. अस्थमाचं प्रमाण वाढू शकतं. थायरॉइडचा त्रास असणाऱ्यांनी शेंगा खाऊ नयेत.

## डेटा डाएट आवश्यक



टेक्नो टिप्स

आपण जेवताना डाएटविषयी विचार करतो, तसाच मोबाईलचाही विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. मोबाईलमध्ये साठणारा मजकूर, फोटो, व्हिडिओज, मेसेजेस आणि विविध ॲप्स यांचाही विचार करायला हवा. डेटा डाएट म्हणजे मोबाईलवर अनावश्यक गोष्टी कमी करणे.

आपला मोबाईल हळू चालतो, सतत अडकतो, बॅटरी लवकर संपते, अशी तक्रार अनेक जण करतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे मोबाईलमध्ये गरजेपेक्षा जास्त गोष्टी साठलेल्या असतात. जुने फोटो, पुन्हा कधी न पाहिलेले संदेश, वापरात नसलेले ॲप्स, निरुपयोगी व्हिडिओज यामुळे मोबाईल थकतो. त्याची बॅटरी तर वापरली जातेच पण स्टोअरेज कपॅसिटी पण संपते.

डेटा डाएट म्हणजे मोबाईल रिकामा करणे नव्हे, तर योग्य गोष्टी निवडून ठेवणे. रोज नको असलेले संदेश हटवणे, आठवड्यातून एकदा फोटो तपासणे, महिन्यातून एकदा वापरात नसलेले ॲप्स काढून टाकणे, ही सवय लावली तर मोबाईल हलका राहतो. महत्त्वाच्या आठवणी, कुटुंबाचे फोटो, आवश्यक कागदपत्रे मात्र जपून ठेवली पाहिजेत. डाएट म्हणजे उपवास नाही, तर संतुलन आहे. डेटा कमी ठेवल्यामुळे सुरक्षितताही वाढते. अनावश्यक ॲप्समुळे माहिती बाहेर जाण्याचा धोका असतो. मोबाईल हरवला तरी महत्त्वाची माहिती वेगळी ठेवलेली असेल तर नुकसान कमी होते. मोबाईलचा वेग कायम राहतो. म्हणजेच प्रत्येक वयासाठी याचा फायदा आहे. आरोग्यासाठी आहारावर नियंत्रण ठेवतो, तसेच डिजिटल आरोग्यासाठी डेटा डाएट आवश्यक आहे. डेटा डाएट ही काळाची गरज आहे आणि ती स्वीकारली तर डिजिटल जीवन अधिक सुटसुटीत, सुरक्षित आणि आनंदी होऊ शकते. आपण आपले घर अधून मधून आवरून ठेवतो, तसाच मोबाईल आवरायची पण सवय लावून घेतली पाहिजे. आपल्या आणि मोबाईलच्या आरोग्यासाठी ही सवय चांगलीच.

## ट्राय दिज हटके लूक्स



फॅशन पॅशन

काळा आणि पांढरा हे एव्हरग्रीन रंग आहेत. मात्र काळे आणि पांढरे कपडे घालण्याचा किंवा कुर्त्यावर ब्लॅक, व्हाईट लेगिंग घालण्याचा कंटाळा आला असेल तर तुम्ही बरीच वेगळी कॉम्बिनेशन्स करू शकता. सणासुदीच्या निमित्ताने काय करता येईल याविषयी...

* पार्टीला जाताना सीक्वेंस लूक कॅरी करता येईल. सीक्वेन्स हा प्रकारच अनोखा आणि स्टायलिश आहे. सीक्वेन्स वर्कवर फार काही करावं लागत नाही. डार्क किंवा लाईट रंगांचे सीक्वेन्स स्टाईल कपडे घालता येतील.

* मोनोक्रोमेटिक लूक हा सुद्धा चांगला पर्याय आहे. अगदी कॅज्युअल ऑकेजनपासून पार्टीपर्यंत कुठेही हा लूक कॅरी करता येईल. ऑफिसमध्ये हा लूक कॅरी करायचा असेल तर प्लेन कपड्यांची निवड करता येईल. फिरायला जाणार असाल तर प्रिंटेड कपड्यांची निवड करा.

* तुम्ही एकाच रंगाचा प्लेन ड्रेस घालू शकता. प्लेन ड्रेस साधा वाटत असला तरी यामुळे हटके लूक मिळतो. प्लेन लाँग ड्रेस किंवा शॉर्ट आउटफिट कॅरी करता येईल. इथे तुम्ह-ाला रंगांमध्येही बरेच पर्याय आहेत.

* तुम्ही मिक्स अँड मॅच किंवा काँट्रास्ट रंगांची निवड करू शकता. नेव्ही ब्लू आणि पिवळा, लाल आणि आकाशी असे रंगही छान दिसतात. डार्क नेव्ही ब्लू आणि पेस्टर ऑरेंज असं कॉम्बिनेशनही करता येईल. इथेही तुम्हाला बरेच पर्याय मिळतील.

## कधी करायचं बॉडी पॉलिशिंग?



ब्युटीमंत्रा

कडक उन्हात बाहेर पडल्यामुळे त्वचा काळवंडते. त्वचेवर काळपट डाग पडतात. इतकंच नाही, तर त्वचेचा रंगही असमान होतो. हात आणि मानेच्या रंगात फरक दिसून येतो. विशेष प्रसंगासाठी तयार होताना काळपट हात चांगले दिसत नाहीत. आता हातांचं, मानेचं टॅनिंग कसं दूर करायचं असा प्रश्न पडला असेल तर तुम्ही बॉडी पॉलिशिंगचा पर्याय निवडू शकता. यामुळे त्वचेची रया परत मिळवता येऊशकते तसंच त्वचा चमकदार दिसू लागते.

बॉडी पॉलिशिंगमुळे मृत त्वचा आणि काळपटपणा दूर झाल्याने त्वचा उजळ दिसू लागते. बॉडी पॉलिशिंगदरम्यान शरीराला मसाज मिळतो. यामुळे ताणही हलका होतो. पॉलिशिंग केल्यानंतरही आपल्याला काळजी घ्यावी लागते. पॉलिशिंगनंतर काही दिवस तरी रसायनयुक्त लोशन, क्रीम्स वापरू नयेत. साधारण दोन ते तीन दिवस उन्हातही बाहेर पडू नये. उन्हात जाणं गरजेचं असेल तर पूर्ण बाह्यांचे कपडे घाला. चेहरा नीट झाकून घ्या. सनस्क्रीन लावायला विसरू नका. जखमा किंवा भाजल्याच्या खुणा असणाऱ्या भागात पॉलिशिंग करू नका.

नियमित पोहायला जाणाऱ्यांनी बॉडी पॉलिशिंग करून घ्यायला हवं. पाण्यातल्या क्लोरिनमुळे त्वचा काळपट होते. पॉलिशिंगमुळे त्वचेला चमक मिळते. पाठीवर पुरळ उठल्यानंतर पडणारे डाग वाईट दिसतात. हे डाग पुसट करण्यासाठी स्क्रीन लाईटनिंग बॉडी मसाज करू शकता. लग्नप्रसंगी छान दिसण्यासाठी बॉडी पॉलिशिंग करून घेता येईल.

हेअर केअर

### थंडीसाठी हेअर मास्क



थंडीमध्ये त्वचेसोबत केसांचीही विशेष काळजी घ्यावी लागते. थंडीत केसांमध्ये कोंडा होतो, खाज सुटते. केस कोरडे होऊ लागतात. या दिवसात काही हेअर मास्क तुमच्या मदतीला येऊ शकतात. तुम्ही मिल्क प्रोटिनबद्दल ऐकलं आहे का? थंडीत दुधा-पासून पोषण मिळवता येईल. कपभर कच्च्या दुधात दीड चमचा मध घाला. हे मिश्रण केसांवर लावून अर्धा तास ठेवा. यानंतर केस शँपूने धुवा. आठवड्यातून दोन वेळा असं केल्यामुळे केस मुलायम होतील. अर्धा कप दह्यात एक पिकलेलं केळं घालून मास्क तयार करा. केस खूप राठ असतील तर या मास्कमध्ये दोन चमचे ऑलिव्ह ऑईल मिसळा. टाळूवर हा मास्क साधारण ४५ मिनिटं लावा. त्यानंतर शँपूने धुवून टाका.

स्मार्ट टिप्स

### नखांच्या सौंदर्यवर्धनासाठी...



लांबुळक्या नखांमुळे हात खूप छान दिसतात. नखांचं सौंदर्य वाढवण्यासाठी तुम्ही काही उपाय करू शकता. साधासा लसूण तुमच्या नखांचं सौंदर्य खुलवेल. लसणाचे तुकडे करून घ्या. त्यातला रस काढा. हा रस कापूस किंवा बोटांनी नखांना लावा. लसणाच्या रसामुळे नखं टणक होतात. त्यांची वाढही वेगाने होते. दररोज साधारण दोन ते तीन मिनिटं नखांवर लसूण चोळा. काही दिवसांनी नखांमध्ये फरक जाणवू लागेल.

किचन टिप्स

### टिकवून ठेवा चटणी



बऱ्याच पदार्थांसोबत हिरवी चटणी लागते. मग सारखी चटणी बनवत बसायला कंटाळा येतो. हिरवी चटणी साधारण आठवडाभर टिकते. मात्र काही टिप्स फॉलो करून तुम्हाला चटणी सहा महिने टिकवता येईल. चटणी तयार केल्यानंतर बर्फाच्या ट्रेमध्ये भरा. चटणीचा बर्फ होईल. खाण्याआधी काही काळ चटणी बाहेर काढून ठेवा. चटणीचा रंग बदलला तरी चव कायम राहील. चटणी अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी त्यात थोडं तेल घालता येईल. वाटीभर चटणीत छोटा चमचा ऑलिव्ह ऑईल घालता येईल. ही चटणी काचेच्या बाटलीत भरून फ्रीजमध्ये ठेवा आणि हवी तेव्हा खा.

### फडणवीस, बावनकुळेंच्या अनुमतीनेच
## चंद्रपूर मनपाचा निर्णय



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
उबाठा आणि भाजप युतीबाबत मी स्वतः कोठेकर यांच्याशी दिवसातून चारदा चर्चा करायचो. बावनकुळे यांच्याशी चर्चा करायचो आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अनुमती घेतली. जेव्हा उबाठाला एक वर्ष देण्याची चर्चा सुरू असताना मुख्यमंत्र्यांना या संदर्भातील माहिती दिली तेव्हा मुख्यमंत्री म्हणाले एक वर्ष नाही गरज असेल तर सव्वावर्ष द्या. महापौर हा भाजपचा झाला पाहिजे, पहिले महापौर आमच्याकडे असावा, असे भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, चंद्रपूर भाजपमध्ये दोन गट आहे हे सर्वांना माहिती आहे त्यामुळे काही कार्यकर्ते चाणाक्य, किंगमेंकर अशी बॅनरबाजी करतात. कार्यकर्त्यांना गटनेता आपल्या गटाचा झाला नाही याचे वाईट वाटले होते पण महापौर आपला झाल्याने त्यांना आनंद झाला. कुणी क्रेडिट घेऊन काय फायदा करार कुणासोबत झाला आहे? असा टोला आमदार जोरगेवार यांना लगावला आहे.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अनुमतीने संगीताताई खांडेकर यांचे नाव रवींद्र चव्हाण यांनी लेखी दिल्यावर आमच्या पक्षाच्या दुसऱ्या एका नेत्याने सारिकाताई संदूरकर यांना भरीस घातले आणि कारण दिले की पक्षाच्या उमेदवाराचा अर्ज बाद झाला तर काय? मग तोच नियम त्यांच्या गटाचे उपमहापौर होते त्यांचे नाव आले तिथे तसे झाले नाही, असे म्हणत आमदार किशोर जोरगेवार यांच्यावर नाव न घेता टीका केली आहे.

# आता जमिनीसाठी एनए परवानगीची गरज नाही

### जमीन महसूल कायद्यात सरकारचा बदल : लाखो शेतकऱ्यांना दिलासा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्याच्या जमीन महसूल कायद्यात मोठा बदल केला आहे. त्यानुसार, आता शेतकऱ्यांना बिगर कृषी (एनए) वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेण्याची कोणतीही गरज नाही.आता बांधकाम आराखडा मंजुरीलाच एनए मानले जाणार आहे. सरकाच्या या निर्णयाचा हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार जमीन महसूल कायद्यात बदल केला आहे. या बदलानुसार, आता अकृषक कर आकारला जाण्याची सुविधा पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. जमीन मालकांना फक्त एकरकमी 'रुपांतरण अधिमूल्य' भरावे लागेल.

या रकमेच्या भरपाईनंतर जमीन अकृषक वापरासाठी रुपांतरित करता येणार आहे. याशिवाय शेतकऱ्यांना सनद घेण्याची गरजही संपुष्टात आली आहे. बांधकाम आराखडा मंजुरीलाच एनए परवानगी मानली जाईल. यामुळे जमीन रुपांतर प्रक्रिया अधिक जलद, सोपी व पारदर्शक होईल.



उल्लेखनीय बाब म्हणजे आतापर्यंत अकृषक वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक होते. यासाठी विविध दस्तऐवज गोळा करताना शेतकऱ्यांच्या नाकीनऊ येत होते. पण महसूल विभागाने तयार केलेल्या नवीन कार्यपद्धतीनुसार शेतकऱ्यांचे काम अधिक सुलभ व सोपे होणार आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे जमीन रुपांतर प्रक्रियेत सुलभता येईल. याशिवाय अकृषक कराचाही त्रास संपेल. महसूल विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता येईल. जमीन मालकांच्या वेळेची बचत होऊन त्यांचा प्रशासनाकडे हेलपाटे मारण्याचा त्रास कमी होईल. विशेषतः यापुडे त्यांना जमिनीचा एनए मिळवण्यासाठी अनेक महिने किंवा वर्षांची प्रतिक्षा करावी लागणार नाही. केवळ रुपांतरण अधिमूल्य भरून ते आपली जमीन अकृषक वापरासाटी रुपांतरित करता येणार आहे.

दुसरीकडे, राज्य विधिमंडळाच्या मुंबईत होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सोमवार, २३ फेब्रुवारी ते बुधवार, २५ मार्च पर्यंत निश्चित करण्यात आले आहे. तसेच ६ मार्च रोजी अर्थसंकल्प मांडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहांमध्ये दिवंगत अजित पवारा यांच्या अपघाती निधनाविषयी शोक प्रस्ताव मांडण्यात येणार आहे.

अधिवेशन काळात शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी शासकीय सुट्टीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज होणार आहे आणि सोमवार, २ मार्च रोजी होळी आणि ३ मार्च रोजी धूलिवंदन असल्याने कामकाज होणार नाही. १९ मार्चला गुढीपाडव्याची सार्वजनिक सुट्टी असल्याने या दिवशी कामकाज होणार नाही. २० मार्च रोजी देखील विधिमंडळ कामकाज होणार नाही.

### ३७ प्रवासी जखमी

■ वाशिम, दि. ११ :
मार्गावरून जाणाऱ्या एसटी बसच्या मधात अचानक दुचाकी आली. त्या दुचाकी स्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात एसटी बस उलटून भीषण अपघात घाल्याची घटना वाशीम जिल्ह्यात बुधवारी दुपारी घडली.

३७ प्रवासी जखमी झाले असून, रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## डीजीसीए अहवालानंतरच चौकशी ठरेल : डॉ. भोयर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
अजित पवार यांच्यासारखे नेते अपघातात गेल्यानंतर त्यांच्या जवळच्या व्यक्तीकडून अनेक वेगवेगळे विधान करण्यात आली. रोहित पवारांनी काल त्रयस्थ एजन्सी मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे. पण त्यांचे नेते शरद पवार यांनी यापूर्वीच सांगितले आहे की अजित पवारांच्या विमानाचा अपघात झाला आहे, यावर कुणी राजकारण करू नये. यावर ज्या ज्या शंका होत्या त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे आदेश आधीच दिले आहेत, असे राज्यमंत्री पंकज भोयर यांनी म्हटले आहे.



पंकज भोयर म्हणाले की, विमान अपघात प्रकरणी जे जे विभाग असतात त्यांच्या माध्यमातून चौकशी सुरू आहे.आपल्या देशातील चौकशी संस्था या सक्षम आहेत, चौकशीतून जे काही घडले ते समोर येईल. आपल्या ज्या संस्था आहेत ज्या चौकशी करत आहेत त्या सक्षम आहेत, यात जर काही चुकीचे घडले असेल तर संबंधितावर कारवाई करण्यात येईल. विमान कंपनीबाबत डीजीसीएच्या अहवालानंतर चौकशीचा निर्णय होईल, असेही भोयर यांनी म्हटले आहे.

पंकज भोयर म्हणाले की, सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री करण्याचा निर्णय त्यांचा पक्षाचा होता. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा केली आणि पुढील घडामोडी घडल्या असे म्हणत त्यांनी रोहित पवारांनी केलेला दावा खोडून काढला. सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री व्हायचे नव्हते, असे रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत म्हटले होते.

# स्टंट की स्टेटस? पालक कुठे चुकतात?




■ स्वप्निल दुधारे, मुंबई, दि. ११ :
अलीकडील काळात सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी तरुणांकडून धोकादायक बाईक स्टंट्स करण्याच्या घटना वाढत आहेत. स्टंट की स्टेटस, आणि पालक कुठे चुकतात? या विषयावर महासागर डिजिटल चैनल वर चर्चासत्राचा आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन महासागर डिजिटल चे संपादक स्वप्निल दुधारे यांनी केले. या चर्चासत्रात महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित, दैनिक महासागरचे समूह संपादक संदीप काळे, नवी मुंबईच्या पोलीस मित्र विजया कदम, पुण्यातील वरिष्ठ पत्रकार आशिष तिवारी तसेच प्राचार्य प्रशांत बुक्कावार सहभागी झाले होते. या चर्चेतून अनेक महत्त्वपूर्ण मुद्दे पुढे आले.

**कायदा आणि शिस्त यावर प्रवीण दीक्षित यांचे भाष्य**

माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी स्पष्ट केले की, बाईक स्टंट्स हा केवळ वैयक्तिक धोक्याचा विषय नसून तो सार्वजनिक सुरक्षेचाही प्रश्न आहे. रस्त्यावर स्टंट करणे हे कायद्याने गुन्हा असून यामुळे निरपराध नागरिकांचाही जीव धोक्यात येतो. केवळ दंडात्मक कारवाई पुरेशी नसून पालक आणि समाजानेही जबाबदारी घेतली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

**माध्यमांची भूमिका : संदीप काळे**

दैनिक महासागरचे समूह संपादक संदीप काळे यांनी सांगितले की, सोशल मीडियावरील व्हायरल संस्कृतीमुळे तरुणांमध्ये ‘लाईक्स’ आणि ‘फॉलोअर्स’ मिळवण्याची स्पर्धा वाढली आहे. काहीवेळा माध्यमांमधून अशा घटनांचे अतिरेकी चित्रण होते, ज्यामुळे चुकीचा संदेश जाऊ शकतो. सकारात्मक आदर्श निर्माण करणे ही माध्यमांची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**समाज आणि पालकांची जबाबदारी : विजया कदम**

नवी मुंबईच्या पोलीस मित्र विजया कदम यांनी सांगितले की, अनेकदा पालक मुलांना महागड्या बाईक्स देतात, पण त्यांना वाहतूक नियम आणि सुरक्षिततेचे शिक्षण देण्यात कमी पडतात. मुलांशी संवादाचा अभाव ही मोठी समस्या आहे. वेळोवेळी मार्गदर्शन आणि नियंत्रण आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**सोशल मीडियाचा प्रभाव आशिष तिवारी**

वरिष्ठ पत्रकार आशिष तिवारी यांनी नमूद केले की, सोशल मीडियावर स्टेटस टिकवण्यासाठी तरुण धोकादायक कृत्ये करतात. मित्रमंडळींमध्ये वेगळेपण दाखवण्याची मानसिकता आणि प्रसिद्धीची लालसा यामुळे स्टंट्सची प्रवृत्ती वाढते. या मानसिकतेवर काम करण्यासाठी शाळा, पालक आणि समाज यांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**शैक्षणिक दृष्टीकोन : प्राचार्य प्रशांत बुक्कावार**

प्राचार्य प्रशांत बुक्कावार यांनी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वाहतूक सुरक्षिततेबाबत जनजागृती कार्यक्रम राबवण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांना शिस्त, जबाबदारी आणि कायद्याचे भान लहानपणापासून दिले पाहिजे. पालकांनी मुलांच्या ऑनलाईन क्रियाकलापांवरही लक्ष ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

(महाराष्ट्रभरातील सर्व राजकीय विश्लेषण आणि घडामोडी पाहण्यासाठी आजच महासागर न्यूज ला सबस्क्राईब करा तसेच वरील चर्चासत्र लाईव्ह पाहण्यासाठी सोबत असलेल्या स्कॅनर वरती स्कॅन करा )

या चर्चासत्रातून स्पष्ट झाले की, स्टंट की स्टेटस हा केवळ तरुणांचा प्रश्न नसून तो कुटुंब, समाज, माध्यमे आणि प्रशासन या सर्वांचा आहे. केवळ कारवाई नव्हे तर योग्य मार्गदर्शन, संवाद आणि सकारात्मक वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे.धोकादायक स्टंट्सपेक्षा सुरक्षितता आणि जबाबदारी हेच खरे ‘स्टेटस’ आहे, असा एकमताचा सूर या चर्चेत उमटला.

या कार्यक्रमात पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल हे सहभागी होणार होते पण वरिष्ठांच्या महत्वपूर्ण बैठकीमुळे त्यांना सहभागी होता आले नाही.

## अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार

### गर्भवती झाल्यानंतर घटना उजेडात : पाचही आरोपी ताब्यात
### चांदूर रेल्वेच्या घटनेवरून सर्वत्र संतापाची लाट

■ महासागर प्रतिनिधी
चांदूर रेल्वे, दि. ११ :
चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर पाच जणांनी सामूहिक अत्याचार केल्याची गंभीर घटना समोर आली असून, या अत्याचारातून मुलगी गर्भवती राहिल्याचे उघडकीस आल्यानंतर सदर प्रकरण उजेडात आले आहे. या प्रकरणी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना ७ जुलै २०२५ ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घडली. पीडित अल्पवयीन मुलगी गावातून शाळेत जात असताना आरोपींशी तिचा संपर्क आला. त्यानंतर आरोपींनी वेगवेगळ्या धमक्या देत तिच्यावर अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, मुलीची प्रकृती अचानक बिघडल्याने तिच्या आईने तिला दवाखान्यात नेले. तपासणीदरम्यान मुलगी गर्भवती असल्याचे समोर आले व यानंतर संपूर्ण प्रकार उघडकीस आला. त्यावरून मुलीच्या आईने चांदूर रेल्वे ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून पोलिसांनी अजिंक्य गजानन शेलोकार (वय १९), संकेत विनोद काळे (वय २३), कार्तिक गजानन शेलोकार (वय २१) तसेच दोन विधीसंघर्षित बालक अशा पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सर्व आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास एसडीपीओ अशोक थोरात करीत आहे.

## डबल सुपर ओव्हरचा थरार; द. आफ्रिका विजयी

अहमदाबाद, दि. ११ वृत्तसंस्था

अफगाणिस्तान व दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामना अगदी थरारक झाला. दोन्ही संघांनी कडवी झुंज दिली आणि दोन सुपर ओव्हर झाल्यानंतर सामन्याचा निकाल लागला. पहिल्या सुपर ओव्हरमध्ये दोन्ही संघांनी १८-१८ धावा केल्याने सामना पुन्हा टाय झाला. त्यानंतर दुसरी ओव्हर खेळवली गेली. दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये मात्र अखेरच्या चेंडूवर ५ धावांची गरज असताना रहमानुल्ला गुरबाज झेलबाद झाला आणि दक्षिण आफ्रिकेने सामना जिंकला.

दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये ट्रिस्टन स्टब्स व डेव्हिड मिलर फलंदाजीला आले आणि अजमतुल्ला गोलंदाजी करत होता. पहिल्या चेंडूवर स्टब्सने षटकार खेचला. तर दुसऱ्या चेंडूवर १ धाव आणि तिसऱ्या चेंडूवर २ धावा घेतल्या. यानंतर सलग दोन चेंडूंवर मिलरने षटकार खेचले. यानंतर अखेरच्या चेंडूवर २ धावा घेतल्या आणि अफगाणिस्तानला विजयासाठी २४ धावांचं आव्हान दिलं. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानकडून मोहम्मद नबी व अजमतुल्ला फलंदाजीला उतरले. केशव महाराजने पहिला चेंडू डॉट बॉल टाकला. तर दुसऱ्या चेंडूवर नबी झेलबाद झाला. त्यानंतर रहमानुल्ला मैदानात आला. त्याने सलग ३ चेंडूंवर षटकार लगावले. तर सहावा चेंडू केशव महाराजने वाईड टाकला. यासह अखेरच्या चेंडूवर ५ धावांची गरज असताना रहमानुल्ला मोठा फटका खेळताना झेलबाद झाला. यासह अफगाणिस्तानने सामना गमावला. दक्षिण आफ्रिकेने सामन्यात विजय मिळवला असला तरी अफगाणिस्तानच्या कामगिरीने मात्र सर्वांची मने जिंकली आहेत.



## १७ ते १९ फेब्रुवारीदरम्यान मुंबई क्लायमेट वीकचे आयोजन

मुंबई, दि. ११ प्रतिनिधी

१७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मुंबईत पहिला 'मुंबई क्लायमेट वीक' (MCW) आयोजित केला जाणार असून, ग्लोबल साउथमधील मोठ्या प्रमाणावर नागरिकांच्या पुढाकारातून राबवला जाणारा हा पहिलाच हवामान कृती मंच ठरणार आहे. या उपक्रमात जागतिक नेते, धोरणकर्ते, उद्योगजगत, नागरिक संघटना आणि हवामान क्षेत्रातील नवोन्मेषक सहभागी होणार आहेत. या तीन दिवसांत उपराष्ट्रीय हवामान कृती, भविष्यकालीन शहरे आणि हवामान वित्तपुरवठा यांसारख्या विषयांवर विशेष अधिवेशने होणार आहेत. विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि वरिष्ठ नेते यात सहभागी होऊन नेट-झिरो आणि हवामान-प्रतिरोधक विकासात राज्ये व शहरांची भूमिका अधोरेखित करतील. १०० हून अधिक संस्थांमधील ४०० पेक्षा जास्त वक्ते या परिषदेत सहभागी होण्याची अपेक्षा आहे. बिल गेट्स, हिलरी क्लिंटन, केंद्रीय मंत्री, आंतरराष्ट्रीय सरकारी प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील नेते, समाजसेवक, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर तसेच भारतीय अवकाश क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींचाही सहभाग अपेक्षित आहे. ३० हून अधिक देशांचे प्रतिनिधीमंडळ उपस्थित राहणार आहे.

'प्रोजेक्ट मुंबई' या स्वयंसेवी संस्थेतर्फे महाराष्ट्र शासन, पर्यावरण व हवामान बदल विभाग, एमएमआरडीए आणि बृहन्मुंबई महापालिका यांच्या सहकार्याने या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतासह इतर ग्लोबल साउथ शहरांमध्ये विस्तारता येतील अशा हवामान उपाययोजनांसाठी मुंबईला 'लिव्हिंग टेस्ट-बेड' म्हणून सादर करण्याचा उद्देश आहे.

"मुंबई ही जिद्द आणि कल्पकतेची नगरी आहे. 'मुंबई क्लायमेट वीक'मध्ये हीच भावना हवामान संकटासमोर ठोस कृतीत उतरवली जाईल. मंत्र्यांपासून उद्योग नेते आणि तज्ज्ञांपर्यंत सर्वजण विद्यार्थी, अग्रभागी काम करणारे कर्मचारी आणि स्वयंसेवकांसोबत एकाच व्यासपीठावर येतील. ग्लोबल साउथमधील हवामान नेतृत्व कसे असावे, याचा संदेश मुंबई देईल," असे प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मुंबई क्लायमेट वीक हा शहरापासून जागतिक पातळीपर्यंत हवामान कृतीत भारताच्या नेतृत्वाचा दृढ संकल्प दर्शवतो. भारत आणि जगभरातील नेत्यांचे मुंबईत स्वागत करताना आम्ही स्पष्ट संदेश देत आहोत की महाराष्ट्र स्वच्छ, सुरक्षित आणि अधिक सक्षम भविष्यासाठी सर्व भागीदारांसोबत काम करण्यास तयार आहे."

## आम्ही एनडीएमध्ये आहोत आणि राहणार- तटकरे

नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था

आज सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. दरम्यान राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांनी या भेटीबद्दल, तसेच दोन्ही राष्ट्रवादी गटाच्या विलीनीकरणाबाबत महत्त्वाचे भाष्य केले आहे. आज राजकीय चर्चेचा विषय नव्हताच, आज फक्त दादांच्या दुर्दैवी अकाली निधनानंतर जी जबाबदारी धिरोदत्तपणे वहिनींनी सांभाळली आहे, त्याबद्दलच्याच संवेदना व्यक्त करण्यात आल्या असे सुनील तटकरे म्हणाले. तटकरे म्हणाले की, आम्ही एनडीएमध्ये आहोत. दादा असतानाच मी वारंवार भूमिका स्पष्ट केली की, आम्ही दादांच्या नेतृत्वाखाली सामूहिकरित्या एनडीए सोबत जाण्याचा निर्णय घेतला. तो कालही होता, आजही आहे आणि उद्या भविष्यामध्येही राहिल. त्यामुळे एनडीएमध्ये येण्याबाबतची स्पष्टता कोणीतरी करणे आवश्यक आहे, असे तटकरे म्हणाले.

कृषी उत्पन्न बाजार समिती, कारंजा लाड जि. वाशिम

कारंजा – मानोरा विधानसभा मतदार संघाच्या
मा.आ. श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



श्रीमती सईताई डहाके
आमदार कारंजा–मानोरा मतदार संघ तथा सभापती कृ.उ.बा.स. कारंजा लाड

- शासनाचे स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत राज्यातील २–या क्रमांकाची उत्कृष्ट सेवा देणारी बाजार समिती.
- शेतमाल विक्री करणाऱ्या शेतकरी बंधुसाठी ५ रु.मध्ये जेवणाची व्यवस्था
- शेतमाल तारण योजना • इलेक्ट्रॉनिक्स काट्यानेच तंतोतंत मोजमाप • तातडीने पेमेंट
- आर.ओ. थंड पाण्याची व्यवस्था
- शेतकऱ्यांसाठी ७/१२, फेरफार, कोतवाल बुक, हक्क नोंदणी काढण्याची (अद्ययावत) मशिनद्वारे सुविधा.
- एस.एम.एस.द्वारे बाजारभाव • राष्ट्रीय कृषी बाजार (ई–नाम) योजना

निलेश नरेंद्र भाकरे – सचिव
प्रकाश वासुदेव लिंगाटे – उपसभापती

संचालक मंडळ : नितीन श्रीराम नेमाने, विरेंद्र विठ्ठलराव चारथळ, श्रीमती सुनंदाबाई देवीदास गुंजाटे, दिनेश सुभाषराव राठोड, साहेबराव जंगलाजी तुमसरे, हसन कालू चौधरी, बाबुराव मधुकर चौधरी, प्रविण मनोहर उर्फ भिमराव वानखडे, सौ. कावेरी मारोती पारे, रविंद्र मधुकर घुले, ब्रिजमोहन श्यामसुंदर मालपाणी, विजय नामदेवराव हिवाळे, देवेंद्र बाबाराव राऊत, अरूण सुधाकर वानखडे, बालचंद धनसिंग जाधव, अनिल गुलाबराव पाकधने

सर्व कर्मचारीवृंद कृषी उत्पन्न बाजार समिती, कारंजा, जि. वाशिम

## शासकीय धान्य गोदामाची सुरक्षा वाऱ्यावर



■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. ११ :
देसाईगंज-आरमोरी या महामार्गालगत विश्रामगृहासमोर शासकीय धान्य साठवण्यासाठी व सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून रेशन दुकानदारांना धान्य वितरण करण्यासाठी असलेल्या शासकीय गोदाम सभोवताल संरक्षण भिंत बांधण्यात आली आहे. मात्र, एका बाजूने भिंत बांधकाम अर्धवट असल्याने धान्य चोरीला जाऊन शासकीय धान्य गोदामाची सुरक्षा धोक्यात आली आहे.

देसाईगंज तालुक्यात २० ग्रामपंचायती अंतर्गत ३९ गावे असून प्रत्येक गावाला शासकीय रेशन दुकानांच्या माध्यमातून रेशनच्या धान्याचा पुरवठा करण्यात येतो. खरेदी केलेल्या धानाची स्थानिक राईसमिलर्स मार्फत भरडाई करून सिएमआर तांदूळ शासकीय गोदामात जमा करण्यात येतो. शिधापत्रिका धारकांना दिले जाणारे धान्य याच गोदामात साठवून सार्वजनिक वितरणाकरीता उपलब्ध करून दिले जाते.

सदरच्या गोदामात शासनाच्या कोट्यवधी रुपये किंमतीचे रेशनचे धान्य जमा असल्याने गोदामाची सुरक्षा करणे तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाची जबाबदारी आहे. असे असतांना सभोवताल संरक्षण भिंतीचे बांधकाम करून एका बाजूने बांधकाम अर्धवट ठेवण्यामागचे कारण मात्र गुलदस्त्यात आहे. पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर गोदामाची सुरक्षा वाऱ्यावर सोडून दिल्याचा आरोप केला जात आहे.

देसाईगंज शहराची लोकसंख्या ४० हजाराच्या घरात असून रेल्वेमुळे शहर दोन भागात विभागले गेले आहे. शहरात भुरट्या चोऱ्या, दारू तस्करी, प्रतिबंधीत सुगंधित तंबाखू तस्करी नित्याचीच बाब झाली असून शासकीय गोदामाची संरक्षण भिंत एका बाजूने खुली असल्याने चोरांसह तस्करांना लपण्यासाठी आयतेच रान मोकळे मिळत आहे. अलिकडे मजबूत शटर तोडून देखील चोरांनी चोऱ्या केल्याचे वास्तव असतांना पुरवठा विभागातील अधिकारी मात्र झोपेचं सोंग घेऊन आहेत.

दरम्यान शासकीय गोदामाचीच सुरक्षा वाऱ्यावर असल्यामुळे अन्न धान्याच्या पुरवठ्यात अनियमितता नसेल काय?असा प्रश्न उपस्थित केल्या जाऊ लागला आहे. जिल्हाधिकारी यांनी तात्काळ या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन खुल्या संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याचे आदेश पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांना देण्याची मागणी करण्यात येत आहे.



# गेली २५ वर्षे मुंबईचा विकास ठप्प

## एकनाथ शिंदेंची उबाठावर टीका : आता फडणवीसांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामे सुरू

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :**

मुंबईकर गेल्या २५ वर्षांपासून विकासापासून वंचित होते, आणि शहराला जलद आणि व्यापक विकासाची आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महायुती सरकार मुंबईच्या विकासासाठी सातत्याने काम करत आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महापौर-उपमहापौर यांच्या निवडीनंतर माध्यमांशी बोलताना म्हटले आहे. तर मुंबईकरांच्या विकासासाठी महायुती सरकारने विविध उपक्रम राबवत असल्याचेही त्यांनी सांगितले.

एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते की झोपडपट्टी मुक्त मुंबई करायची त्यासाठी आम्ही ४० लाख लोकांना घरे देणार आहोत, याची सुरुवात एसआरएच्या माध्यमातून आम्ही केली आहे. मुंबईकरांनी महायुतीला कौल देत खऱ्या अर्थाने विकासाला स्वीकारले आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले की, महापौरपदी बिनविरोध रितू तावडे तर उपमहापौरपदी संजय घाडी यांची निवड झाली आहे त्यांचे मी अभिनंदन करतो. हे दोघेही अनुभवी नेतृत्व आहेत. गेल्या साडेतीन वर्षांमध्ये आम्ही मुंबईच्या विकासाला आम्ही चालना दिली त्यामुळे जनतेने आम्हाला निवडून दिले आहे. आमच्या आश्वासानावर आणि वचनावर मुंबईकरांनी विश्वास दाखवत त्यांनी आम्हाला निवडून दिले आहे.



**खड्डेमुक्त, भ्रष्टाचारमुक्त, प्रदूषणमुक्त मुंबई करणार**

एकनाथ शिंदे म्हणाले की, मुंबईकरांना विकास पाहिजे म्हणून त्यांनी महायुतीला स्वीकारले आहे. शहरातील नागरिकांना खड्डेमुक्त मुंबई पाहिजे, भ्रष्टाचारमुक्त, आणि प्रदूषणमुक्त मुंबई झाली पाहिजे. तर शुद्ध पिण्याचे पाणी नागरिकांना मिळाले पाहिजे, अशी भूमिका महायुतीची आहे.

महायुती सरकार या ध्येयासाठी कटिबद्ध असून, शहराच्या जागतिक स्तरावरील विकासासाठी राज्य सरकार आवश्यक ती मदत करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बाळासाहेब ठाकरे यांना अपेक्षित असलेली मुंबई महाराष्ट्र करेल.

महायुतीचे सरकार हे नियमबाह्य काम करत नाही. दोन्ही राष्ट्रवादीने विकासाला पाठिंबा दिला आहे त्यांना माहिती आहे महायुती विकास करत आहे, त्यांना विकास पाहिजे म्हणून ते आमच्यासोबत येत आहेत, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## माझ्या हत्येचा कट

■ **मुंबई :** भाजपचे माजी आमदार राम सातपुते यांनी आपल्या जीवाला धोका असल्याचा गंभीर दावा करत, आपल्या हत्येचा कट रचला गेल्याचे म्हटले आहे. या



संदर्भात पोलिसांना आधीच गुप्त माहिती मिळाल्याने माळशिरस तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून पोलिसांनी तळ ठोकल्याची माहिती त्यांनी दिली. काही व्यक्तींना ताब्यात घेऊन चौकशी सुरू असल्याचे, तसेच त्यांच्या बँक व्यवहारांचीही तपासणी होत असल्याचे सातपुते यांनी सांगितले. हा प्रकार कॉन्ट्रॅक्ट किलिंग स्वरूपाचा असल्याचा संशय पोलिस आणि गुप्तचर यंत्रणांनी व्यक्त केल्याचे ते म्हणाले.

ग्रामविकास मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यापूर्वीच सातपुते यांच्या हत्येचा कट रचला गेल्याची माहिती मिळाल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर सातपुते यांनी माध्यमांशी संवाद साधत या विषयावर आपली भूमिका स्पष्ट केली. निवडणुकीच्या काळातच गुप्तचर विभाग आणि जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांना याबाबत काही माहिती मिळाली होती, त्यावरून तपास सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

## भाजपचा बंडखोरांना दणका

■ **पुणे :** भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरोधात बंडखोरी करणाऱ्या पुण्यातील ६९ पदाधिकाऱ्यांवर ६ वर्षे निलंबनाची कारवाई केली आहे.

राज्यात नुकत्याच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पार पडली. त्यात पक्षाने उमेदवारी नाकारल्यामुळे जवळपास सर्वच पक्षांना बंडखोरीचे ग्रहण लागले. विशेषतः भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात बंडखोरी उफाळून आली होती. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवणाऱ्या बंडखोरांवर ६ वर्षांच्या निलंबनाची कठोर कारवाई केली. या प्रकरणी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना अपक्ष किंवा इतर पक्षाच्या माध्यमातून निवडणूक लढवणाऱ्या कार्यकर्त्यांवर पक्षशिस्तीचा भंग केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

निलंबित पदाधिकाऱ्यांना ६ वर्षांपर्यंत पक्षाच्या कामकाजापासून दूर ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत त्यांना कोणतीही संघटनात्मक जबाबदारी किंवा पद दिले जाणार नाही. त्यांच्याविषयी कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नाही, असा कठोर संदेश या कारवाईच्या माध्यमातून भाजपने दिला आहे.

## राज ठाकरेंनी मोदींच्या जवळ जावे!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका कार्यक्रमात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी संघाची भूमिका, कार्यपद्धती आणि समाजातील योगदान याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला चित्रपटसृष्टीतील काही नामांकित कलाकार उपस्थित राहिल्याने या



कार्यक्रमाची चर्चा अधिकच रंगली. सलमान खान, रणबीर कपूर, विकी कौशल यांच्यासह इतर काही व्यक्ती कार्यक्रमात दिसल्याने सामाजिक आणि राजकीय पातळीवर प्रतिक्रिया उमटू लागल्या.

या उपस्थितीवरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर एक लांबलचक पोस्ट लिहित टीका केली.

राज ठाकरेंच्या या टीकेवर महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी प्रतिक्रिया दिली. नाशिकमध्ये माध्यमांशी बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत राज ठाकरे यांना उत्तर दिले. संघाच्या कार्यक्रमाला आलेले लोक मोदींना घाबरून आले नव्हते, असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी राज ठाकरे यांचा आदर असल्याचे नमूद करत, त्यांच्या विधानावर भाष्य केले.

कोश्यारी पुढे म्हणाले की, मला असे वाटते की राज ठाकरेच नरेंद्र मोदींना जास्त घाबरत आहेत. त्यांनी राज ठाकरेंना सल्ला देत म्हटले की, त्यांनी मोदींपासून घाबरू नये, उलट त्यांच्या जवळ जावे. मोदींसाठी सर्व जनता समान आहे, असे सांगताना त्यांनी राम आणि त्यांच्या प्रजेचा दाखला दिला. ज्या पद्धतीने रामाला सर्व प्रजा समान होती, मोदींसाठीही सर्व नागरिक समान आहेत, असे ते म्हणाले.

भगतसिंह कोश्यारी यांनी राज ठाकरे यांना लहान भाऊ संबोधत, ते कडक आणि चांगले नेते असल्याचेही म्हटले. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्मभूमीत राहणाऱ्यांनी घाबरण्याचे कारण नाही. चुकीचे काम करण्यास घाबरावे, पण व्यक्तींना घाबरू नये, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज ठाकरे यांच्या पोस्टला थेट उत्तर मिळाले.

या सर्व घडामोडींमुळे आरएसएसचा कार्यक्रम केवळ संघाच्या कार्याविषयी मर्यादित न राहता, तो राजकीय चर्चेचा विषय ठरला. मान्यवरांची उपस्थिती, राज ठाकरे यांची टीका आणि त्यावर कोश्यारींची प्रतिक्रिया यामुळे या कार्यक्रमाला वेगळीच राजकीय किनार मिळाली आहे. या विषयावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू असून, विविध स्तरांवर मतप्रवाह उमटताना दिसत आहेत.

## काकूने केले पुतणीचे अपहरण

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि.११ :**

जिल्ह्यात युवती बेपत्ता होण्याचे, युवतींचे अपहरण किंवा फूस लावून पळवून नेण्याच्या घटनेत लक्षणीय वाढ झाली आहे. सिंदखेड राजा तालुक्यातील साखर खेर्डा या गावातील एका घटनेने याचा कळस गाठला आहे.

साखरखेर्डा येथील एका महिलेने चक्क आपल्या अल्पवयीन पुतणीचे अपहरण करुन तीचे परस्पर लग्नही लावून दिले. साखरखेर्डा पोलीस ठाण्याच्या एका पथकाने केलेल्या कारवाईतून हा प्रकार उघडकीस आला.

पोलिसांनी काकू आणि पुतणीच्या कथित पतीला उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातून जेरबंद केले आहे. साखरखेर्डा येथील एक अल्पवयीन मुलगी २९ डिसेंबर रोजी सायंकाळी घरातून अचानक बेपत्ता झाली होती. या प्रकरणी मुलींची आजी केसरबाई पारधे यांनी साखरखेर्डा पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता.

पोलिसांनी सदर बाब गांभीर्याने घेत तपासचक्रे फिरवली. तांत्रिक व गोपनीय माहिती काढून मीराबाई पारथे आणि शुभम पाटील याच्या जळगाव खांदेश येथून मुसक्या आवळल्या. आरोपींची कसून चौकशी केली असता, नात्याने काकू लागणाऱ्या मीराबाई पारथे हिने सदर मुलीला काळी-पिवळी वाहनाले चिखली येथे बोलावले. तेथून मुलीला सोबत घेऊन जळगाव खांदेश येथे नेले. तेथील शुभम विनोद पाटील या युवकासोबत तीचा विवाह लावून दिला. या व्यवसायात काकूने काही पैसे घेतल्याचे देखील पोलीस चौकशीत समोर आले आहे.

विशेष म्हणजे सदर महिलेचे गुजरात राज्यात अनेक व्यक्तींसोबत कनेक्शन असल्याचेही निष्पन्न झाले. या अगोदर अशाच प्रकारे काही मुलींना आपल्या जाळ्यात अडकवून तीने सदर मुलींचे इतर समाजातील गरजू मुलांसोबत लावल्याचे समजते. मुलीचे अन्य कोणी नव्हे तर नात्याने काकु असलेल्या महिलेने मुलीला पळवून नेत एका युवकासोबत तीचे लग्न लावून दिल्याचे तपासात उघड झाले आहे. आरोपी काकुसह एका युवकाला साखरखेर्डा पोलिसांनी जळगाव खांदेश येथून बेड्या ठोकल्या.

दरम्यान, त्यांना सिंदखेड राजा न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने काकूची रवानगी न्यायलयीन कोठडीत केली असून, युवकाला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर गुन्ह्याचा तपास ठाणेदार गजानन करेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली साखरखेर्डा पोलीस करीत आहेत.

## काँग्रेसला लाज वाटली पाहिजे...

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :**

चंद्रपूर महानगरपालिकेत घडलेल्या एका निर्णयाने राज्याच्या राजकारणात नवा वाद पेटला आहे. शिवसेना ठाकरे गटाने स्थानिक पातळीवर भाजपला पाठिंबा दिल्यानंतर सर्वत्र चर्चेला उधाण आले.

संजय राऊत भडकले



कोणत्याही परिस्थितीत भाजपसोबत जाणार नाही, अशी सातत्याने भूमिका मांडणाऱ्या ठाकरे गटाने चंद्रपूरमध्ये घेतलेली भूमिका काँग्रेसच्या टीकेचे कारण ठरली. मात्र, या टीकेला उत्तर देताना शिवसेना खासदार संजय राऊत यांनी थेट काँग्रेसवर हल्ला चढवला. चंद्रपूर महानगरपालिकेत २७ नगरसेवक निवडून आणूनही सत्ता मिळवता आली नाही, याची काँग्रेसला लाज वाटली पाहिजे, असे ते म्हणाले.

राऊत यांच्या मते, काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदांमुळेच ही परिस्थिती निर्माण झाली. ज्यांनी पाठिंबा द्यायचा होता, त्यांनाही वेगळा निर्णय घ्यावा लागला, असे सांगत त्यांनी शिवसेनेला दोष देण्यात अर्थ नसल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, स्थानिक राजकारणातील गुंतागुंत आणि काँग्रेसमधील दोन गटांतील संघर्ष यामुळे सत्ता हातातून गेली. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने घेतलेला निर्णय हा परिस्थितीजन्य होता, असा त्यांचा सूर होता.

दरम्यान, संजय राऊत यांनी हेही स्पष्ट केले की, स्थानिक पदाधिकाऱ्यांना भाजपसोबत कोणत्याही परिस्थितीत जाऊ नका, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. मुंबईत गेल्यानंतर या विषयावर सविस्तर चर्चा केली जाईल, असे त्यांनी सांगितले. म्हणजेच, पक्ष पातळीवर या निर्णयाचा आढावा घेतला जाणार असल्याचे संकेत त्यांनी दिले. चंद्रपूरमधील घडामोडी केवळ स्थानिक मर्यादेत राहिलेल्या नसून, त्याचे पडसाद राज्य पातळीवर उमटत असल्याचे चित्र दिसू लागले आहे.

काँग्रेसमधील संघर्षाचा उल्लेख करताना राऊत यांनी प्रतिभा धानोरकर आणि विजय वडेट्टीवार यांच्यातील मतभेदांवर बोट ठेवले. या दोन गटांतील संघर्षामुळेच काँग्रेसला सत्ता गमवावी लागली, असे ते म्हणाले.

## राज्यातील पहिल्या खाजगी 'पिल्लई विद्यापीठाचे' पनवेलमध्ये उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**

नवी मुंबई, पनवेल येथे 'पिल्लई विद्यापीठा'चे उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

हे राज्यातील पहिले खाजगी विद्यापीठ असून, महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील हे एक महत्त्वाचे आणि ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, आमदार महेश बालदी, नवी मुंबई महापालिका आयुक्त मंगेश चितळे, डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई, डॉ. डॅफ्ने पिल्लई यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, स्वायत्ततेचा अर्थ केवळ अधिकार नसून ती गुणवत्ता सिद्ध करण्याची आणि जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याची मोठी जबाबदारी आहे. १९७० साली अवघ्या २० विद्यार्थ्यांच्या साक्षीने 'महात्मा एज्युकेशन सोसायटी'ने लावलेले छोटेसे रोपटे आज ३० हजार विद्यार्थ्यांचे भविष्य उजळणाऱ्या एका महाकाय वटवृक्षात रूपांतरित झाले आहे, अशा शब्दांत त्यांनी संस्थेच्या प्रगतीचे कौतुक केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' मधील संकल्पनांना मूर्त स्वरूप देत




हे विद्यापीठ आता व्यवसायाभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षणावर विशेष भर देणार आहे. भविष्यात नवी मुंबईत ५ आंतरराष्ट्रीय विद्यापीठे स्थापन होणार असून, यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना मायदेशातच जागतिक दर्जाचे शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

पिल्लई विद्यापीठ हे ड्रोन तंत्रज्ञान, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (अक) आणि सायबर सुरक्षा यांसारख्या आधुनिक विषयांत संशोधनाला चालना देईल, असा विश्वासही पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

हे विद्यापीठ अभियांत्रिकी, वास्तुकला, व्यवस्थापन, कला आणि वाणिज्य या क्षेत्रांत उत्कृष्टतेचा मानदंड निर्माण करतानाच उद्योग-शिक्षण सहकार्यावर विशेष भर देणार आहे. बहुविषयक शिक्षण आणि नवोपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासह त्यांना उद्योजक म्हणून सक्षम करणे, हे या विद्यापीठाचे प्रमुख उद्दिष्ट असणार आहे.

## पार्थ पवारांचे नोटिसीला आव्हान

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ११ :**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ यांनी पुण्यातील मुंढवा येथे १८०० कोटी रुपयांची सरकारी जमीन ३०० कोटींतच खरेदी केली. विरोधकांच्या टीकेनंतर अजित पवारांनी व्यवहार रद्द केला. नियमानुसार असा व्यवहार रद्द करण्यापूर्वी २१ कोटी रुपये मुद्रांक शुल्कापोटी भरावे लागतील, अशी नोटीस पार्थ यांना बजावली होती. त्याला पार्थच्या मालकीच्या अमेडिया कंपनीने आव्हान दिले आहे.

महाराष्ट्र नोंदणी विभागाने अमेडिया व पार्थ यांचे भागीदार यांना १० फेब्रुवारीपर्यंत रक्कम भरण्याची नोटीस बजावली होती. पार्थ यांनी बरोबर १० फेब्रुवारी रोजीच या आदेशवजा नोटिसीला आव्हान दिले आहे. त्यावर आता महानिरीक्षक नोंदणी (आयजीआर) यांच्यासमोर सुनावणी होईल, असे विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मात्र, पार्थ यांनी कोणत्या मुद्द्यांच्या आधारे नोटिसीला आव्हान दिले आहे.

**बँक खाते जप्तीचा अधिकार**

समजा नोंदणी महानिरीक्षकांसमोरील सुनावणीत पार्थ यांचे अपील फेटाळले गेले तरीही त्यांनी रक्कम भरण्यास नकार दिला तर काय? या प्रश्नावर तज्ज्ञांनी सांगितले की, अशा प्रकरणात महसूल वसूल करण्याचा अधिकार सरकारला आहे. ज्यामध्ये बँक खाते जप्त करणे आणि स्थावर मालमत्ता जप्तीच्या निश्चित प्रक्रिया आहेत. फक्त त्याचा किती प्रभावाने वापर करायचा याचा निर्णय मंत्रीस्तरावर होऊ शकतो.

## माळी महासंघाचे तीव्र निषेध आंदोलन

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ११ :**

तेलंगणा राज्यातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर गावात क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ पुणे शहरात माळी महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी माळी समाज बांधव आणि फुले प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आंदोलनात माळी महासंघ पुणे शहर अध्यक्ष दीपक जगताप, महिला अध्यक्ष स्मिता लडकत, नाना कुदळे, बाळासाहेब लडकत, सोमनाथ बटवाल, यशोधन आखाडे, चांगदेव पिंगळे, शशिकला ढोले पाटील, राजेंद्र लडकत, प्रज्वल बनकर, रीमाताई लडकत, गिरीश झगडे, रवी सहाणे, प्रतिभा झगडे, विजय कोठावळे, अभिजीत भुजबळ, शांताताई नेवसे, मारुती भुजबळ, सारंग राऊत आणि गणेश वाडकर यांच्यासह अनेक समाजबांधव व फुले प्रेमी सहभागी झाले होते.

आंदोलकांनी ही घटना अत्यंत निंदनीय असल्याचे म्हटले. समाजकंटकांनी केलेल्या या हीन कृत्याचा आणि त्यात सहभागी असलेल्यांचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी, ही केवळ महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना नसून, त्यांच्या सामाजिक विचारांवर आणि समतेच्या मूल्यांवर केलेला हल्ला असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

माळी महासंघ पुणे शहर अध्यक्ष दीपक जगताप यांनी यावेळी बोलताना सांगितले की, महात्मा फुले यांनी पुणे शहरातून शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिला शिक्षणासाठी मोठे योगदान दिले. अशा महान व्यक्तिमत्त्वाच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्यांचा आम्ही निषेध करीत असल्याचे जगताप यांनी यावेळी सांगितले.

## सूर्यदत्तचे शैक्षणिक, सामाजिक कार्य हा प्रबोधनाचा प्रभावी मार्ग

### माजी सरन्यायाधीश उदय लळीत यांचे गौरवोद्गार : २८ व्या स्थापनादिनी सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कारांचे वितरण

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ११ :**

समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना एकाच व्यासपीठावर सन्मानित करण्याची संधी म्हणजे समाजाच्या प्रबोधनाचा प्रभावी मार्ग आहे. कला, क्रीडा, विज्ञान, अर्थशास्त्र, लेखा, प्रशासन आदी विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा समावेश असलेला हा समाजाचा विविधांगी प्रेरणादायी कार्यक्रम अनुभवता आल्याचे समाधान आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश उदय लळित यांनी केले.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' व सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' वितरण समारंभात उदय लळीत बोलत होते. बाणेर येथील बंटारा भवनमध्ये झालेल्या समारंभावेळी माजी केंद्रीय निवडणूक आयुक्त टी. एस. कृष्णमूर्ती, भारतीय जनता पार्टीचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम जाजू, एअरमार्शल (निवृत्त) भूषण गोखले, एमआयटीचे अधिष्ठाता प्रा. डॉ. शरदचंद्र दराडे, 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, स्नेहल नवलखा, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया आदी उपस्थित होते.

पद्मश्री परमपूज्य आचार्य डॉ. चंदना महाराज (ताई माँ) यांना 'सूर्यदत्त ग्लोबल पीस गांधीयन फिलॉसॉफी अवॉर्ड २०२६', तर माजी सरन्यायाधीश उदय लळित यांच्यासह ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, विठ्ठल काटे, माजी सनदी अधिकारी शेखर गायकवाड, अभिनेते राकेश बेदी, बांधकाम व्यावसायिक विलासकुमार पालरेषा, दिग्दर्शक सुभाष सेहगल, अशोककुमार ठाकूर, शास्त्रज्ञ डॉ. आनंद भाडळकर, विधिज्ञ ॲड. प्रमोद आडकर, प्रा. सुरेखा कटारिया, उद्योजक प्रकाश गांधी यांना 'सूर्यदत्त



राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे महेश सूर्यवंशी, योगसद्गुरू डॉ. कृष्णदेव गिरी, अभिनेत्री व स्टँडअप कॉमेडियन उपासना सिंग, भारतीय बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर अभिजित कुंटे, सर्वोच्च न्यायालयातील वकील ॲड. आशुतोष श्रीवास्तव, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुरेंद्रा कुमारी, योग प्रशिक्षक राखी गुगळे, अवकाशशास्त्रज्ञ डॉ. कनक सहा, बासरीवादक पारस नाथ, ग्लोबल युथ अँबेसेडर दारासिंग खुराणा, डॉ. प्रमोद त्रिपाठी, गियारोहक आशिष माने यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार', सीए मोहित धांड, गायिका प्रीती दवे व पिंकी दवे, जलतरणपटू हातवी शहा यांना 'सूर्यदत्त नॅशनल यंग अचिव्हर अवॉर्ड', तर मास्टर ऋषी शिव प्रसन्न आणि मास्टर राघव मालपाणी यांना 'सूर्यदत्त लिट्ल मास्टर नॅशनल अवॉर्ड' देण्यात आला.

उदय लळीत म्हणाले, यशस्वी होऊ की नाही, हा प्रश्न प्रत्येक तरुणाच्या मनात असतो. मात्र स्वतःवरचा विश्वास, सातत्यपूर्ण मेहनत आणि कामातील उत्कृष्टता यामुळेच यशाचे टप्पे गाठता येतात. भारताची लोकसंख्या तरुण असून ३५ वर्षांखालील नागरिकांचे प्रमाण लक्षणीय आहे. हे मनुष्यबळ सक्षमपणे घडवणे हे राष्ट्रनिर्मितीतील मोठे कार्य आहे.

अशोक सराफ म्हणाले, वेगवेगळ्या क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या व्यक्तींना समोर आणून सन्मानित करण्याचा चोरडिया दाम्पत्याचा हा उपक्रम समाजाला प्रेरणादायी आहे. माझ्या प्रवासात निवेदिताची मोलाची साथ लाभली. चांगले झाले तर कौतुक आणि काही चुकले तर स्पष्टपणे सांगणाऱ्या निवेदिता आणि माझ्या सहवासाची ३७ वर्षे झाली. सभागृहात उपस्थित प्रत्येकाची साथ मला लाभली. तुम्हा प्रेक्षकांच्या पावतीमुळेच काम करताना हुरूप येतो आणि आणखी जोमाने काम करता येते.

प्रास्ताविकात प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, सूर्यदत्त शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर दिला आहे.

चांगला नागरिक घडवण्यासाठी समाजातील आदर्श व्यक्तिमत्त्वांना विद्यार्थ्यांसमोर आणले जाते. उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त पुरस्काराने सन्मानित केले जाते.

एअरमार्शल भूषण गोखले म्हणाले, आपण कितीही यशाची शिखरे गाठली, तरी मातीशी नाळ जोडून ठेवायला हवी. शिक्षणसंस्था चालवण्यासह सामाजिक कार्यातही सक्रिय राहून सूर्यदत्त परिवाराने आदर्श निर्माण केला आहे. मूल्याधिष्ठित, समाजहिताचे शिक्षण नव्या पिढीला घडवण्यासाठी उपयुक्त आहे.

प्रा. शरदचंद्र दराडे यांनी सूर्यदत्त संस्थेच्या प्रगतीचे कौतुक करीत आपल्या विद्यार्थ्याने केलेल्या या कार्याचा आनंद वाटतो, असे नमूद केले. सर्व पुरस्कारार्थींनी सत्काराला उत्तर दिले. श्वेता राठोड व संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सुषमा चोरडिया यांनी आभार मानले.

## एस.टी. प्रवासाचा नवा डिजिटल पॅटर्न

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सुविधेसाठी आणि पारदर्शकतेसाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे.

एस.टी. महामंडळाच्या प्रवासात आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एन.सी. एम. सी) प्रणाली लागू करण्यात येणार असून, विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे कार्ड आता अनिवार्य असेल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

या निर्णयामुळे एस.टी.चा प्रवास आता 'डिजिटल' होणार असून, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविरहित व्यवहारांना गती मिळणार आहे. महामंडळाने मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि एन.एस.डी. एल. पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला असून, लवकरच सर्व आगारांमध्ये नोंदणी मोहीम सुरू होणार आहे. प्रमुख लाभार्थी आणि नोंदणी प्रक्रिया या योजनेत समाजातील सर्व घटकांचा विचार करण्यात आला आहे.

**विद्यार्थी:** शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सरल क्रमांकाशी जोडलेले कार्ड मिळेल.

**ज्येष्ठ नागरिक व महिला:** अमृत ज्येष्ठ, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना 'आधार' संलग्न कार्ड दिले जाईल.

**दिव्यांग:** युडीआयडी क्रमांकाचा वापर करून विशेष सुविधा असलेले कार्ड प्राप्त होईल.

**पुरस्कारार्थी, पत्रकार:** स्वातंत्र्यसैनिक आणि अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना विभागीय कार्यालयामार्फत कार्डाचे वितरण केले जाईल.

प्रवाशांना हे कार्ड सहज उपलब्ध व्हावे यासाठी सवलतीचा दरही निश्चित करण्यात आला आहे. नवीन कार्डसाठी १९९ रुपये मोजावे लागतील. मात्र, ज्यांच्याकडे जुने स्मार्ट कार्ड आहे, त्यांना ते जमा केल्यास केवळ १४९ रुपयांत नवीन कार्ड मिळेल.

**रिचार्ज :** कार्डमध्ये किमान १०० रुपये शिल्लक ठेवणे आवश्यक आहे. ५० रुपयांच्या पटीत ईटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ किंवा मोबाईल ॲपवरून रिचार्ज करता येईल.

ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी राज्यभरात ३००० हून अधिक अधिकृत एजंट नियुक्त करण्यात आले आहेत.

बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारे पाऊल असल्याचे प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# कालव्याच्या फॉलमध्ये ‘पेटता’ मृतदेह!

## शहानूर धरण परिसर हादरला; हत्या करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न?



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.11 )** – शहानूर धरणाच्या पायथ्याशी असलेल्या जहानपूर (वाघडोह) शेतशिवारात आज सकाळी उघडकीस आलेल्या भीषण घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरले आहे. कालव्याच्या फॉलमधील विहिरीसारख्या खोल खड्डयात अर्धवट जळालेल्या अवस्थेतील एका अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने नागरिकांत एकच खळबळ उडाली.

सकाळी साडेसातच्या शेतकरी जनार्दन गभणे हे सकाळी साडेसातच्या सुमारास शहानूर धरणावरून खोडगाव पांढरीकडे जाणाऱ्या कालव्यालगत नितीन केशवराव बडवाईक यांच्या शेतात पिकावर फवारणीसाठी गेले होते. यावेळी त्यांना कालव्याच्या फॉलमधून धूर निघताना दिसला. उग्र वासामुळे संशय बळावल्याने त्यांनी जवळ जाऊन पाहणी केली असता अंगावर काटा आणणारे दृश्य समोर आले, फॉलच्या खड्डयात मृतदेह जळत होता! काही तासांपूर्वीच मृतदेह पेटविण्यात आल्याचा कयास व्यक्त केला जात आहे. माहिती मिळताच पथ्रोट पोलीस ठाण्याचे ठाणेदार अभय चौथणकर घटनास्थळी दाखल झाले. पंचनाम्यात मृतदेहाच्या डोक्याला मार लागल्याच्या खुणा तसेच हातापायांवर बांधल्याच्या खुणा आढळल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे हा प्रकार अपघाती नसून नियोजनपूर्वक घडविण्यात आल्याचा संशय गडद झाला आहे.

### घटनास्थळी ‘संशयास्पद’ठसे

घटनास्थळी चारचाकी वाहनाच्या टायरचे ठसे आढळले. तसेच मृतदेह जाळण्यासाठी ज्वलनशील पदार्थ (ऑइल) वापरल्याचे डाग दिसून आल्याने प्रकरण अधिकच गूढ बनले आहे.



### ‘आंबट शौकीनांचा अड्डा’ चर्चा

दरम्यान, शहानूर जलाशय परिसर हा आंबट शौकीन आणि प्रेमी युगुलांचा अड्डा बनत असल्याची चर्चा स्थानिक नागरिकांत रंगत आहे. या पार्श्वभूमीवर घटनेमागे काही काळेबेर असावे, अशी दाट शंका व्यक्त केली जात आहे. शांत व निर्जन मानल्या जाणाऱ्या शहानूर परिसरात उघडकीस आलेल्या या धक्कादायक प्रकाराने नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या रहस्यमय मृत्यूमागील सत्य काय, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### हत्या करून पुरावे नष्ट?

तरुणाची हत्या करून मृतदेह जाळण्याचा प्रयत्न झाला असावा का, या प्रश्नाने परिसरात चर्चांना उधाण आले आहे. मात्र पोलिसांनी अधिकृत पुष्टी करण्यास टाळाटाळ केली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे तसेच फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून ओळख पटविणे हे पोलिसांसमोरील सर्वात मोठे आव्हान ठरत आहे. दरम्यान, शांत मानल्या जाणाऱ्या शहानूर परिसरात उघडकीस आलेल्या या धक्कादायक प्रकाराने नागरिकांत प्रचंड भीती निर्माण झाली आहे. सत्य काय उघड होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.










**अमरावती–** पोलीस बनण्याच्या ध्येयाकडे धाव घेत अमरावती ग्रामीण पोलिस भरतीच्या पहिल्याच दिवशी (11 फेब्रुवारी 2026) शारीरिक चाचणीसाठी बोलाविण्यात आलेल्या 800 पैकी 575 उमेदवारांनी आपली उपस्थिती लावली. तर 225 गैरहजर होते. हजर उमेदवारांपैकी 526 उमेदवारांची यशस्वीरित्या शारीरिक चाचणी झाली, तर उर्वरित 49 उमेदवार शारीरिक मोजमाप व कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरले.

# सोन्याचे दागिने चोरी प्रकरणात डॉक्टरसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )** – शहरातील पीडीएमसी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झालेल्या महिलेच्या गळ्यातील सुमारे 80 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचा गंभीर आरोप करण्यात आले होते. या प्रकरणी ड्युटीवरील डॉक्टरसह दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवी वस्ती, बडनेरा येथील रहिवासी अनिल गणपत श्रीरामवार (वय 52) यांनी तक्रार दाखल केली होती. त्यांची पत्नी नलिनी अनिल श्रीरामवार यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना सुरुवातीला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचाराचा खर्च परवडण्यासारखा नसल्याने त्यांना पीडीएमसी रुग्णालयात हलविण्यात आले. पीडीएमसी रुग्णालयाच्या आयसीयू विभागात डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी नलिनी यांच्यावर उपचार सुरू केले. काही तासांनंतर डॉक्टरांनी त्यांच्या मृत्यूची माहिती पती अनिल यांना दिली. मृतदेह कपड्यात गुंडाळण्याची प्रक्रिया सुरू असताना पती तेथे पोहोचले असता, पत्नीच्या कानातील 80 हजार रुपये किमतीचे सोन्याचे टॉप्स गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत उपस्थित कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यामुळे ड्युटीवरील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी दागिने चोरल्याचा संशय व्यक्त करत अनिल श्रीरामवार यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी डॉ. श्रेयस पटवारी यांच्यासह अन्य दोन व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# कर्तव्यावर जाताना मुख्याध्यापकाचा हृदयविकाराने मृत्यू



### कार पठार मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी (दि. 11)** – विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी आयुष्य वाहणाऱ्या एका शिक्षकावर मंगळवारी काळाने अचानक झडप घातली. राजनीकुंड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुनिल झारखंडे (रा. परतवाडा) यांना शाळेत जात असताना तीव्र हृदयविकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकस्मात जाण्याने शिक्षण क्षेत्रात शोककळा पसरली असून शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ हळहळ व्यक्त करत आहेत. मंगळवारी सकाळी सुमारे 9 वाजता सुनिल झारखंडे हे परतवाडा येथील राहत्या घरातून मध्य प्रदेशातील सावलमेडा–जडवाली–गारपठार मार्गे राजनीकुंड येथील शाळेत दुचाकीवरून जात होते. गारपठार रस्त्यावर अचानक त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला. झटका इतका तीव्र होता की ते दुचाकीवरून खाली कोसळले आणि रस्त्यावरच बेशुद्ध पडले.

रस्त्याच्या कडेला शेतात काम करणाऱ्या एका शेतकऱ्याच्या ही घटना लक्षात आली. त्यांनी तत्काळ मध्यप्रदेशातील भैसदैही पोलिस ठाण्याला माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन झारखंडे यांना भैसदैही येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

सुनिल झारखंडे हे कर्तव्यदक्ष, प्रेमळ आणि विद्यार्थ्यांसाठी सदैव झटणारे शिक्षक म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या अचानक जाण्याने राजनीकुंड, बामादेही, काटकुंभ परिसरात शोककळा पसरली आहे. शाळेतील विद्यार्थी, सहकारी शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी त्यांच्या निधनावर तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. कर्तव्यावर जाताना शिक्षकाचे असे अकाली जाणे संपूर्ण शिक्षण क्षेत्रासाठी मोठी हानी मानली जात आहे

# महानगरपालिकेत शिवसेना (शिंदे) -बसपा स्वतंत्र आघाडीची स्थापना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )** – अमरावती महानगरपालिकेच्या राजकारणाला सोमवारी अनपेक्षित वळण मिळाले. राज्यात महायुती सरकारचा भाग असलेल्या शिवसेना (शिंदे गट) आणि विरोधी भूमिका निभावणाऱ्या बहुजन समाज पक्षाने (बसपा) महापालिका पातळीवर स्वतंत्र आघाडी स्थापन केली आहे. या नव्या आघाडीला शिवसेना–बसपा आघाडीअसे नाव देण्यात आले असून, विभागीय आयुक्त कार्यालयात अधिकृत नोंदणी करण्यात आली आहे.

या आघाडीमध्ये प्रत्येकी 3 नगरसेवक सहभागी झाले आहेत. शिवसेना (शिंदे गट) चे डॉ. राजेंद्र तायडे गटनेतेपदी नियुक्त करण्यात आले आहेत. विभागीय आयुक्त नितीन कापडणीस यांनी आघाडीची



अधिकृत नोंदणी केली असल्याचे सांगितले. महानगरपालिकेच्या स्थापनेवेळी शिवसेना (शिंदे) ने महायुतीला पाठिंबा दिला होता, तर बसपा विरोधी बाकावर होती. त्यामुळे ही नवीन आघाडी शहरातील राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. तज्ज्ञांच्या मते, या आघाडीमुळे महापालिकेतील सत्ता समीकरण बदलण्याची शक्यता आहे आणि आगामी राजकीय हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेना (शिंदे) कडून स्नेहा आशिष लुल्ला (प्रभाग 7, जवाहर स्टेडियम), डॉ. राजेंद्र तायडे (प्रभाग 20, सुतागिरीणीङ्कसामरा नगर), मंजुषा जाधव (प्रभाग 19, साईनगरङ्कअकोली) तर बसपाकडून विद्या मते, इस्माइल कासम लालुवाले, सचिन किसनराव वैद्य (प्रभाग 11, रुक्मिणी नगर) हे नगरसेवक म्हणून निवडूण आले आहे.

# दोन ठिकाणी अवैध सावकारीविरोधी धाडी

## अनेक महत्वपूर्ण दस्तावेज घेतले ताब्यात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.11 )**– सहायक निबंधक, सहकारी संस्था दर्यापूर यांच्या कार्यालयात प्राप्त तक्रारिच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार (सहकारी संस्था) यांच्या आदेशावरुन शहरात फ्रेजरपूरा व वडाळी या दोन ठिकाणी अवैध सावकार विरोधी कारवाई मंगळवारी करण्यात आली.

पहिल्या पथकात प्रमुख असलेले किशोर बलीगे (सहायक निबंधक सहकारी संस्था दर्यापूर), चंद्रशेखर मुळे, सुश्मिता सुपले, अमोल लोमटे, पंच नितीन वाधाळे व कौस्तुभ गोरडे, तसेच फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी मनोज काळपांडे व माधुरी अंभोरे यांनी शक्तीसिंह विरेंद्र दिक्षीत (रा. गगलानी नगर, वडाळी, अमरावती) यांच्या घरी धाड टाकून झडतीची कार्यवाही केली. सदर कार्यवाहीमध्ये पथकास अवैध सावकारी संबंधाने 05 संशयास्पद दस्तऐवज प्राप्त झालेले आहे. त्यामध्ये 02 कोरे धनादेश, स्थावर मालमत्ता खरेदीखत, असे दस्तऐवज धाड पथकाने जप्त केलेली आहे.

तर दुसऱ्या पथकात प्रमुख किशोर इंगळे (सहायक निबंधक सहकारी संस्था चांदुर रेल्वे), अविनाश महल्ले, चेतना कुचे, नरेंद्र आगरकर, पंच गौरव घाटोळ व ईश्वर कंठाळे तसेच फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी सूरज यादव व मालू चापरे यांनी सुमंत अरविद पाटील (रा. कांग्रेस नगर, अमरावती) यांच्या घरी धाड करुन येथून 14 संशयास्पद दस्तऐवज प्राप्त केले. त्यामध्ये 02 कोरे धनादेश, स्थावर मालमत्ता खरेदीखत, असे दस्तऐवज धाड पथकाने जप्त केलेली आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.

# चार वर्षाच्या बालिकेवर यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट

## सार्वजनिक आरोग्य विभागातील तिसरी यशस्वी शस्त्रक्रिया

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )**– विभागीय संदर्भ सेवा (सुपर स्पेशालिटी ) रुग्णालयामध्ये चार वर्षांच्या बालिकेवर अत्यंत महत्त्वपूर्ण व आव्हानात्मक कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ही शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागातील तिसरी यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट सर्जरी ठरली असून, बालिकेला नव्या ऐकू येण्याच्या जगाची दारे खुली झाली आहेत.

सदर रुग्ण 4 वर्षांची असल्याने महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजने मार्फत उपचार



मिळू शकत नव्हता. त्यामुळे या शस्त्रक्रियेसाठी संपूर्ण निधीची उपलब्धता अमरावती जिल्हा नियोजन समिती मार्फत करण्यात आली आहे. सदर रुग्ण ही आष्टी जि. वर्धा येथील रहिवाशी असून जन्मत: ती ऐकण्यास अक्षम होती. रुग्ण 9 महिन्यांची झाल्यानंतर तिच्या कुटुंबियांना समजले की ती ऐकू शकत नाही. रुग्णाचे नातेवाईक नागपूर येथील खासगी रुग्णालयात सोबत इतर रुग्णालयात उपचार घेण्यास गेले होते. मात्र, आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने तेथे उपचार घेणे शक्य नव्हते. अखेर प्रसार माध्यमांमध्ये सूपर स्पेशालिटी रुग्णालयातील कॉक्लियर इंप्लांटच्या झालेल्या यशस्वी शस्त्रक्रिया बघून रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्णास सूपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती येथे आणले. सूपर स्पेशालिटी रुग्णालयात रुग्णाच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या व शेवटी 05 फेब्रुवारी रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रिये मधे अत्याधुनिक तंत्रज्ञान जसे स्मार्ट नेव व कन्व्हेंशनल या तंत्रज्ञानाचा वापर करून शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. ही जटिल शस्त्रक्रिया रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयातील इ.एन.टी विभागप्रमुख डॉ जीवन वेदी, डॉ. रितेश शेलकर व सूपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे विशेष कार्य अधिकारी तसेच इ.एन.टी सर्जन डॉ मंगेश मेंढे , डॉ. अनिता पटवरकर, न्यूरो फिजिशियन डॉ अनिता अंभोरे, पीडियाट्रिशियन डॉ ॠषिकेश नागलकर, ऑडियोलॉजिस्ट लक्ष्मण मोरे, बधिरीकरण तज्ञ डॉ.बाळकृष्ण बागवाले, डॉ. दिपाली देशमुख, डॉ. शीतल सोळंके, डॉ. अश्विनी मढावी, डॉ. रमणिका ढोमणे यांच्या मार्फत करण्यात आली.

### रॉप्टरने मारहाण केल्याने एक जखमी

**अमरावती** – चांदूर रेल्वे पोलीस ठाणे हद्दीतील मांडवा येथे रॉप्टरने मारहाण केल्याने एक जण जखमी झाले. ही घटना 8 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. माहितीनुसार, वीरेंद्र सोनोने (वय 35) यांच्यावर दीपक देवकिसन ठुणकुळे याने रॅप्टरने मारहाण केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात वीरेंद्र सोनोने जखमी झाले. याप्रकरणी नीलिमा सोनोने यांच्या तक्रारीवरून दीपक ठुणकुळे याच्याविरुद्ध चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रेल्वेत अज्ञात मृतदेह आढळले

**अमरावती** – रेल्वेगाडीमध्ये अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला. ही घटना सोमवारी सायंकाळी 7.30 वाजताच्या सुमारास बडनेरा रेल्वे पोलिसांच्या लक्षात आली. शालीमार एक्स्प्रेसच्या एक कोचच्या दाराजवळ इसम बेशुद्धवस्थेत पोलिसांना आढळून आला.

# दुचाकीची धडक लागण्याच्या कारणाहून हत्या

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ,( दि.11 )** – नांदगाव पेठ पोलीस स्टेशन हद्दीत एक धक्कादायक खुनाची घटना उघडकीस आली आहे. परिसरात मोटर सायकलला कट लागल्याच्या कारणावरून अज्ञात ट्रिपल सीट गाडीवरील तीन आरोपींनी चाकूहल्ला केला. या घटनेत जखमीमध्ये सौरभ सुधाकरराव घोटेकार (वय 30, अंजनगाव सुर्जी) आणि त्याचा मोठा भाव गौरव सुधाकरराव घोटेकार (वय 33, अंजनगाव सुर्जी) यांचा समावेश आहे. यामध्ये गौरवचा मृत्यू झाला. तर सौरभवर सध्या उपचार सुरू आहे. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यामध्ये आरोपींचा शोध सुरू आहे. स्थानिक लोकांमध्ये घटना पसरल्यानंतर भीतीचे वातावरण पसरले आहे.

# मुंबई काँग्रेसला संजिवनी कधी मिळणार?

**ठाकरेंची शिवसेना आणि मोदी झशहांची भाजपा यांच्याशी मुंबईत लढत देताना काँग्रेसची दमछाक होते आहे. ठाकरे बंधुंनी एकत्र येऊन विरोधी बाकांवर पुरेशी जागावर पुरेशी जागा तरी मिळवली. काँग्रेसने प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजनशी युती करूनही त्याचा अपेक्षित लाभ दोन्ही पक्षांना झाला नाही. एवढेच नव्हे तर काँग्रेसची मुंबई महापालिकेत सर्वात खराब कामगिरी यंदाच्या निवडणुकीत बघयला मिळाली. महापालिकेच्या २२७ जागा वंचितशी युती करून लढवल्या तरी जेमतेम २४ जागांवर नगरसेवक निवडून आणताना काँग्रेसला घाम फुटला.**

------------

निवडणूक प्रचारात ठाकरे बंधुंचा व महायुतीचा (भाजपा व शिंदेंची शिवसेना) धुमधडाका चालू असताना काँग्रेस कुठे दिसत नव्हती. काँग्रेसच्या सभा नाहीत, जाहीर सभा नाहीत किंवा कुठे रोड शो झाले नाहीत.

भाजपाच्या प्रचारासाठी विविध प्रांतांतील भाषिक नेते मुंबईत आले होते. पण काँग्रेसच्या प्रचारासाठी अन्य राज्यातून कुमक आली नाही किंवा काँग्रेसचे स्टार प्रचारकही फिरताना दिसले नाहीत. प्रचाराची आखणी आणि रणनिती यामधेही काँग्रेसची कुठे चमक दिसली नाही. राज्यावर व देशावर अनेक वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या एका राष्ट्रीय पक्षाची मुंबईत दयनिय अवस्था झाली आहे.

मुंबई काँग्रेसचे अध्यक्षपद वर्षा गायकवाड यांच्याकडे आहे. त्यांचे वडिल एकनाथ गायकवाड हे मुंबई काँग्रेसचे आघाडीचे नेते होते. पक्षाचे मुंबईचे अध्यक्ष होते, खासदार होते व राज्यात मंत्रीही राहिले. स्वतः वर्षा गायकवाड या खासदार आहेत. आमदार व मंत्रीही होत्या. त्यांची बहिण डॉ. ज्योती गायकवाड या धारावीतून आमदार आहे.

घरात राजकीय वारसा असताना व पक्षाने त्यांना व त्यांच्या परिवाराला भरपूर काही दिलेले असताना वर्षा गायकवाड पक्षाला यश मिळवून देण्यात असमर्थ का ठरल्या? १९८५ साली ज्या शहरात काँग्रेसची स्थापना झाली, त्याच मुंबई शहरात काँग्रेस संकुचित आणि दुर्बल झाल्याचे बघायला मिळत आहे.

पक्षाचे संघटन कमकुवत असल्याने मुंबईत काँग्रेसची ताकद दिवसेंदिवस कमी होत आहे. नऊ वर्षापूर्वी सन २०१७ मधे झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसचे ३१ नगरसेवक निवडून आले होते. त्याच निवडणुकीत स्वतंत्रपणे लढलेल्या भाजपाचे ८२ आणि अविभाजित शिवसेनेचे ८४ नगरसेवक विजयी झाले होते. यंदा झालेल्या निवडणुकीत भाजपाचे ८९, ठाकरेंच्या शिवसेनेचे ६५, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे २९ त्यानंतर काँग्रेसचे २४ नगरसेवक निवडून आले.

काँग्रेसचे संख्याबळ महापालिका निवडणुकीत चौथ्या क्रमांकावर आले. काँग्रेसच्या अधोगतीला जबाबदार कोण आहे? निवडणुकीतील दारूण पराभवानंतर वर्षा गायकवाड यांनी मुंबई काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा अशी पक्षातूनच मागणी झाली. त्या स्वतःहून राजीनामा देणर नाहीत, पक्ष त्यांना पद सोडायला सांगणार नाही आणि वर्षा गायकडवाड यांना हटवले तरी मुंबई काँग्रेसला सक्षम पर्याय देऊ शकेल असेल असे पयार्यी नेतृत्व तरी कोण आहे?

काँग्रेस पक्षाने मुंबईत २२७ पैकी १५२ जागा लढविल्या. प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी, महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष, राजेंद्र गवई यांचा रिपब्लिकन पक्ष ( गवई ) यांच्याशी काँग्रेसने आघाडी केली होती.

मुस्लिम, दलित व उत्तर भारतीय ही काँग्रेसची परंपरागत व्होट बँक गेल्या दहा वर्षात दुरावात चालली आहे. उत्तर भारतीय मतदारांना जपण्यासाठी काँग्रेसने ठाकरे बंधुबरोबर जाण्यास नकार दिला. पण त्याचा फारसा लाभ पक्षाला झाला नाही. अमराठी मते भाजपाकडे जातात हेच अनुभवायला मिळाले.

मुस्लिम मतदारांना आता एमआयएम चा पर्याय मिळाल्याने ती मतेही काही अपवाद वगळता काँग्रेसला मिळाली नाहीत. उद्धव ठाकरे हे भाजपाला कठोर विरोध करीत असल्यामळे मुस्लिम मतदारांची पसंती लोकसभा व विधानसभा निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेला होती. आता बहुसंख्य मुस्लिम मतदार एमआयएमकडे झुकला असल्याचे पाहायला मिळाले. मुंबईतून प्रथमच मुस्लिम प्रबाल्य असलेल्या मतदारसंघातून एमआयएमचे ८ नगरसेवक निवडून आले आहेत.

**मुंबई कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

काँग्रेसने वंचित बहुजन आघाडी सोबत युती केली असली तरी प्रचारात तसे दिसले नाही. वर्षा गायकवाड व प्रकाश आंबेडकर यांनी संयुक्त प्रचार सभा कुठे घेतली नाही किंवा दोन्ही नेत्यांनी मिळून शहर व उपनगरात रोड शो केले नाहीत. प्रचारात दोन्ही नेते एकत्र दिसले असते तर त्याचा लाभ काँग्रेसला निश्चित झाला असता.

काँग्रेस- वंचित व राष्ट्रीय समाज पक्षाला निवडून द्या असे कोणीही मतदारांना आवाहन करताना दिसले नाही. मग काँग्रेसने युती केली तरी कशाला? गेली काही वर्षे मुंबई काँग्रेसला गटबाजाने पोखरले आहे. उमेदवार ठरवताना या गटबाजीचा फटका कार्यकत्यार्ना बसतो. पक्षाच्या अध्यक्षाच्या विरोधात इतर सर्वजण असे चित्र गेली अनेक वर्ष आहे. पक्षाचे अन्य नेते पक्षाच्या अध्यक्षाला साथ देत नाहीत आणि अध्यक्षही त्यांना कोणाला विचारत घेत नाहीत, मग पक्ष वाढणार कसा?

२०२४ मधे झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने बऱ्यापैकी यश मिळवले होते पण तसे महापालिका निवडणुकीत झाले नाही. २००७ मधे झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसचे ७१ नगरसेवक निवडून आले होते. २०१२ च्या निवडणुकीत ५२ नगरसेवक विजयी झाले. २०१७ च्या निवडणुकीत ३१ तर २०२६ च्या निवडणुकीत काँग्रेसचे २४ नगरसेवक महापालिकेत पोचले आहेत.

उत्तर भारतीय, दाक्षिणात्य आणि मुस्लिम मतदार काँग्रेसपासून दुरावत चालला आहे. वर्षा गायकवाड या पक्षाच्या प्रमुख असल्या तरी आमदार अमिन पटेल व अस्लम शेख या दोन नेत्यांनाच पक्षात महत्व आहे. त्यांच्या भरंवशावर पक्ष चालला आहे असे चित्र आहे.

पक्षातील अनुभवी नेत्यांना विश्वासात घेतले जात नाही, पक्षाच्या अध्यक्ष मुंबईत वॉर्डनिहाय भेटी देत नाहीत. स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी संवाद नाही. त्यामुळे तळागाळात काय घडते हे नेतृत्वाला समजतच नाही. अनेक ठिकाणी ज्यांचे काम चांगले आहे, नेटवर्क उत्तम आहे, तिथे जागा वंचित किंवा जानकरांच्या पक्षाला सोडली. वंचितकडे उमेदवारच नाहीत म्हणून अनेक जागा त्यांनी काँग्रेसला परत केल्या. मग ऐनवेळी तरी काँग्रेस कुठून उमेदवार आणणार ?

नेत्यांच्या घरातच तिकीटे दिली गेली अशी उदाहरणेही बरीच आहेत. अनेक जण त्यांना उमेदवारी नाकारल्यामुळे दुसऱ्या पक्षात गेले पण त्यांना दुसरीकडे जाण्यापासून कोणी रोखले नाही. पक्षाच्या अध्यक्षांनी स्वतःच्या घरातच दोन तिकीटे दिली मग अन्य नेत्यांना त्या कसे रोखू शकणार ? जागा वाटप करताना त्या वॉ्डार्तील परिस्थिती काय आहे याचा नीट अभ्यासही केला गेला नाही. २२७ पैकी २७ वॉर्डात काँग्रेसला उमेदवार सापडले नाहीत यापेक्षा दुर्दैव कोणते असू शकते ?

महायुती विरूध्द ठाकरे बंधू अशा घनघोर संघर्षात काँग्रेस पक्षाचे चोवीस नगरसेवक निवडून आले ही मोठी कामगिरी आहे असे काहींना वाटते. पक्षाच्या दहा उमेदवारांचा पराभव तर पाचशेपेक्षा कमी मतांनी झाला आहे.

एमआयएमचा उदय ही तर काँग्रेसला धोक्याची घंटा आहे. राज्यात भाजपाची सत्ता आल्यापासून गेल्या दहा- बारा वर्षात सर्व राजकीय पक्षांना फुटीचा धोका निर्माण झाला आहे. भाजपाकडे जाणे म्हणजे सत्तेच्या परिघात जाणे . कामे करून घ्यायची असतील व प्रशासनाकडून कोणताही त्रास नको असेल तर भाजपाकडे जाणे हा एकच मार्ग आहे.

काँग्रसचे २४ नगरसेवक सत्तेचा मोह, अमिषे आणि आश्वासनांपासून किती काळ दूर राहतील, याची चर्चा सुरू झाली आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वर्षा गायकवाड यांनी लोकसभेत पंतप्रधानांच्या आसनासमोर घोषणा देऊन रणरागिणीचा अवतार दाखवला. आता मुंबईत काँग्रेस संघटनेला संजिवनी कधी देणार याची कार्यकर्ते वाट पाहात आहेत.

# दीनदयाळ उपाध्याय : गरिबांचे कैवारी

**(कालच्या अंकावरून पुढे)**

-----------------

दीनदयाळची वेशभूषा नेहमीच अगदी साधी असायची. सामान्य माणसांशी बोलणं सुद्धा अगदी सामान्य माणसाप्रमाणे! त्यामुळे ते कोणी नेते आहेत असं ते कुठे फिरताना पाहणाऱ्याला वाटायचं नाही.

एकदा लखनऊ येथे असताना कार्यक्रम किंवा सभा असल्यामुळे पंडितजींना केस कापून घ्यायचे होते. ते कार्यालयातून निघाले आणि नेहमीचे केश कर्तनालय बंद असल्यामुळे थोडा शोध घेऊ लागले. परंतु कुठे गर्दी जास्त तर काही कारणाने काही दुकानं बंद!

थोड्या वेळाने ते परत कार्यालयात आले. सोबतच्या कार्यकर्त्यांनी केस कुठे कापले म्हणून विचारलं तेव्हा फिरत्या सलून मध्ये असं उत्तर दीनदयाळजींनी दिलं. स्पष्टीकरण देताना त्यांनी रस्त्यावर धोपटे घेऊन फिरणाऱ्या आणि पोतं टाकून केस कापणाऱ्या व्यक्तीकडे केस कापून घेतले होते हे त्यांनी सांगितले.

**प्रा.डॉ. केदार ठोसर**
**चिखली.**

ते म्हणाले माझ्यापाशी जास्त वेळ नव्हता, त्याच्याकडे गिऱ्हाईक नव्हते; दोघांचीही सोय झाली. एका गरजू कारागिराला संधी दिली, याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर होते. दीनदयाळजींच्या जीवनात श्रमाचे थोडे पैसे गरिबांना मिळावे, याला महत्व होते. सोबतच अशा निमित्ताने सामान्य लोकांच्या तसेच गोरगरिबांच्या समस्या काय आहेत ते सहज गप्पा करताना माहीत करून घेत. या माहितीचा उपयोग अंत्योदय ही कल्पना साकार करण्यासाठी त्यांनी निश्चितच करून घेतला.

दीनदयाळजींचा स्वावलंबी भारत स्वातंत्र्यानंतर लवकरात लवकर झाला पाहिजे हा आग्रह होता. त्यावेळी पूर्णतः कृषीप्रधान असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचे क्षेत्र अधिकाधिक प्रगत होण्यासाठी हर हाथ को काम - हर खेत को पानी, हा नारा पंडितजींनी दिला होता.

त्यामधे जनसामान्यांचा विकास झाला पाहिजे तसेच ७० टक्के भारतीय जनता कृषी आणि कृषी संबंधित रोजगारावर अवलंबून असल्यामुळे ते रोजगार सुरक्षित राहिले पाहिजे हा सुद्धा त्यांचा विचार होता.

भारत सरकारने त्यादरम्यान अमेरिकेतून गहू आयात करण्यासाठी पी एल ४८० असा करार केला. या कराराला पंडित दीनदयाळनी संपूर्ण ताकतीने विरोध केला. यामध्ये दोन मुद्द्यांचा ते उल्लेख करत असत.

एक तर अन्नधान्याच्या बाबतीत स्वतंत्र भारताने स्वयंपूर्ण, स्वावलंबी होणे आवश्यक आहे. दुसरा भाग म्हणजे अमेरिका या कराराचा उपयोग भारतावर काश्मीर प्रश्नावर वाटाघाटी संबंधी दडपण आणण्यासाठी करू शकतो आणि त्यामध्ये पाकिस्तानचा फायदा आणि भारताचा तोटा होऊ शकतो. आणि? त्यामुळेच अमेरिकन गव्हाच्या आयातीवर जनतेने पूर्ण शक्तीने विरोध करावा वेळ आल्यास बहिष्कार टाकावा, असेही आवाहन त्यांनी केले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार आजही विकसित भारतासाठी आणि बंधू भावाच्या आधारावर मानवी समाज चालण्यासाठी सुसंगत आहेत. त्यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन.

■ ■ ■

# उत्क्रांतीवादाचा जनक चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते.

त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते.

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत.

त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले.

त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसगार्शी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले.

या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले.

या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली.

डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते.

बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

■ ■ ■

# प्रेम की भ्रम? व्हॅलेंटाईन संस्कृतीमागील वास्तव

**वाचक लिहितात**

आज खरे प्रेम हे एका विशिष्ट दिवसापुरते मर्यादित न राहता संपूर्ण आयुष्यभर जपले जाणारे मूल्य असायला हवे. प्रेम म्हणजे केवळ आकर्षण, जवळीक किंवा शारीरिक ओढ नसून त्यामागे जबाबदारी, आदर आणि निष्ठा असणे आवश्यक आहे.

युवक - युवतींनी समाजमाध्यमांवर दिसणाऱ्या चमकदार चित्रांमागील वास्तव ओळखणे गरजेचे आहे. प्रत्येक नातं सोशल मीडियावर दाखवण्यासारखं किंवा प्रदर्शनासाठी नसतं. भावनांच्या भरात कोणताही निर्णय न घेता, विचारपूर्वक आणि सजगपणे वागणे हाच खरा शहाणपणाचा मार्ग आहे.

तरुण वर्गासाठी फेब्रुवारी महिना विशेष महत्त्वाचा मानला जातो. हा महिना प्रेमाचा महिना म्हणून ओळखला जातो. रोझ डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग डे, किस डे आणि शेवटी व्हॅलेंटाईन डे–असा हा संपूर्ण आठवडा साजरा केला जातो. प्रत्यक्षात, एवढ्या प्रमाणात हे दिवस विदेशातही साजरे केले जात नाहीत. अशा प्रकारे साजरे केलेले प्रेम खरोखर टिकते का? प्रेम म्हणजे जिथे आपुलकी, विश्वास आणि समजूतदारपणा असायला हवा, तिथे आज बाजारूपणाची अंध स्पर्धा सुरू आहे. व्हॅलेंटाईन डे हा प्रेमाचा दिवस नसून अनेक अर्थांनी काळा दिवस ठरत असल्याचे म्हणणे गैर ठरणार नाही.

■ **कु. राधा प्रमोद पिंपळापुरे, उमरेड.**

# दृढ, नीतिमान, प्रामाणिक, ख्यातनाम वकील ॲड. शर्वरी तुपकर



वकिली पेशाचं बाळकडू घरातूनच मिळाल्याने वकिल या व्यवसायाभोवती जितकी प्रतिष्ठेची वलयं असतात, तेवढीच त्यामागील नवनवीन आव्हाने, संघर्ष, रात्रीचा दिवस करून अखंड घ्यावी लागणारी मेहनत, अभ्यास, संशोधन, समोरील कठीण व्यक्तीशी करावा लागणारा संयमित पण तेवढाच तर्कशुद्ध संवाद या कसोटींवर शर्वरी तुपकर खऱ्या उतरल्या आहेत. एवढेच नाही तर दृढ नीतिमान, प्रामाणिक, मूल्यांशी तडजोड न करणाऱ्या वकील म्हणून बुलढाणा जिल्ह्यात त्या ख्यातनाम झालेल्या आहेत. त्यांचा प्रवास जेवढा खडतर आहे तेवढाच रोमहर्षक आणि जिद्दीची पराकाष्ठा करणारा आहे.

सिविल केसेस, कौटुंबिक वाद आणि विशेषतः अँटी करप्शन आणि क्रिमिनल च्या केसेस यशस्वीपणे हाताळणारे लीडिंग प्रॅक्टिशनर म्हणून बुलढाणा जिल्ह्यात मोठं प्रस्थ असलेले वडील अशोक सावजी बुलढाणा जिल्ह्याच्या सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय असलेले वकील आहेत. बुलढाणा जिल्ह्याचा पाण्याचा प्रश्न, रस्ते, नगरपालिकेची अरेरावी, कष्टकऱ्यांवर होणारा अन्याय यासाठी लोकांना एकत्रित करणे, सामाजिक कार्यकर्त्यांवर सरकारने केस केल्यास त्यांच्या बाजूने एकही पैसा न घेता किंवा कोणत्याही खर्चाची अपेक्षा न बाळगता त्यांना न्याय मिळवून देणे यासाठी प्रयत्नशील धडपडणारे वडील यांच्या मूल्यधिष्ठित तालमीत शर्वरी तुपकर जेवढ्या वकील म्हणून घडल्या तेवढ्याच त्या संवेदनशील सामाजिक समस्येची जाण असणाऱ्या व्यक्ती म्हणून सुद्धा घडल्या. वडिलांप्रमाणेच स्वच्छ प्रतिमा असलेल्या वकील म्हणून त्यांनी आपली छाप सोडली आहे.

त्या आपल्या जीवनातील विसंगती सांगतात की मला जरी वडिलांनी एखाद्या मुलाप्रमाणे वाढविले असले काही बंधने माझ्यावर घातली नसली तरी, आजोबा आणि वडील दोघेही वकील असले तरी वकिलीची परंपरा मात्र आपल्या मुलीने चालवू नये असे त्यांच्या वडिलांना वाटत होते. पण जेव्हापासून समजायला लागलं तेव्हापासूनच वकील होण्याचे ध्येय बाळगणाऱ्या शर्वरी तुपकर यांनी घरातून असलेल्या प्रचंड विरोधाला न जुमानता वकील होण्याचा निर्णय घेतला.

नागपूरला त्यांनी एलएलबीचे शिक्षण पूर्ण करीत असतानाच वडिलांच्या मार्गदर्शनामध्ये त्या प्रॅक्टिस करू लागल्या. वडिलांकडे येणाऱ्या सिविल केसेस, कौटुंबिक केसेस, महसूल विषयक केसेस, क्रिमिनल आणि अँटी करप्शन च्या केसेस त्या हाताळू लागल्या. यामध्ये माहिती घेणे, ड्राफ्टिंग करणे, संबंधित फायलिंग करणे यासारखी कामे त्या करू लागल्या आणि हळूहळू त्या निष्णात होऊ लागल्या.

एका टप्प्यानंतर वडिल अँटी करप्शन आणि क्रिमिनलच्याच केसेस बघू लागले त्यामुळे सिविल केसेस, फॅमिली केसेस, महसूल विषयक वाद आपसुकच शर्वरी यांच्याकडे आल्या आणि हळूहळू त्या आपल्या कामात वडिलांच्या मार्गदर्शनामध्ये निष्णात होऊ लागल्या. सिव्हिल केसेस हाताळण्यात त्यांनी हातखंडा निर्माण केला.

त्या एक किस्सा सांगतात की वडिलांकडे एक अँटी करप्शन ची केस आली होती पण त्यांना दुसरीकडे ट्रायल साठी जायचे होते. तेव्हा वडिलांनी या अँटीकरप्शन केसची जबाबदारी शर्वरी तुपकर यांच्याकडे सोपविली. पण जेव्हा त्या आरोपीला कळले की ही केस अशोक सावजी नाही तर त्यांची मुलगी हाताळणार आहे तेव्हा त्या व्यक्तीने अँटी करप्शनचे ज्ञानही नसणाऱ्या व्यक्तीला ही केस सोपवली.



mahasagarngp@gmail.com

या घटनेमुळे शर्वरी या हादरून गेल्या आणि आपल्या महिला असल्यामुळे आपल्या क्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे असे त्यांना वाटले. महिला म्हणून दुय्यम वागणूक मिळण्याचे अनेक प्रसंग त्यांचे समोर आले पण आपल्या कर्तुत्वाने त्यांनी आपल्यातील महिला म्हणून येणाऱ्या मर्यादांवर मात केली.

आपल्या उमेदीच्या काळातच शेतकरी, तरुण, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सदैव उग्र आणि प्रखर आंदोलन करणारे सक्रिय कार्यकर्ते रविकांत तुपकर यांच्या आंदोलनांच्या केसेसच्या अनुषंगाने त्या दोघांची ओळखी झाली आणि त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. त्यांचे लग्नच या अटीवर झाले की मी सदैव शेतकरी आंदोलनामध्ये कार्यरत राहील आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी हि तुला सांभाळावी लागेल. पण कशाचीही तमा न बाळगता आणि त्यांच्या आंदोलनामध्ये खांद्याला खांदा लावून काम करेल असे आश्वासन देत त्या चतुर्भुज झाल्या.

त्या सांगतात, खऱ्या अर्थाने मी सामाजिक कार्यामध्ये सक्रिय झाली ती लग्नानंतर. शेतकऱ्यांचे आंदोलन, त्यांच्या न्यायासाठी धरणे आंदोलन, महिला मिळावे, कष्टकरी आणि तरुणांच्या न्यायासाठी हक्काच्या लढाया या सर्व सामाजिक कार्यांमध्ये त्या आपल्या पतीसोबत सहभाग दर्शवितानाच या सामाजिक कार्यकर्त्यांच्या बाजूने त्या न्यायदानाच्या प्रक्रियेमध्ये स्वतःला झोकून देतात.

आपल्या व्यवसायामध्ये सुरुवातीला महिला म्हणून मिळालेली दुय्यम वागणूक याचा दूरगामी परिणाम झालेल्या शर्वरी तुपकर यांनी गर्भनिदान परीक्षण करणाऱ्या केंद्रामध्ये स्टिंग ऑपरेशन केले आणि गरोदर अवस्थेतही जीव धोक्यात घालून डॉक्टर उमेश लोंढे यांना तुरुंगात टाकले. हा अनुभव फारच थरारक असा आहे, असे त्या म्हणाल्या.

लग्नानंतर पाच महिन्याच्या गरोदर असताना त्यांच्या परिचित असलेल्या वषार्ताई देशपांडे यांच्या मार्गदर्शनातून त्यांनी लिंगनिदान केंद्राचे स्टिंग ऑपरेशन करण्याचे ठरविले. टी.व्ही. नाईनच्या रिपोर्टर त्या आणि जाऊ म्हणून आलेल्या शैलाताई या तिघीजणी मुंबई येथे डॉक्टर उमेश लोंढे यांच्या केंद्रात गेल्या.

लिंगनिदान परीक्षण करण्यासाठी डॉक्टरांनी त्यांना गाडीतून १५ किलोमीटर अंतरावर दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये नेले. त्यांच्याजवळ केवळ एक रेकॉर्डर होता जो त्यांनी छातीजवळ ठेवला होता. त्या ठिकाणी डॉक्टर, त्या आणि सोनोग्राफी करणारे डॉक्टर असे तिघेच जण होते. एवढ्या वेळात त्यांनी पुरावा गोळा केला आणि कशाबशा तेथून निसटल्या. त्यांची मेडिकल कंडिशन नाजूक असतानाही अगदी जीवावर उदार होऊन त्यांनी स्टिंग ऑपरेशन केले आणि त्या डॉक्टरांना गजाआड केले. त्या अभिमानाने सांगतात की मी अशा चार केंद्रांचे स्टिंग ऑपरेशन केले आहे.

आपले जीवन संपूर्णपणे शेतकरी आंदोलनाला वाहिलेल्या पतीवर आलेला एक अतिप्रसंग आणि एक पत्नी आणि सक्षम वकील म्हणून त्यांची केलेली सुटका याचा एक हृदय द्रावक प्रसंग त्या सांगतात. शेतकऱ्यांना त्यांचा पीक विमा मिळावा म्हणून त्यांच्या पतीने आत्मदहनाची घोषणा केली होती. पत्रकार परिषद घेतली आणि ते गायब झाले.

जेव्हा ब्रेकिंग न्यूज सुरू झाल्या तेव्हा तुपकर यांना कळले की त्यांचे पती आत्मदहन करणार आहेत. त्यांच्या घराभोवती पोलिसांनी गराडा घातला, फोन टॅपिंग होत होते, पोलीस वारंवार त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलवत होते. पण त्या म्हणाल्या मला याबद्दल काहीही माहित नाही ते जर म्हणत आहे की ते आत्मदहन करणार आहेत तर ते नक्की करणार.

आत्मदहनाच्या आदल्या दिवशी त्यांच्या पतीचा फोन आला की तुम्ही कलेक्टर ऑफिस कडे या. कलेक्टर ऑफिसच्या अलीकडील चौकामध्ये पोलिसाच्या वेशात त्यांचे पती आले आणि स्वतःवर पेट्रोल ओतून आत्मदहनाची घोषणा करू लागले. सर्वत्र ओरड सुरु झाली. त्यांच्या हातातून माचिसची काडी घेण्याचा मी पुरेपूर प्रयत्न करत होते पण ते बधत नव्हते.

हे आंदोलन उधळून लावण्यासाठी तेथील खासदारांच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केली आणि लाठीचार्ज सुरु झाला. ३५ लोकांवर गुन्हे दाखल झाले आणि तुरुंगात डांबण्यात आले. यावेळेस माझ्यावरही लाठी हल्ला झाला असे त्या म्हणाल्या. आता तुरुंगात असलेल्या पतीची बेल करण्याची जबाबदारी पूर्णपणे माझ्यावर आली.

एक पत्नी आता वकील म्हणून पतीच्या सुटकेसाठी स्वतःचे कौशल्य पणाला लावणार होती. हे फार मोठे आव्हानही होते आणि तेवढेच दडपण ही होते. पण पण वडिलांच्या तालमीत तयार झालेली मी या दोघांचा सुवर्ण मध्ये साधला आणि हीटिंग अग्युमेंट करत मीही केस जिंकली. ही जिंकलेली लढाई माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी आव्हानात्मक आणि तेवढीच कौशल्यांची परीक्षा घेणारी ठरली असे त्या सांगतात.

पती सदैव आंदोलनात आणि तुरुंगात असतात त्यांच्या प्रत्येक केसेस मी तेवढ्याच निष्पक्षपणे लढते. माझ्यातील ही प्रामाणिकता, लढाववृत्ती, आणि नीतिमत्ता यामुळे विरोधी पक्ष सुद्धा ही कधीच मॅनेज होणार नाही या विश्वासाने माझ्याकडे आपली केस घेऊन येतात. आतापर्यंतच्या २२ वर्षांच्या काळात अनेक सिविल केसेस, फॅमिली केसेस, महसूल विषयक वाद लढवल्या आहेत पण आता अँटी करप्शन च्या केसेस आणि क्रिमिनलच्या केसेस लढवत सिव्हिल केसेस लढणाऱ्या वकील म्हणून माझ्यावर जो शिक्का बसला होता तो मी बऱ्यापैकी पुसला आहे असे त्या म्हणतात.

त्यांचे पती रविकांत तुपकर असे म्हणतात की मी तुरुंगाची लढाई लढत असताना बाहेरील लढाई माझी पत्नी लढते आणि सदैव माझ्या आंदोलनात पाठराखीण असलेली माझी पत्नी माझी खरी ताकद आहे.

असे म्हणतात की शंभर गुन्हेगार सुटले तरी चालेल पण एका निर्दोष व्यक्तीवर अन्याय होता कामा नये. याच जबाबदारीचे भान सदैव ठेवत, भावना आणि बौद्धिक तर्क यात संतुलन साधत आपल्या वडिलांची स्वच्छ, नीतिमान, प्रामाणिक आणि तडजोड न करणारी परंपरा त्या राखतच नाही आहेत तर त्यात त्यांनी पराकोटीचे यश प्राप्त केले आहे. आपल्यातील महिला म्हणून येणाऱ्या मयार्दांवर मात करत त्यांनी बुलढाण्याच्या कधीही तडजोड न करणाऱ्या वकील म्हणून आपले स्थान निर्माण केले आहे.

आपल्या पतीच्या आंदोलनांमध्ये खांद्याला खांदा लावून सहकार्य करून हक्कासाठी लढणाऱ्या हक्कांना काम प्राप्त करून द्यायचे आहे. पतीच्या पुढील लोकसभा जिंकण्याच्या मार्गाची तयारी करायची आहे असे त्या म्हणाल्या. एक कणखर, स्वच्छ, नीतिमान प्रामाणिक वकील म्हणून शर्वरी तुपकर यांचा प्रवास सदैव यशाच्या शिखरावर चालो यासाठी आमच्या शुभेच्छा.

------------------

**ॲड. शर्वरी तुपकर संपर्क क्रमांक**
**735097 5086**

■ ■ ■

# काँग्रेसची वेगळी रणनिती!

**(कालच्या अंकावरून पुढे)**

-----------------

अर्थात पश्चिम बंगालमध्ये कॉंग्रेसकडे गमावण्यासारखे काहीच नसल्याने, एकट्याच्या बळावर लढू इच्छिणाऱ्या कॉंग्रेसचा २०२१ प्रमाणे दारुण पराभव झाला तरी कॉंग्रेसला काही फरक पडणार नाही. एकट्याच्या बळावर लढल्यास कॉंग्रेसला पश्चिम बंगाल विधानसभेच्या सर्व जागांवर (२९४) आपले उमेदवार उभे करता येतील आणि त्या निमित्ताने आपली संघटना तळागाळापर्यंत पोहोचवता येईल.

महत्वाचे म्हणजे कॉंग्रेसला नवीन चेहऱ्यांना उमेदवारी देता येईल. सध्या कॉंग्रेस पक्ष, मुर्शिदाबाद आणि माल्डा या विभागांपुरता मर्यादित राह्यल्याचे चित्र दिसत आहे. कॉंग्रेसला लवकरच होणाऱ्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत कितपत यश मिळेल हे आताच सांगता येणार नाही.

परंतु कॉंग्रेस, तृणमूल कॉंग्रेसची व्होट बँक असलेल्या मुस्लिम मतांमध्ये काही प्रमाणात विभाजन घडवून, भाजपाचा फायदा करू शकेल. विशेषतः माल्डा आणि मुर्शिदाबाद या मुस्लिम बहुल भागात मुस्लिम समाजाच्या मतांमध्ये विभाजन घडवून, कॉंग्रेस, तृणमूल कॉंग्रेसचे नुकसान करू शकेल.

माल्डा आणि मुर्शिदाबाद विभागातील मुस्लिम समाज हा पुर्वीपासून कॉंग्रेसचा पाठिराखा राहिला आहे. कॉंग्रेसचे नेते ए.बी.ए. घनीखान चौधरी हे माल्डा मधील अतिशय लोकप्रिय नेते होते. तेंव्हा पासून माल्डा हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत (२०२१) कॉंग्रेसचा एकही आमदार निवडून आला नसला तरी २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत माल्डा उत्तर मतदारसंघातून कॉंग्रेसचा उमेदवार निवडून आलेला आहे.

त्यामुळे विधानसभा निवडणुकीत माल्डा आणि मुर्शिदाबाद या विभागातील विधानसभेच्या जागांवर मुख्य लढत ही कॉंग्रेस, भाजपा आणि तृणमूल कॉंग्रेस यांच्यात होईल. येथे कॉंग्रेस आणि तृणमूल कॉंग्रेस यांच्यात मुस्लिम मतांचे मोठ्या प्रमाणात विभाजन झाल्यास त्याचा फायदा भाजपाला मिळू शकेल.

कॉंग्रेसने कोणत्याही पक्षाशी आघाडी करण्यास नकार दिल्याने, त्याचा सर्वात मोठा फटका मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला बसू शकेल. तृणमूल कॉंग्रेस आणि भाजपा बरोबर एकट्याने सामना करण्याइतकी ताकद आता मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीकडे राहिलेली नाही.

त्यामुळे तृणमूल काँग्रेसला कडवा विरोध करणारे, डाव्या आघाडीचे जे समर्थक आहेत त्यापैकी काही समर्थक तृणमूल काँग्रेसचा पराभव करण्यासाठी भाजपाला मतदान करु शकतील. कारण तृणमूल काँग्रेसचा पराभव फक्त भाजपाच करु शकेल ही वस्तुस्थिती आहे.

मध्यंतरी तृणमूल काँग्रेस मधून बाहेर पडलेले मुस्लिम नेते हुमायून कबीर हे ममता बॅनर्जी यांना आव्हान देत आहेत. हुमायून कबीर यांनी जनता उन्नयन पार्टी या पक्षाची मध्यंतरी स्थापना केली आहे.त्यांनी ओवैसी यांच्या मजलिसे इत्तेहादूल मुस्लिमीन या पक्षाशी तसेच नौशाद सिद्दीकी यांच्या इंडियन सेक्युलर फ्रंट या पक्षाशी आघाडी करण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत.

ती आघाडी अस्तित्वात आली तर तृणमूल काँग्रेस समोर मोठे आव्हान उभे राहू शकेल. या आघाडीला पश्चिम बंगाल मधील मुस्लिम समाजाचा बऱ्यापैकी पाठिंबा मिळाला तर, ममतांच्या मुस्लिम व्होट बँकेला खिंडार पडू शकेल आणि त्याचा फायदा भाजपाला मिळेल.

कॉंग्रेसने एकट्याच्या बळावर पश्चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुका लढण्याचा जो निर्णय घेतला आहे,त्याचा कितपत फायदा कॉंग्रेसला मिळेल, हे पाहण्यापेक्षा, त्यामुळे तृणमूल काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीचे किती नुकसान होईल, ते पाहणे महत्त्वाचे ठरेल.

---------------

■ **अभय गोखले**

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## व्हॅलेंटाईन डे?

**पाण्यावाचून मासोळी**
**जशी तडफडते**
**तशी प्रेमी युगलांची**
**आंतरिक ओढ असते ..**

**आत्यंतिक विश्वासावर**
**असते हे टिकून नाते**
**विश्वासघात झाला कदाचित**
**तर आत्मक्लेश करून घेते ..**

**बावनकशी सोन्या सारखं**
**तावून निघालेलं असतं प्रेम**
**'व्हॅलेंटाईन डे' सारखे**
**उगीच खेळत नाहीत ते गेम ..**

**परस्पर हृदयांची**
**असते अनामिक ओढ**
**ते घेऊ शकत नाही**
**एकमेकांशी काडीमोड ..**

# एचसीजी कॅन्सर सेंटरतर्फे जनजागृती उपक्रमांचे आयोजन



**नागपूर, ११ फेब्रुवारी :** जागतिक कॅन्सर दिनाच्या निमित्ताने एचसीजी कॅन्सर सेंटर, नागपूर यांनी ८ फेब्रुवारी रोजी व्हीआर मॉल, नागपूर येथे कलर्स ऑफ होप आर्ट गॅलरीचे आयोजन केले. कला आणि सामुदायिक सहभागाच्या माध्यमातून कॅन्सरविषयी जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या गॅलरीमध्ये कलर्स ऑफ होप कॅनव्हास पेंटिंग स्पर्धेतून निवडलेल्या कलाकृती प्रदर्शित करण्यात आल्या. या कलाकृतींमध्ये आशा, धैर्य आणि जिद्द या विषयांचे प्रभावी चित्रण करण्यात आले होते. शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या मॉलमध्ये आयोजित या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि मोठी उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाला सीओओ सौ. नीता राजवार यांची मान्यवर उपस्थिती लाभली. रुग्णालयाच्या चौकटीबाहेर जाऊन कॅन्सरविषयी जनजागृती करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यावेळी बोलताना एचसीजी कॅन्सर सेंटर, नागपूर यांच्या सीओओ सौ. नीता राजवार म्हणाल्या,

कॅन्सरविषयी जनजागृती तेव्हाच प्रभावी ठरते जेव्हा ती लोकांपर्यंत त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील ठिकाणी पोहोचते. कलर्स ऑफ होपच्या माध्यमातून आम्ही लवकर निदानासाठी प्रेरणा देणे, वेळेवर उपचाराला प्रोत्साहन देणे आणि समाजाला हा संदेश देणे हा आमचा उद्देश आहे की जागरूकता, संवेदनशीलता आणि सामूहिक पाठिंब्याच्या जोरावर कॅन्सरशी लढा देता येतो.

आर्ट प्रदर्शनासोबतच कॅन्सर प्रतिबंध आणि लवकर निदानाबाबत जनजागृती करण्यासाठी नुक्कड नाटकांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला अधिक बळ देण्यासाठी डॉ. वैभव सोनवाणी आणि डॉ. मंगेश पाटील (रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट), डॉ. शांतनू पेंडसे (मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट) आणि डॉ. रजत बजाज (हेमॅटोलॉजिस्ट) यांनी संवादात्मक जनजागृती सत्रे घेतली. त्यांनी उपस्थित नागरिकांशी कॅन्सरविषयी जागरूकता आणि वेळेवर उपचाराचे महत्त्व यावर संवाद साधला.

# नागपूरातील ॲडव्हान्टेज विदर्भ औद्योगिक प्रदर्शनात भारतीय रोखे बाजार दालनाचे आयोजन

नागपूर, ११ फेब्रुवारी : भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (एसईबीआय) च्या मार्गदर्शनाखाली, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया (एनएसई), इतर बाजार पायाभूत संस्था आणि एएमएफआय यांच्या सहकार्याने 'ॲडव्हान्टेज विदर्भ' या प्रदर्शनात 'भारतीय रोखे बाजार' दालन उभारण्यात आले होते. नागपुरातील आरटीएमनू कॅम्पस मैदानावर ६ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हे प्रदर्शन पार पडले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आणि राज्याचे महसूल व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. या महाकुंभात २० हून अधिक देशांतील प्रतिनिधी, २०० हून अधिक उद्योग तज्ज्ञ आणि २५ पेक्षा जास्त ज्ञानसत्रे आयोजित करण्यात आली होती.

केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) राज्यमंत्री श्रीमती शोभा करंदलाजे यांनी या दालनाला भेट दिली. यावेळी सेबीचे कार्यकारी संचालक जीवन सोनपरोटे, एनएसईचे मुख्य नियामक अधिकारी पीयूष चौरसिया



आणि इतर वरिष्ठ प्रतिनिधींच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी एमएसएमई साठी विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये रोखे बाजारातून निधी उभारणीची प्रक्रिया आणि विविध नियामक अनुपालनांची माहिती देण्यात आली.

गुंतवणूकदार जागृती आणि सुरक्षा: सेबीचे कार्यकारी संचालक जीवन सोनपरोटे आणि एनएसईचे पीयूष चौरसिया यांनी गुंतवणूकदारांना आर्थिकसाक्षरतेचेमहत्त्व पटवून दिले. सोनपरोटे यांनी जनतेशी संवाद साधताना रोखे बाजारातील संधी आणि जोखीम यावर प्रकाश टाकला. फसवणूक आणि घोटाळ्यांपासून संरक्षण मिळवण्यासाठी त्यांनी 'SEBI Check' या सुविधेबद्दल माहिती दिली, ज्याद्वारे गुंतवणूकदार नोंदणीकृत मध्यस्थांचे यूपीआय आयडी आणि बँक तपशील सत्यापित करू शकतात.

या दालनाचे उद्घाटन अविष्कार नाईक (वरिष्ठ उपाध्यक्ष, एनएसई), कृष्णन अय्यर (वरिष्ठ उपाध्यक्ष, एनएसई), श्रीमती बाला कुमारी (उपमहा व्यवस्थापक, एसईबीआय), राहुल केलापुरे (सहायक महाव्यवस्थापक, एसईबीआय) आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाले.

# मोबाईलमधील ओटीपीमुळे होणाऱ्या ऑनलाइन चोरीला आळा घालण्यासाठी एअरटेलची नवी यंत्रणा कार्यान्वित

**नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी :** स्पॅम आणि ऑनलाइन फसवणूकीच्या वाढत्या समस्येला आळा घालण्यासाठी एअरटेलने आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून फ्रॉड अलर्ट ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवी अत्याधुनिक सुविधा सुरु केली आहे. फ्रॉड अलर्ट ही नाविन्यपूर्ण प्रणाली ग्राहकांच्या वन-टाइम पासवर्ड संबंधित बँक फसवणूकींपासून तत्काळ प्रभावीपणे संरक्षण देते. ही प्रणाली कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असल्याने संशयास्पद व्यवहार ओळखते. फसवणूकीचे व्यवहार होण्याची शक्यता असल्यास ही प्रणाली तत्काळ ग्राहकांना संबंधित व्यवहाराबद्दल सूचित करते. त्यामुळे एअरटेलचे ग्राहक ऑनलाइन फसवणूकीच्या व्यवहारातून पूर्णपणे सुरक्षित झाले आहे.

घरात ऑनलाईन ऑर्डरच्या माध्यमातून येणारे पार्सल किंवा अन्नपदार्थांचे वितरण होण्याकरिता ग्राहकांच्या मोबाईलनंबरवर येणा-याओटीपीची मागणी केली जाते. घरपोच होणारे वितरण स्विकारताना अनेकांची लगबग सुरु असते. सायबर भामटे लोकांची होणारी धावपळ लक्षात घेत त्याचा गैरफायदा घेतात. अनेकदा वस्तू वितरण करण्याच्या बहाण्याने किंवा तातडीची सेवा देण्याच्या नावाखाली हे सायबर भामटे ग्राहकांकडून ओटीपीची मागणी करतात. कामाच्या व्यापात अडकलेल्या ग्राहकाला संबंधित ओटीपी हा बँकेऐवजी वितरणसेवेशी संबंधित असल्याचा गैरसमज होतो. प्रत्यक्षात हा ओटीपी ग्राहकांच्या बँकेतील व्यवहारांशी संबंधित गोपनीय ओटीपी असण्याची शक्यता असते. ग्राहकांकडून अनावधानाने दिलेला ओटीपी सायबर भामटे ऑनलाइन चोरीकरिता वापरुन ग्राहकांना लुबाडतात.

एअरटेलच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नव्या प्रणालीबाबत एअरटेल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शाश्वत शर्मा यांनी आपले मत मांडले. ते म्हणाले, एअरटेल हे सुरक्षित नेटवर्क असावे, हे आमचे ध्येय आहे. एअरटेल सुरक्षित ठेवण्याकरिता उपाययोजना शोधताना आम्हांला मोबाईलमधील वनटाइम पासवर्ड (ओटीपी)च्या माध्यमातून होणारा चोरीचा मार्ग लक्षात आला. डिजिटल व्यवहार सुरक्षित ठेवण्यासाठी ओटीपी महत्त्वाची भूमिका साकारत असले तरीही चोरीसाठीही ओटीपीचा गैरवापर होतो. यावर उपाययोजना म्हणून आम्ही तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्याचे ठरवले. एअरटेल नेटवर्कमध्ये या तंत्रज्ञानच्या मदतीने ग्राहक ऑनलाइन चोरींपासून सुरक्षित असल्याचे आम्हांला निश्चितच समाधान आहे.

आमच्या नव्याने विकसित आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित या प्रणालीतून थेट नेटवर्क स्तरावर काम केले जाते. सायबर भामट्यांकडून फसवणूकीच्या हालचाली सुरु होताच ही यंत्रणा संभाव्य धोके ओळखते. वेळीच हस्तक्षेप करुन सायबर गुन्हे रोखते. सायबर फसवणूकीच्या घटना आटोक्यात आणण्यात ही प्रणाली अत्यंत अचूकतेने आणि प्रभावीपणे काम करत असल्याचे विविध चाचण्यांतून सिद्ध झाले आहे. एअरटेलच्या हरियाणा येथील ग्राहकांना कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नव्या प्रणालीची सुविधा अगोदरपासूनच उपलब्ध करण्यात आली आहे. येत्या दोन आठवड्यात एअरटेलच्या देशभरातील सर्व ग्राहकांना ही सुविधा पुरवली जाईल.

# अझीम प्रेमजी विद्यापीठाकडून पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**नागपूर, ११ जानेवारी :** अझीम प्रेमजी विद्यापीठाने त्यांच्या बंगळूरु, भोपाळ आणि रांची येथील कॅम्पसमध्ये आगामी शैक्षणिक वर्षासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया जाहीर केली आहे. या अभ्यासक्रमांसाठी इच्छुक असणाऱ्यांना २२ फेब्रुवारी २०२ पर्यंत अर्ज करता येणार आहेत.

विद्यापीठामध्ये शिक्षणशास्त्र, विकासशास्त्र, पूर्व प्राथमिक शिक्षण (अर्ली चाइल्डहूड एज्युकेशन), अर्थशास्त्र, उपयोजित अर्थशास्त्र, सार्वजनिक आरोग्य आणि हवामान बदल व शाश्वतता या विषयांत पदव्युत्तर पदवी घेता येईल. कॅम्पसनुसार हे अभ्यासक्रम अशा विद्यार्थ्यांसाठी तयार केले गेले आहेत, ज्यांना भक्कम शैक्षणिक पाया रचण्याबरोबरच समकालीन सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांचा सखोल अभ्यास करायचा आहे.

विद्यापीठाच्या बंगळूरु कॅम्पसमध्ये एम.ए. अर्थशास्त्र, एम. ए. विकासशास्त्र (डेव्हलपमेंट) एम. ए. शिक्षणशास्त्र (एज्युकेशन), एम. ए. पूर्व प्राथमिक शिक्षणशास्त्र, एम. एस्सी. हवामान बदल व शाश्वतता ; भोपाळ कॅम्पसमध्ये एम. ए. विकासशास्त्र, मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ (एमपीएच) ; तर रांची कॅम्पसमध्ये एम. ए. उपयोजित अर्थशास्त्र, एम. ए. विकासशास्त्र आदी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेता येणार आहे.

सर्व कॅम्पसमधील हे पदव्युत्तर अभ्यासक्रम आंतरशाखीय शिक्षण, तज्ज्ञ प्राध्यापकांद्वारे अध्यापन आणि वास्तव जगातील परिस्थितींशी सतत जोडलेले राहण्यावर भर देतात. विद्यार्थी वर्गातील अभ्यासाबरोबर प्रत्यक्ष क्षेत्रीय अनुभव आणि प्रकल्पांच्या माध्यमातून शिक्षण घेतात. तसेच, शैक्षणिक आणि व्यावसायिक अशा दोन्ही पार्श्वभूमी असलेल्या प्राध्यापकांबरोबर त्यांना काम करण्याची संधी मिळते. हे अभ्यासक्रम शिक्षण, विकास, अर्थशास्त्र, सार्वजनिक आरोग्य, हवामान बदल आणि संबंधित क्षेत्रांतील करिअरमध्ये रस असलेल्या विविध शाखांमधील पदवीधरांसाठी खुले आहेत. तसेच, ज्यांना पुढील शैक्षणिक अभ्यास आणि संशोधनासाठी भक्कम पाया हवा आहे, त्यांच्यासाठीही हे अभ्यासक्रम उपयुक्त आहेत.

अभ्यासक्रमासाठी २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करण्याची शेवटची संधी मिळणार आहे. अधिक माहिती व अर्जासाठी अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या https://azimpremjiuniversity.edu.in/postgraduate या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'फ्लेक्सी कॅप फंड्स'ला पहिली पसंती: बाजारातील चढ उतारांमध्ये नागपूरच्या गुंतवणूकदारांचा विश्वास

**नागपूर, ११ फेब्रुवारी :** बदलत्या जागतिक घडामोडी आणि बाजारातील अस्थिरतेच्या काळात, 'फ्लेक्सी कॅप फंड्स' किरकोळ गुंतवणूकदारांची पहिली पसंती ठरत आहेत. कमी जोखीम आणि उत्तम परतावा यांचा समतोल शोधणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी हे फंड एक महत्त्वाचा पर्याय म्हणून समोर आले आहेत. गुंतवणूकदारांचा कल आता बदलताना दिसत आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये गुंतवणूकदारांनी इतर फंड्सच्या तुलनेत फ्लेक्सी कॅप फंड्सवर सर्वाधिक विश्वास दर्शवला असून यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे.

एएमएफआय च्या ताज्या आकडेवारीनुसार, २०२५ या वर्षात गुंतवणूकदारांनी फ्लेक्सी कॅप फंड्समध्ये विक्रमी ८०,९७८ कोटींची गुंतवणूक केली आहे. ही रक्कम स्मॉल-कैप(५२,३२१ कोटी) आणि मिड-कैप(४९,९३९ कोटी) सारख्या मोठ्या श्रेणींमधील गुंतवणुकीच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. गुंतवणुकीचा हा वेग डिसेंबर २०२५ मध्ये सर्वाधिक होता, जेव्हा एकाच महिन्यात १०,०१९.२७ कोटींची गुंतवणूक झाली ; जी मागील महिन्याच्या तुलनेत २३% जास्त आहे.

टाटा एसेट मॅनेजमेंटचे सीआयओ (इक्विटीज) राहुल सिंह म्हणतात, बाजार नेहमी एकसारखा राहत नाही. फ्लेक्सी कॅप धोरण आम्हाला बाजाराच्या बदलत्या परिस्थितीनुसार चालण्याचे स्वातंत्र्य देते. जेव्हा गरज असते, तेव्हा आम्ही महागड्या स्मॉल आणि मिड-कॅपशेअर्समधून बाहेर पडून मोठ्या आणि सुरक्षित कंपन्यांमध्ये गुंतवणूक करतो. यामुळे गुंतवणूकदारांना बाजारानुसार कधी पैसा लावायचा किंवा कधी काढायचा, याचा स्वतः विचार करावा लागत नाही ; अशा प्रकारे, त्यांच्या गुंतवणुकीची सुरक्षा आणि वाढीचा वेग एका कुशल फंड मॅनेजरच्या हातात राहतो.

या अष्टपैलू फंड श्रेणीबद्दल गुंतवणूकदारांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी, टाटा म्युच्युअल फंडने आपला नवा 'फुल फ्लेक्सी' उपक्रम लाँच केला आहे. दीर्घकालीन गुंतवणुकीतून चांगला फायदा मिळवण्यासाठी बाजारानुसार गुंतवणुकीत बदल करणे (फ्लेक्सिबल राहणे) किती गरजेचे आहे, हे या मोहिमेद्वारे सांगितले जात आहे.

रिटेल गुंतवणूकदारांसाठी फ्लेक्सी-कॅफंड खूप फायदेशीर आहेत, कारण हे फंड वेगवेगळ्या प्रकारच्या शेअर्समध्ये गुंतवणूक करून बाजारातील चढ-उतारांचा फायदा घेतात. गुंतवणूकदार एसआयपीच्या माध्यमातून अस्थिर बाजारपेठेतही थोडी-थोडींतवणूक करून आपल्या पोर्टफोलिओचा धोका कमी करू शकतात आणि उत्तम परतावा मिळवू शकतात.

# क्वांटम एएमसीने विदर्भात आपली उपस्थिती वाढवली

**नागपूर, ११ जानेवारी :** क्वांटम ॲसेट मॅनेजमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (क्वांटम एएमसी) ने आज नागपूरमध्ये आपले नवीन ऑफिस सुरू केल्याची घोषणा केली. हे पाऊल विदर्भ क्षेत्रातील आपली उपस्थिती मजबूत करण्यासाठी आणि महाराष्ट्रातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या आर्थिक बाजाराशी अधिक जवळून संपर्क साधण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

भारताचे केंद्र म्हणून ओळखले जाणारे नागपूर हे मध्य भारताचे एक महत्त्वाचे आर्थिक आणि व्यावसायिक केंद्र बनले आहे. नागपूरचे चांगले स्थान, सुधारलेली रस्ते आणि पायाभूत सुविधा, आणि वाढती कनेक्टिव्हिटी यामुळे हे शहर विदर्भ आणि आसपासच्या भागांसाठी नैसर्गिक प्रवेशद्वार बनले आहे. गेल्या दहा वर्षांत नागपूरने देशाच्या सरासरीपेक्षा जास्त वाढ अनुभवली आहे आणि आर्थिक वर्ष २१ ते आर्थिक वर्ष २६ दरम्यान हे शहर सर्वात वेगाने वाढणाऱ्या शहरांपैकी एक आहे. सर्व प्रमुख टेक कंपन्यांनी नागपूरमध्ये आपले ऑफिस स्थापन केले असून सुमारे ७५,००० ते ८०,००० टेक व्यावसायिक येथे काम करत आहेत. त्यामुळे नागपूर फक्त खाणकाम आणि लॉजिस्टिक केंद्र राहिलेले नाही तर अनेक क्षेत्रांमध्ये वेगाने वाढणारे शहर बनले आहे. या परिवर्तनामुळे वेतनधारक व्यावसायिक, उद्योजक, लघु आणि मध्यम उद्योगांची संख्या वाढली आहे, ज्यामुळे लोकांमध्ये आर्थिक जागरूकता आणि गुंतवणुकीबाबत समज देखील वाढली आहे.

नागपूर हे भारताच्या आर्थिक क्षेत्रातील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास आले आहे आणि दीर्घकालीन, स्थिर वाढीसाठी त्याची क्षमता दाखवली आहे. शहराची एसेट्स अंडर मॅनेजमेंट (व्यवस्थापनाखालील मालमत्ता) जवळपास १७ पट वाढून मार्च २०१२ मधील २,५२५ कोटींहून डिसेंबर २०२५ पर्यंत सुमारे ४२,००० कोटींपर्यंत पोहोचली आहेत. ही २३.२% वाढ राष्ट्रीय सरासरी २०% पेक्षा जास्त आहे. विशेष म्हणजे, नागपूरच्या या जलद प्रगतीमुळे २०१२ मध्ये जास्त बाजारपेठेतील हिस्सा असलेली ४५ मोठी शहरे मागे पडली आहेत आणि नागपूरने टियर-२ शहरांमध्ये आपले अग्रगण्य स्थान मजबूत केले आहे.

या प्रसंगी बोलताना, सीमांत शुक्ला, चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर, क्वांटम एएमसी, यांनी सांगितले, भारतातील



वेगाने वाढणाऱ्या प्रमुख बाजारात विस्ताराचा भाग म्हणून नागपूरमध्ये आपले ऑफिस सुरू करताना आम्हाला आनंद होत आहे. विदर्भ भागासाठी व्यावसायिक केंद्र म्हणून नागपूरचे महत्त्वाचे स्थान आमच्या वाढीसाठी नैसर्गिक विस्तार ठरते. या भागातील गुंतवणूकदारांचा सहभाग वाढत असल्यामुळे, आमचे नवीन ऑफिस आम्हाला वितरक आणि गुंतवणूकदारांसोबत अधिक जवळून काम करण्यास मदत करेल, तसेच क्वांटमच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाशी सुसंगत, पारदर्शक आणि संशोधनावर आधारित गुंतवणूक उपाय देईल.

नागपूर ऑफिसच्या उद्घाटनासह, क्वांटम एएमसीचे उद्दिष्ट उदयोन्मुख बाजारांमध्ये गुंतवणूकदारांपर्यंत दर्जेदार गुंतवणूक उपाय पोहोचवणे आणि भारतातील बदलत्या गुंतवणूकदारांच्या लँडस्केपला पाठिंबा देणे आहे. हे काम कंपनी प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि दीर्घकालीन लाभ देणाऱ्या दृष्टीकोनावर आधारित करते.

# ड्रोवीच्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वामध्ये होणार चिमुकल्या स्वप्नांची रंगीबेरंगी उधळण

**नागपूर, ११ फेब्रुवारी :** पहिल्या पर्वाला लहान मुलांकडून भरभरून मिळालेल्या प्रतिसादानंतर, ड्रोवी पुन्हा सज्ज आहे चिमुकल्यांच्या पसंतीस पडलेल्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेचे दुसरे पर्व म्हणजेच सीझन २ घेऊन येण्यासाठी. यानिमित्ताने त्यांना आपल्या मुक्त छंद विचारातून आणि कलेच्या माध्यमातून आपली कलाकृती साकारण्याची आणि व्यक्त होण्याची संधी मिळणार आहे.

मागील वर्षाप्रमाणे यावर्षीच्या स्पर्धेची थीम आहे "Bored? Good! Ideas Flood!". याच थीमच्या सहाय्याने ड्रोवी बॉय म्हणजेच, ड्रोवी या ब्रँडच्या खेळकर अशा मॅस्कॉटसोबत चिमुकल्यांना विविध रंगांच्या माध्यमांतून मनावरची मरगळ झटकून टाकण्यासाठी आणि कंटाळवाणी दिनचर्या मजेदार बनवण्याची संधी मिळणार आहे.

या स्पर्धेचे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये जसे की मुंबई, पुणे, संभाजी नगर, कोल्हापूर, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, नाशिक आणि सातारा इथे आयोजन केले जाणार आहे. यासोबतच मध्य प्रदेशातील इंदूर, रतलाम, खंडवा तसेच निजामाबादसारख्या इतर शहरांमध्येही याचे आयोजन करण्यात येणार आहे. या शहरांतील नामांकित बालरोगतज्ञांच्या सहयोगाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून त्यांचा सक्रिय पाठिंबा या स्पर्धेला असणार आहे. या आयोजनात संबंधित शहरांतील नामांकित बालरोगतज्ज्ञ सहकार्य करत असून ते पुरस्कार वितरणासाठी परीक्षक आणि प्रमुख अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत.

प्रत्येक स्पर्धकाला त्यांच्या प्रयत्नांबद्दल आणि सर्जनशीलतेबद्दल स्पर्धेतील सहभागाचे ई-प्रमाणपत्रदिले जाईल.

स्पर्धेची अंतिम तारीख २० फेब्रुवारी २०२६ असून, निकाल २८ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात येतील. इच्छुक स्पर्धक आपला सहभाग बालरोगतज्ज्ञांच्या दवाखान्यांमधून, रिटेल आउटलेट्समधून किंवा क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन नोंदवू शकतील.

स्पर्धक नोंदणी प्रक्रियेची माहिती मिळवण्यासाठी आणि आपला सहभाग नोंदवण्यासाठी खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करा किंवा व्हाट्सप वर ९९३००३१५८२ या क्रमांकावर असा मेसेज पाठवा.

## गुरूवार दि. १२ फेब्रुवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १५७ | ७९० | १७९ | २३५ | ७८९ | २४९ | १७० | ४५० |
| ४९० | २४० | २६९ | ५७८ | २५७ | ४५६ | २६० | ३६० |
| ५८० | १६९ | ३६८ | ३७० | ६८० | ३५७ | ३५० | २७० |

| जोडी | जोडी |
|---|---|
| ३२ - ६२ - ७१ - ०१ | ४३ - ५३ - ८२ - ९२ |
| ३५ - ६५ - ७९ - ०९ | ४६ - ५६ - ८० - ९० |
| ३८ - ६८ - ७४ - ९४ | ४७ - ५७ - ८१ - ९१ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १२ फेब्रुवारी २०२६

## गुरूवार दि. १२ फेब्रुवारी २०२६

| सर्व बाजार साठी | |
|---|---|
| | १० - २० - ५३ - ८३ |
| | १९ - २९ - ५६ - ८६ |
| | १७ - २७ - ५४ - ८४ |
| | १२८ - २०० - २४९ - १८९ |
| | २९० - ३९० - ३५७ - ३७८ |
| | ५७९ - ५७० - ६९० - २६० |

सर्व बाजारासाठी

| गुरू. ते शनि. ओपन डे | | | | | | गुरू. ते शनि. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७० | | २४९ | | १८० | | १२४ | | ११४ | | २३० | |
| ३६९ | ८ | १२२ | ५ | ३७९ | ९ | २७८ | ७ | २७७ | ६ | ३६६ | ५ |
| ४४० | | ४४७ | | ५६८ | | ४६७ | | ३३० | | ४४७ | |

| गुरू. ते शनि. क्लोज डे | | | | | | गुरू. ते शनि. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५७० | | ६८० | | ५६७ | | ६०० | | १२५ | | १२६ | |
| २२८ | २ | ३३८ | ४ | २६० | ८ | १२३ | ६ | २७९ | ८ | २८९ | ९ |
| १५६ | | ४०० | | ३५० | | ३६७ | | ४६८ | | ४७८ | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० २ ४ ६ ८

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्ही दिवसभर विविध कामांमध्ये व्यस्त असाल. धावपळीपासून मुक्त होण्यासाठी स्वत:साठी थोडा वेळ काढा. तुम्ही तुमची वैयक्तिक कामे पूर्ण करण्यात व्यस्त असाल. अनावश्यक चिंता सोडून करिअरवर लक्ष द्या.

**वृषभ :** तुम्हाला कामासाठी परदेशात जावे लागू शकते. आज कोणतेही नवीन काम सुरू करण्यापूर्वी, वडिलांचा सल्ला घ्या, जे भविष्यात तुम्हाला नक्कीच फायदेशीर ठरेल. आज तुम्हाला आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते.

**मिथुन :** तुमचे आरोग्य चांगले राहील. ऑफिसमध्ये तुमच्यावर जास्त काम असेल. तुमच्या कामाच्या पद्धतींमध्ये काही बदल आवश्यक आहेत. भूतकाळातील चुकीमुळे ताणलेल्या मित्रांसोबतचे संबंध आज सुधारतील.

**कर्क :** आज नशीब तुमच्या बाजूने असेल, जे फायदेशीर ठरेल. तुमचे काम तुमच्या प्रयत्नांमध्ये गुंतलेले दिसेल. तुमची कार्यक्षमता तुम्हाला उत्कृष्ट कामे पूर्ण करण्यास सक्षम करेल. तुम्ही जमीन खरेदी करू शकता

**सिंह :** आजचा दिवस आत्मविश्वासाने भरलेला असेल. कामाच्या ठिकाणी बढतीच्या संधी मिळतील. तुमच्या जोडीदाराचा आणि कुटुंबाचा पाठिंबा तुमच्या कामाच्या क्षमतेत आणखी सुधारणा करेल.

**कन्या :** आज नवीन माहिती मिळू शकते. अविवाहित व्यक्तींना लग्नाचे प्रस्ताव येतील. लग्नाच्या चर्चा अंतिम होतील. तुम्ही तुमच्या कुटुंबासह रात्रीच्या जेवणाची योजना आखू शकता.

**तुळ :** आज तुमच्या पद्धती बदलल्याने तुमच्या कामामध्ये सुधारणा होईल. तुमच्या दैनंदिन दिनचर्येत सकारात्मक बदल होतील. तुम्ही उधार दिलेले पैसे परत मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** दुसजयांच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका. महिलांना आज अनपेक्षित आर्थिक लाभ होऊ शकतो. जर तुम्ही नवीन जमीन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर आजचा दिवस शुभ आहे.


**धनु :** समस्येवर तोडगा काढण्यातही तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला आवडणाजया गोष्टींमध्ये तुम्ही थोडा वेळ घालवाल. यामुळे तुम्हाला आध्यात्मिक आणि मानसिक आनंद मिळेल.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर असेल. या राशीखाली जन्मलेल्या बिझनेसमनना अनपेक्षित आर्थिक लाभ होतील. तुमची आर्थिक परिस्थिती चांगली असेल.

**कुंभ :** प्रेमी युगुलांसाठी आजचा दिवस खूप चांगला आहे. बाहेर थोडा वेळ घालवल्याने नाते अधिक मजबूत होईल. मार्केटिंगमध्ये काम करणाजयांचा दिवस चांगला जाईल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**मीन :** विद्यार्थ्यांना त्यांच्या मेहनतीचे चांगले परिणाम दिसतील. जर तुम्ही आज नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल तर तुमच्या कुटुंबातील सदस्यांचा सल्ला घ्या. कामात घाई नको.

## शब्दकोडे क्रमांक ३२५१



**आडवे शब्द :-**
१) कनिष्ठ व गौण गोष्टीला महत्व येणे (वा.प्र.)
७) ओझी वाहणारा
११) हात
१२) पराग
१३) विड्याची पाने कापण्याचे एक वाकडे हत्यार
१५) पुन्हा
१६) लोणच्यातील द्रवमसाला
१८) एक उभयचर प्राणी
२०) झाडाभोवतीचा कट्टा
२१) करंजी
२३) संगीतातील एक राग
२५) सर्प
२६) पिकलेली कैरी (अ.व.)
२७) लोणचे, चटणी पानात वाढून घेण्याचे छोटे साधन
२९) नोकर
३२) हिंदुस्थान
३४) नड, आवश्यकता
३६) तांबड्या पंखाचा पोपट
३९) एक शेंगभाजी
४१) वर-वधुची वाजत गाजत काढलेली मिरवणूक
४३) माघारी येणे
४४) एकत्रित रडणे
४७) चिखल
४८) गाल, तोंडाच्या दोन बाजू
५०) भूपती
५१) शिक्षक
५३) विश्रांती
५५) दुर्दशा, कष्ट, त्रास
५६) टपाल, संदेशाचा कागद
५७) अंग मोडून येणे
५८) स्तुतीस्तोत्र
५९) न वापरलेला
६०) लक्ष्मीचे एक नाव
६१) नक्षीदार ताटली
६२) समुद्रकिनारा
६७) वीर, पराक्रमी
६६) कदर करणारा
६८) कणीदार
६९) आवडणारा, प्रिय
७०) जननी
७१) नवरदेव, उर्ध्व दिशा

**उभे शब्द :-**
१) श्वसनेंद्रिय
२) कारखान्याचा मालक
३) मीठ
४) नेमका
५) पशू
६) भीती
७) तांदूळ शिजवून केलेला पदार्थ
८)उपयोग
९) शंकर
१०) काटकसर
१४)कपाटातील खण
१७) कीर्ती, आवाज
१९) बातमी
२०) पातक
२२) अवैध कामासाठी घेतलेला पैसा
३४) वाणी,बोलणे
३५) सातू,एक बारीक धान्य
३७) चाफा
३८) मान खाली घातलेला
४०) मोठी वाटी
४२) संताप, क्रोध
४५) डावखुरा
४६) यशस्वी
४७) पाच ठिपक्यांचे पत्त्याचे पाने
४९) छोटासा
५०) रजनी
५१) नमुना
५२) जिव्हा
५३) जकात
५४) डोके दुखणे
५६) तसराळे
५७) उणीव, न्यूनता
५९) औषधी गराचे कांटेरी पान
६३) रोखलेली नजर
६४) माणूस
६७) एक श्वासरोग.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# जिल्हा विदर्भात प्रथम, तर राज्यात तिसरा

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेत मोठी भरारी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )** – मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत अमरावती जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत विदर्भात प्रथम तर राज्यात तिसरा क्रमांक मिळवला आहे. कर्ज मंजुरीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर 'ॲक्शन मोड'मध्ये असून, खाजगी बँकांच्या अनास्थेबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

मंगळवारी (दि. 10) नियोजन भवन येथे झालेल्या जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत आर्थिक वर्ष 2025-26 साठी जिल्ह्याला 1,600 कर्ज प्रकरणांचे लक्ष्य देण्यात आले. आतापर्यंत प्रशासनाने 3,704 प्रस्ताव बँकांकडे पाठवले असून त्यापैकी 802 प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे. जिल्ह्याला अंतिम उद्दिष्ट पूर्ण करून राज्यात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी 25 फेब्रुवारी 2026 पर्यंत 100 टक्के उद्दिष्ट साधण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारी योजनांच्या कर्ज मंजुरीबाबत खाजगी बँकांकडून दाखवण्यात येणाऱ्या अनास्थेबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. आयसीआयसीआय,

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम – जिल्हा स्थिती**

| | |
|---|---|
| आर्थिक वर्ष | : 2025-26 |
| लक्ष्य कर्ज प्रकरणे | : 1,600 |
| बँकांकडे पाठवलेले प्रस्ताव | : 3,704 |
| मंजूर प्रकरणे | : 802 |
| स्थान | : विदर्भात प्रथम, राज्यात तिसरा |
| अंतिम उद्दिष्टपूर्ती मुदत | : 25 फेब्रुवारी 2026 |

ॲक्सिस, एचडीएफसी आणि येस बँकांच्या अधिकाऱ्यांवर टीका करत त्यांनी भर सभेतून निघून जाण्याचे आदेश दिले. दरम्यान, नवउद्योजक युवक-युवतींच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस अमरावती येथे 'स्वरोजगार महासंमेलन' आयोजित करण्यात येणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनात स्वयंरोजगारातून तयार झालेल्या उत्पादनांसाठी विशेष स्टॉल्स उभारले जातील आणि नाविन्यपूर्ण उद्योगांना विशेष प्राधान्य दिले जाईल. प्रशासनाने बेरोजगार युवक-युवतींनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# 300 कोटींच्या अतिरिक्त निधीच्या मागणीला मुख्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद

## राज्य नियोजन समितीची बैठक



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )** – राज्य नियोजन समितीची बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडली. महसूल भवन येथून जिल्हाधिकारी आशिष येरेकर या बैठकीस उपस्थित होते. बैठकीदरम्यान जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी 300 कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला.

यावेळी आमदार सुलभा खोडके, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र, उपवनसंरक्षक अजुर्ना के. आर., जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे तसेच संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी येरेकर यांनी जिल्ह्यातील विविध विभागांची कामे, सद्यस्थिती आणि भविष्यकालीन नियोजन याबाबत सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. अमरावती जिल्ह्यात 14 तालुके असून, इतर जिल्ह्यांच्या तुलनेत विकासकामांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सन 2025-26 च्या जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यानुसार 527 कोटी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. तर सन 2026-27 साठी 434.71 कोटी रुपयांचे स्पिलओव्हर निधीचे नियोजन करण्यात आले आहे. तथापि, लोकसंख्या, तालुक्यांची संख्या आणि भौगोलिक क्षेत्रफळ लक्षात घेता अतिरिक्त 300 कोटी रुपयांची गरज असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी आग्रहीपणे मांडले.

### गुणवत्तापूर्ण व प्रभावी कामांना निधी

मुख्यमंत्री फडणवीस यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याचा विश्वास व्यक्त केला. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून गुणवत्तापूर्ण व प्रभावी विकासकामांना आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांच्या मागणीनुसार निधीत वाढ होणार असल्याने ग्रामीण व शहरी भागातील प्रलंबित विकासकामांना गती मिळणार आहे. दरम्यान, आमदार सुलभा खोडके यांनी सन 2026-27 साठी मनपा अंतर्गत विविध विकासकामांसाठी 100 कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची विशेष मागणी केली. तसेच मनपाच्या 63 शाळांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यात नवीन लेखाशीर्ष समाविष्ट करण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली.

# चल अकेला चल अकेला.... गाण्याने दिली आत्मपरीक्षणाची हाक

## स्वामी विवेकानंद महाविद्यालयात रोजगार मेळावा संपन्न




**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.11 )** – कधी कधी एखादं गाणं फक्त ऐकण्यासाठी नसतं, तर ते मनाला आरसा दाखवण्यासाठी असतं. चल अकेला चल अकेला या गीताने योगेश बरडियांच्या सूरांनी संपूर्ण सभागृह काही क्षणासाठी अंतर्मुख झालं. हा फक्त सांस्कृतिक कार्यक्रम नव्हता, तर आजच्या तरुणाईला स्वत:शी संवाद साधायला लावणारा चिंतनशील क्षण होता.

आजचा युवक म्हणतो नोकरी मिळत नाही, आणि उद्योगजगत म्हणतं योग्य उमेदवार मिळत नाही. ही दरी का वाढतेय, यावर प्राची ठाकरे यांनी अत्यंत परखड पण भावनिक शब्दांत मार्गदर्शन केलं. ओव्हरकॉन्फिडन्स, आपण सर्व जाणतो, आपल्याला शिकवायचं नाही या भावनेमुळे तरुणांच्या पायात अडथळा निर्माण होतो, असे त्यांनी स्पष्ट केले. आत्मविश्वास आणि अहंकार यातील सीमारेषा ओळखणे ही आजची खरी गरज असल्याचं त्यांचं मत होतं.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्राची विक्रम ठाकरे, (संचालक स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स अँड आर्ट्स) या उपस्थित होत्या. प्रांजली बारस्कर, सहआयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती यांनी युवकांना कौशल्य, संधी आणि वास्तव यांचा मेळ कसा घालावा, याबाबत मार्गदर्शन केलं. प्रमुख अतिथी डॉ. विवेक देशमुख, योगेश बरडिया, प्रा. किशोर तडस आणि डॉ. प्रशांत पानसे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची उंची वाढवली.

विविध कंपन्यांचे एच.आर. आणि प्रतिनिधी उपस्थित असल्याने कार्यक्रम प्रत्यक्ष रोजगाराच्या शक्यतांकडे नेणारा ठरला. प्रियंका इंगोले यांनी कार्यक्रमाचे प्रभावी संचालन केले, तर अमरदीप खाडे प्रास्ताविक मांडले आणि आशिष शहाणे कृतज्ञतेच्या शब्दांत सांगता केली. हा कार्यक्रम टाळ्यांचा गजर नव्हता, तर मनात घुमणारा प्रश्न आपण खरंच तयार आहोत का? आणि चल अकेला चल अकेला हे गाणं त्या प्रश्नाचे उत्तर शोधायला सांगणारी शांत, ठाम हाक ठरली.

## मंदिरात चोरी

**अमरावती** – चांदूर रेल्वे ठाण्याच्या हद्दीतील भिलटेक येथील मंदिरातील दानपेटीतून पन्नास हजारांची रोख लंपास करण्यात आली. भइलटेक येथील एका मंदिराच्या गाभार्याच्या आतील दाराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने दानपेटीतील रोख लांबविली.

# मोर्शीमध्ये शुक्रवारी 'मेगा कृषी क्रेडिट आऊटरीच' कार्यक्रम

## शेतकऱ्यांना कर्ज मंजुरी पत्रांचे वितरण

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि. 11 )** – सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने मोर्शी येथे येत्या शुक्रवारी, 13 फेब्रुवारी 2026 रोजी 'मेगा कृषी क्रेडिट आऊटरीच' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा शेतकरी मेळावा सकाळी 11 वाजता शिरभाते मंगलम, अमरावती रोड, मोर्शी येथे पार पडणार आहे. कार्यक्रमात बँकेच्या विविध नवीन शेती योजना सादर केल्या जातील आणि पात्र शेतकऱ्यांना प्रिन्सिपल सॅन्शन चेकचे वितरण केले जाईल. मुख्य अतिथी म्हणून मोर्शीचे उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार, गट विकास अधिकारी प्रिती खाटिंग, तसेच सेंट्रल बँकेच्या मुंबई कार्यालयाचे उपमहाव्यवस्थापक जयशंकर प्रसाद उपस्थित राहणार आहेत. बँक अधिकाऱ्यांमार्फत शेतकऱ्यांना कर्ज, शासनाच्या योजना, सबसिडी आणि व्याजदरातील सवलतींबाबत मार्गदर्शन केले जाईल. जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# अवैध रेती वाहतुकीवर महसूल विभागाची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.11 )**– तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन आणि रेती वाहतुकीविरुद्ध महसूल विभागाने धडक कारवाई करत मौजा निंभोरा येथे अवैधरित्या रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त केला. ही कारवाई मंगळवारी (दि. 10) रात्री उशिरा करण्यात आली.

### निंभोरा येथे ट्रॅक्टर जप्त

अचलपूरचे उपविभागीय अधिकारी आणि चांदूर बाजार चे तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचत रेतीची अवैध वाहतूक करत असलेला ट्रॅक्टर रंगेहात पकडण्यात आला. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेला ट्रॅक्टर (क्र. एमएच 29 बीसी 3763) हा दुर्योधन तायडे (रा. थुगांव पिपरी) यांचा आहे. ट्रॅक्टरसह अवैध रेती मुद्देमाल म्हणून जप्त करण्यात आली असून संबंधितांवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता तसेच गौण खनिज नियमांनुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या कारवाईत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) विलास ढोले, जगदीश पानसे, प्रतिक चव्हाण आणि पद्माकर झळके यांनी सहभाग घेतला. तालुक्यात अवैध उत्खनन व वाहतुकीविरुद्ध कारवाईची मोहीम सातत्याने सुरू असून पुढील काळातही अशा धडक कारवाया सुरू राहतील, असा इशारा महसूल विभागाने दिला आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैध रेती व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# नांदगावच्या नगराध्यक्षांनी शपथविधीच्या दिवशीच जनता दरबार घेत स्वीकारला पदभार




**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर,( दि.11 )** – नगर पंचायतच्या थेट जनतेतून प्रथम महिला नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या सौ. प्राप्ती मारोटकर यांनी शपथविधीच्या दिवशीच जनता दरबार आयोजित करून पदभार स्वीकारला. यावेळी 487 नागरिकांनी आपली तक्रार लेखी स्वरूपात सादर केली. तसेच 107 लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकाम परवानगी वाटप करण्यात आली. नगराध्यक्षांनी शहरातील नाले, पाणीपुरवठा, पथदिवे, स्वच्छता, घरकुल यासारख्या मूलभूत समस्या ऐकल्या व काही समस्यांचे तात्काळ निराकरण, तर काहींचे नियोजित निराकरण करण्याचे आश्वासन दिले. घरकुल लाभार्थ्यांना बांधकाम शुल्क पाच हजार रुपये माफ करण्यात आले. मारोटकर यांनी नगराध्यक्ष कक्षाचा खर्च स्वत: करणार असल्याचेही जनता दरबारात जाहीर केले. याआधी विरोधी गटातील नगरसेवकांनी कॅबिन खर्चाबाबत आरोप केले होते. जनता दरबारात उपनगराध्यक्ष, सभापती, महिला व बालकल्याण सभापती, नगरसेवक व कर्मचारी उपस्थित होते. शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला आणि खुल्या संवादातून प्रशासन-संवादाची नवीन परंपरा रेखाटली गेली.

# मुक्तागिरी परिसरातील मजारची तोडफोड

## कठोर कारवाईची मागणी



**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर ( दि.11 )**– भैंसदही तालुक्यातील मुक्तागिरी परिसरातील सैय्यद शाह बाबा दर्ग्याच्या मजारची तोडफोड झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच खरपी, परतवाडा आणि अचलपूर येथील युवकांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

युवकांनी या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवित, धार्मिक स्थळांची विटंबना सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. अशा घटना परिसरातील शांतता व सामाजिक सौहार्द बिघडवण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी म्हटले. मोहम्मद आदिल यांच्या नेतृत्वाखाली युवकांनी भैंसदही पोलीस ठाणे, तहसील कार्यालय तसेच संबंधित अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन दोषींवर कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली. मुक्तगिरी परिसरासह तालुक्यातील सर्व धार्मिक स्थळांची सुरक्षा वाढवावी व आरोपींना तातडीने अटक करावी, अशी मागणी करण्यात आली. ग्रामस्थांनीही शांतता, बंधुता आणि सामाजिक ऐक्य कायम राखण्याचे आवाहन करत प्रशासनाने त्वरित हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. निवेदन देताना रामदास बारस्कर, मोहम्मद आदिल, शोएब खान, तौफिक खान, महफूज अली, सोहेल, झिशान, अशपाक, समीर, अमीन, इमरान, नवेद, खलील, आलिम, रेहान, जुबेर, राजा, अयान, अदनान, सलमान, रिजवान, वसीम, सलीम उपस्थित होते.

## आयशर-ट्रेलर धडकेत चालकाचा मृत्यू

**अमरावती** – मंगरुळ चव्हाळा पोलीस स्टेशन हद्दीतील समृद्धी महामार्गावर आयशर ट्रक व ट्रेलर यांच्यात झालेल्या समोरासमोरच्या भीषण धडकेत चालकाचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्घटना रविवारी (दि.8) रोजी रात्री घडली. मृत चालकाचे नाव सुजित बाळू साताळकर (वय 30, रा. येवला, नाशिक) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्ग मुंबई कॉरिडॉरवरील चॅनेल 158 ते 800 दरम्यान एमएच 15/जेसी 2466 क्रमांकाचा आयशर ट्रक भरधाव व बेपर्वाईने चालविला जात होता. यावेळी ट्रकने एमएच 40/बीएल 2014 क्रमांकाच्या ट्रेलरला समोरासमोर जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की चालक सुजित साताळकर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

# साहेबराव लेंधे स्मृतिप्रीत्यर्थ भव्य महाआरोग्य शिबिर



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.11 )** – स्व. साहेबरावजी लेंधे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शालिनीताई मेघे हॉस्पिटल, नागपूर यांच्या सहकार्याने आश्रय निवास येथे भव्य मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सुमारे दोन हजार नागरिकांनी तपासणी व उपचारांचा लाभ घेतला.

शिबिराचे उद्घाटन स्वामी जितेंद्रनाथ महाराज यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार गजानन लवटे, नगराध्यक्ष अविनाश गायगोले, तहसीलदार पुष्पा सोळंके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिबिरात 1200 रुग्णांना मोफत चष्मे देण्यात आले. तसेच 60 रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. लाभार्थ्यांसाठी भोजन व्यवस्थाही करण्यात आली होती. उपक्रमाचे नियोजन वैभव लेंधे व मधुरा लेंधे यांनी केले. लेंधे परिवार व मित्रपरिवाराच्या सहकार्याने शिबिर यशस्वी ठरले. नागरिकांकडून आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पुसला पुनर्वसन भागातील विनापरवाना कॉंक्रीट मिक्सर प्लांटवरून नागरिकांमध्ये संताप

## प्रदूषणामुळे आरोग्यास धोका | तातडीने सील करण्याची मागणी







**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.11 )** – पुसला ग्रामपंचायत हद्दीत सुरू असलेला कॉंक्रीट मिक्सर प्लांट कोणतीही अधिकृत परवानगी न घेता गेल्या अनेक महिन्यांपासून कार्यरत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. संबंधित प्लांटमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात येत असून, स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पुसला पुनर्वसन भागात वसलेल्या या प्लांटमधून मोठ्या प्रमाणात धूळ, धूर आणि आवाजाचे प्रदूषण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सततच्या प्रदूषणामुळे श्वसनविकार, दमा, खोकला यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषत: लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर याचा गंभीर परिणाम होत असल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे. सकाळपासून उशिरापर्यंत सुरू असलेल्या यंत्रणेमुळे परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रारही करण्यात आली आहे. या प्रकरणी संघर्ष सेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष टिंगणे यांनी सरपंच व सचिव, ग्रामपंचायत पुसला यांना तक्रार निवेदन सादर केले आहे. निवेदनात संबंधित कॉंक्रीट मिक्सर प्लांट विनापरवाना सुरू असल्याने तातडीने कारवाई करून तो सील करण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड मान्य नाही. नियमबाह्यपणे सुरू असलेला प्लांट तात्काळ बंद न केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा टिंगणे यांनी दिला आहे. दरम्यान, ग्रामपंचायत प्रशासन या तक्रारीची कोणती दखल घेते आणि संबंधित प्लांटवर कारवाई कधी होते, याकडे पुसला परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना कबूल केलेला पीक विमा तातडीने द्यावा!

## लोकविकास संघटनेचे मुख्यमंत्री यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि.11 )**– महाराष्ट्र शासनाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या विशेष पॅकेजमध्ये विमाधारक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर 17 हजार रुपये पीक विमा देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, घोषणा होऊनही आजपर्यंत अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा झालेली नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. राज्यात सुमारे 45 लाख विमाधारक शेतकरी असून त्यांच्यात नाराजीचे वातावरण आहे.

या पार्श्वभूमीवर लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव यांनी मुख्यमंत्री यांना तहसीलदार, चांदूरबाजार यांच्या मार्फत सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनात अतिवृष्टीमुळे उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. शासनाच्या पॅकेजमुळे दिलासा मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली होती. विशेषत: प्रति हेक्टर 17 हजार रुपयांच्या पीक विम्याची घोषणा ही अत्यंत महत्त्वाची ठरली होती. मात्र, प्रत्यक्ष मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक ताण वाढला आहे. बी-बियाणे, खते आणि दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाले असून कर्जाचा बोजा वाढत आहे. शासनाने दिलेल्या आश्वासनांची तात्काळ अंमलबजावणी करणे ही नैतिक व प्रशासकीय जबाबदारी असल्याचे निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे. पीक विम्याची रक्कम तातडीने वितरित करावी, अन्यथा राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. निवेदनावेळी गोरव वैद्य, अंकुश धाकडे, संविधान मोहोड, श्रेयस बर्वे, ऋषिकेश रडके, महादेव भालेराव, अजय सोनोने, शाम पारीसे, उमेश तायडे, जावेद पठाण, कमलेश धाडसे, आकाश खेलदार यांच्यासह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

RNINO-46975/1985 Mahasagar Amravati
Printed published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no 9518934504 Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन. आय. नोंदणी क्र. ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# अस्मिता

## दुधीचे पौष्टिक लाडू



रसगंधा

दुधीची भाजी म्हटल्यावर बरेचजण नाक मुरडतात. अनेक लहान मुलं ही भाजी खातही नाहीत. मग दुधीतले पौष्टिक घटक शरीरात जाणार तरी कसे? अशावेळी तुम्ही दुधीचे लाडू बनवू शकता. चला तर, मग ही सोपी रेसिपी जाणून घेऊ.

**साहित्य :** एक किलो दुधी, अर्धा कप तूप, २५० ग्रॅम खवा, २५० ग्रॅम साखर, चमचाभर वेलची, तीन ते चार चमचे कुटलेले काजू, बदाम, पिस्ते, एक कप डेसिगेटेड कोकोनट

**कृती:** दुधी नीट स्वच्छ करून सालं काढून छोटे तुकडे करून घ्या. बिया आणि थोडा गर काढून टाका. उरलेला दुधी किसून घ्या. एका कढईत तूप गरम करून दुधीचा किस घाला. दुधीतलं पाणी पूर्णपणे आटल्यानंतर त्यात साखर घालून परतून घ्या. मग यात खवा आणि सुका मेवा घालून मिश्रण एकजीव करून घ्या. साधारण दोन मिनिटांनी गॅस बंद करा. मिश्रण थोडं थंड झाल्यावर त्यात वेलची पूड घाला. आता या मिश्रणाचे लाडू वळायचे आहेत. हाताला थोडं तेल लावून लाडू वळायला घ्या. सर्व लाडू वळून झाल्यानंतर एका ताटलीत डेसिगेटेड कोकोनट काढून घ्या. त्यावर लाडू ठेवून नीट घोळवून घ्या. दुधीचे हे लाडू सगळ्यांना नक्कीच आवडतील.

## मिसाईल वुमन: डॉ. टेसी थॉमस

मानिनी


**डॉ. टेसी थॉमस या भारतातील एक अत्यंत कर्तबगार, बुद्धिमान आणि प्रेरणादायी महिला शास्त्रज्ञ आहेत. क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. देशाच्या संरक्षण क्षमतेला आधुनिक स्वरूप देण्यात त्यांचा मोठा वाटा असून त्या भारताची क्षेपणास्त्र महिला म्हणून ओळखल्या जातात. त्यांचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे अग्नी मालिकेतील क्षेपणास्त्रांच्या विकासात दिलेले नेतृत्व.**



डॉ. टेसी थॉमस या भारतातील एक अत्यंत कर्तबगार, बुद्धिमान आणि प्रेरणादायी महिला शास्त्रज्ञ आहेत. क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. देशाच्या संरक्षण क्षमतेला आधुनिक स्वरूप देण्यात त्यांचा मोठा वाटा असून त्या भारताची क्षेपणास्त्र महिला म्हणून ओळखल्या जातात. डॉ. टेसी थॉमस यांचा जन्मएप्रिल १९६३ मध्ये केरळ राज्यात झाला. लहानपणापासूनच गणित आणि विज्ञान विषयांमध्ये त्यांची विशेष गती होती. त्यांनी अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढे क्षेपणास्त्र तंत्रज्ञान या विषयात उच्च संशोधन केले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्या भारत सरकारच्या संरक्षण संशोधन क्षेत्राशी जोडल्या गेल्या. त्या काळात हे क्षेत्र पूर्णपणे पुरुषप्रधान होते. परंतु टेसी थॉमस यांनी आपल्या ज्ञानाच्या आणि कामाच्या जोरावर स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे अग्नी मालिकेतील क्षेपणास्त्रांच्या विकासात दिलेले नेतृत्व. या क्षेपणास्त्रांमुळे भारताची संरक्षण क्षमता अधिक मजबूत झाली. अत्यंत अचूकता, लांब पल्ल्याचे लक्ष्यभेदन आणि विश्वासार्हता ही या क्षेपणास्त्रांची वैशिष्ट्ये आहेत. या प्रकल्पाचे नेतृत्व एका महिलेने यशस्वीपणे करणे, ही बाब संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद ठरली. डॉ. टेसी थॉमस या केवळ शास्त्रज्ञ नाहीत, तर उत्कृष्ट प्रशासक आणि मार्गदर्शकदेखील आहेत. त्यांनी अनेक तरुण शास्त्रज्ञ घडवले आणि महिलांना विज्ञान क्षेत्रात पुढे येण्यासाठी प्रेरित केले. स्त्री असल्यामुळे मर्यादा येतात हा गैरसमज त्यांनी आपल्या कामातून खोडून काढला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक राष्ट्रीय सन्मान आणि पुरस्कार मिळाले आहेत. देशाच्या संरक्षणासाठी दिलेल्या सेवेमुळे त्यांचा उल्लेख भारतातील श्रेष्ठ शास्त्रज्ञांमध्ये केला जातो. मात्र, प्रसिद्धीपेक्षा कामाला प्राधान्य देणारी व्यक्ती अशीच त्यांची ओळख राहिली आहे. आजही डॉ. टेसी थॉमस या विज्ञान, संशोधन आणि संरक्षण क्षेत्राशी संबंधित कार्यात सक्रिय आहेत. त्यांचा जीवनप्रवास हे सांगतो की मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास असेल, तर कोणतीही स्त्री विज्ञानाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचू शकते. डॉ. टेसी थॉमस या केवळ क्षेपणास्त्रांची निर्मिती नाहीत, तर भारताच्या सुरक्षित भविष्यासाठी काम करणाऱ्या एक शांत पण मजबूत स्त्रीशक्ती आहेत.

## डॉ. गुगलपासून सावधान

प्रॅक्टीकल व्हा



आजकाल थोडे अंग दुखतेय, ताप आलाय, पोट बिघडलेय किंवा थोडाफार त्रास होतोय असे वाटू लागले की अनेक जणी डॉक्टरकडे जाण्याआधी मोबाईल उघडतात आणि गुगलवर लक्षणे टाकतात. काही सेकंदांतच अनेक आजारांची नावे समोर येतात. वेगवेगळी माहिती मिळते. अर्थात सुरुवातीला साधी माहिती मिळाल्यासारखे वाटते. पण थोड्याच वेळात भीती वाढते. हे गंभीर तर नाही ना? असा प्रश्न मनात घर करू लागतो. म्हणूनच आरोग्याची माहिती गुगलवर शोधताना काय विश्वासार्ह आहे आणि काय धोकादायक, हे समजून घेणे फार गरजेचे आहे. सरकारी आरोग्य संस्था, मोठी रुग्णालये, मान्यताप्राप्त डॉक्टरांचे लेख, वैद्यकीय कॉलेज किंवा अधिकृत आरोग्य पोर्टल्सवर दिलेली माहिती साधारणपणे विश्वासार्ह असते. ही माहिती आजाराची ओळख, प्राथमिक काळजी, तपासणी कधी करावी याबाबत मार्गदर्शन देते. पण आपण लक्षणांवरून स्वतःच आजार ठरवायला लागलो तर मात्र प्रश्न निर्माण होतात. समजा, आपण डोकेदुखीविषयी विचारले की थेट ब्रेन ट्यूमर, छातीत दुखतेआहे असे लिहिले की हार्ट अटॅक असे टोकाचे निष्कर्ष समोर दिसतात. गुगल सर्वात वाईट शक्यता आधी दाखवतो. त्यामुळे भीती वाढते आणि लक्षणे अधिक तीव्र वाटू लागतात. व्हॉट्सअ‍ॅप फॉरवर्ड्स, यूट्यूब व्हिडिओ, घरगुती उपायांचे चमत्कारिक दावे याबाबत तर विशेष सावध राहायला हवे. हे केलं की औषधांची गरज नाही, हा उपाय सर्व आजार बरे करतो अशा दाव्यांवर विश्वास ठेवणे धोकादायक ठरू शकते. काही वेळा चुकीचे उपाय शरीराला नुकसानही करू शकतात. एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, गुगल-वरची माहिती ही सर्वसाधारण असते. तुमचे वय, वजन, आधीचे आजार, चालू औषधे या गोष्टी गुगल लक्षात घेत नाही. त्यामुळे दुसऱ्याला योग्य ठरणारा सल्ला तुमच्यासाठी अपायकारक ठरू शकतो. म्हणूनच गुगलचा वापर माहिती मिळवण्यासाठी करा, उपचार ठरवण्यासाठी नाही.

## 'सवलती'पासून सांभाळून...

स्मार्ट शॉपिंग



ई-कॉमर्स वेबसाईट्सच्या फेस्टिवल ऑफर्समध्ये भरपूर सवलती दिल्या जातात. कपड्यांपासून विविध अ‍ॅक्सेसरीजवर ५० ते ८० टक्क्यांपर्यंत सवलत मिळते. सवलतींचे हे आकडे बघून आपले डोळेही विस्फारतात. पाच हजार रुपयांची साडी दीड हजार रुपयांना मिळतेय म्हटल्यावर आपणही खरेदी करून टाकतो. पण प्रत्यक्षात विक्रेत्यांना एवढी सवलत देणं शक्य नसतं. त्यामुळे दर्जाच्या बाबतीत फसवणूक होऊ शकते. चित्रात दिसणारा आणि प्रत्यक्षात आपल्या हातात येणारा माल कसा असेल याची अजिबात खात्री देता येत नाही. शॉपिंग वेबसाईट्स ८० टक्क्यांपर्यंत सवलत देण्याचा दावा करत असल्या तरी प्रत्यक्षात या सवलती मोजक्याच उत्पादनांवर दिल्या जातात. इतर उत्पादनांवर एवढी सवलत मिळत नाही. कपडे तसेच काही अ‍ॅक्सेसरीजवर ८० टक्के सवलत मिळते. असा सवलतीत घेतलेला माल बरेचदा जुनाही असू शकतो. तसंच काही दुकानदार जुना माल ८० टक्के सवलतीत देतात. त्यामुळे कोणतीही वस्तू खरेदी करण्यापूर्वी नीट पडताळणी करून घ्या. कमी दर्जाची वस्तू आली तर ती परत पाठवून द्या. खरेदी करण्याआधी वेगवेगळ्या साईट्स धुंडाळा. वस्तूची खरी किंमत आणि त्यावर दिली जाणारी सूट याबाबत माहिती घ्या. यानंतरच खरेदी करा. सवलतीत मिळणारी प्रत्येक वस्तू चांगली असेलच असं नाही. त्यामुळे उगाचच भरपूर खरेदी करू नका. आधी थोड्या वस्तू मागवून बघा. मगच पुढे जा. सवलतींना भुलून केलेली घाई महागात पडू शकते.

## शेंगा खाताय?

आरोग्यवेध



थंडीत भुईमुगाच्या शेंगा खाण्याचं प्रमाण वाढतं. त्यातही या दिवसात भाजलेल्या शेंगा खाल्ल्या जातात. या शेंगा खूप आरोग्यदायी असतात. शेंगांमुळे थंडीत ऊब्बही मिळते. मात्र अधिक प्रमाणात शेंगा खाल्ल्यास तुम्हाला त्रास होऊ शकतो. अतिप्रमाणात शेंगा खाल्ल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी...

* शेंगांमध्ये फॅट्सचं प्रमाण अधिक असतं. त्यामुळे सतत शेंगा खाल्ल्यामुळे हृदयाशी संबंधित आजार होऊ शकतात. लेक्टिन या घटकामुळे शेंगा लवकर पचत नाहीत. यामुळे आम्लपित्त, अपचनासारखे त्रास होऊ शकतात.
* शेंगा अतिप्रमाणात खाल्ल्यास यकृताला धोका निर्माण होऊ शकतो. यातल्या अफलेक्टोसिन या घटकामुळे शरीराचं नुकसान होऊ शकतं. आर्थ्राटिसच्या रुग्णांनी शेंगा खाऊ नयेत.
* शेंगदाणे खाल्ल्याने अ‍ॅलर्जीही होऊ शकते. त्वचेवर पुरळ उठणं, खाज येणं, चेहरा सुजणं अशा समस्या निर्माण होऊ शकतात.
* शेंगा अधिक प्रमाणात खाल्ल्यास श्वसनाशी संबंधित समस्या निर्माण होऊ शकतात. अस्थमाचं प्रमाण वाढू शकतं. थायरॉइडचा त्रास असणाऱ्यांनी शेंगा खाऊ नयेत.

## डेटा डाएट आवश्यक

टेक्नो टिप्स



आपण जेवताना डाएटविषयी विचार करतो, तसाच मोबाईलचाही विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. मोबाईलमध्ये साठणारा मजकूर, फोटो, व्हिडिओज, मेसेजेस आणि विविध अ‍ॅप्स यांचाही विचार करायला हवा. डेटा डाएट म्हणजे मोबाईलवर अनावश्यक गोष्टी कमी करणे.

आपला मोबाईल हळू चालतो, सतत अडकतो, बॅटरी लवकर संपते, अशी तक्रार अनेक जण करतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे मोबाईलमध्ये गरजेपेक्षा जास्त गोष्टी साठलेल्या असतात. जुने फोटो, पुन्हा कधी न पाहिलेले संदेश, वापरात नसलेले अ‍ॅप्स, निरुपयोगी व्हिडिओज यामुळे मोबाईल थकतो. त्याची बॅटरी तर वापरली जातेच पण स्टोअरेज कपॅसिटी पण संपते.

डेटा डाएट म्हणजे मोबाईल रिकामा करणे नव्हे, तर योग्य गोष्टी निवडून ठेवणे. रोज नको असलेले संदेश हटवणे, आठवड्यातून एकदा फोटो तपासणे, महिन्यातून एकदा वापरात नसलेले अ‍ॅप्स काढून टाकणे, ही सवय लावली तर मोबाईल हलका राहतो. महत्त्वाच्या आठवणी, कुटुंबाचे फोटो, आवश्यक कागदपत्रे मात्र जपून ठेवली पाहिजेत. डाएट म्हणजे उपवास नाही, तर संतुलन आहे. डेटा कमी ठेवल्यामुळे सुरक्षितताही वाढते. अनावश्यक अ‍ॅप्समुळे माहिती बाहेर जाण्याचा धोका असतो. मोबाईल हरवला तरी महत्त्वाची माहिती वेगळी ठेवलेली असेल तर नुकसान कमी होते. मोबाईलचा वेग कायम राहतो. म्हणजेच प्रत्येक वयासाठी याचा फायदा आहे. आरोग्यासाठी आहारावर नियंत्रण ठेवतो, तसेच डिजिटल आरोग्यासाठी डेटा डाएट आवश्यक आहे. डेटा डाएट ही काळाची गरज आहे आणि ती स्वीकारली तर डिजिटल जीवन अधिक सुटसुटीत, सुरक्षित आणि आनंदी होऊ शकते. आपण आपले घर अधून मधून आवरून ठेवतो, तसाच मोबाईल आवरायची पण सवय लावून घेतली पाहिजे. आपल्या आणि मोबाईलच्या आरोग्यासाठी ही सवय चांगलीच.

## ट्राय दिज हटके लूक्स

फॅशन पॅशन



काळा आणि पांढरा हे एव्हरग्रीन रंग आहेत. मात्र काळे आणि पांढरे कपडे घालण्याचा किंवा कुर्त्यावर ब्लॅक, व्हाईट लेगिंग घालण्याचा कंटाळा आला असेल तर तुम्ही बरीच वेगळी कॉम्बिनेशन्स करू शकता. सणासुदीच्या निमित्ताने काय करता येईल याविषयी...

* पार्टीला जाताना सीक्वेंस लूक कॅरी करता येईल. सीक्वेन्स हा प्रकारच अनोखा आणि स्टायलिश आहे. सीक्वेन्स वर्कवर फार काही करावं लागत नाही. डार्क किंवा लाईट रंगांचे सीक्वेन्स स्टाईल कपडे घालता येतील.
* मोनोक्रोमेटिक लूक हा सुद्धा चांगला पर्याय आहे. अगदी कॅज्युअल ऑकेजनपासून पार्टीपर्यंत कुठेही हा लूक कॅरी करता येईल. ऑफिसमध्ये हा लूक कॅरी करायचा असेल तर प्लेन कपड्यांची निवड करता येईल. फिरायला जाणार असाल तर प्रिंटेड कपड्यांची निवड करा.
* तुम्ही एकाच रंगाचा प्लेन ड्रेस घालू शकता. प्लेन ड्रेस साधा वाटत असला तरी यामुळे हटके लूक मिळतो. प्लेन लाँग ड्रेस किंवा शॉर्ट आउटफिट कॅरी करता येईल. इथे तुम्हाला रंगांमध्येही बरेच पर्याय आहेत.
* तुम्ही मिक्स अँड मॅच किंवा कॉंट्रास्ट रंगांची निवड करू शकता. नेव्ही ब्लू आणि पिवळा, लाल आणि आकाशी असे रंगही छान दिसतात. डार्क नेव्ही ब्लू आणि पेस्टर ऑरेंज असं कॉम्बिनेशनही करता येईल. इथेही तुम्हाला बरेच पर्याय मिळतील.

## कधी करायचं बॉडी पॉलिशिंग?

ब्युटीमंत्रा



कडक उन्हात बाहेर पडल्यामुळे त्वचा काळवंडते. त्वचेवर काळपट डाग पडतात. इतकंच नाही, तर त्वचेचा रंगही असमान होतो. हात आणि मानेचा रंगात फरक दिसून येतो. विशेष प्रसंगासाठी तयार होताना काळपट हात चांगले दिसत नाहीत. आता हातांचं, मानेचं टॅनिंग कसं दूर करायचं असा प्रश्न पडला असेल तर तुम्ही बॉडी पॉलिशिंगचा पर्याय निवडू शकता. यामुळे त्वचेची रया परत मिळवता येऊ शकते तसंच त्वचा चमकदार दिसू लागते. बॉडी पॉलिशिंगमुळे मृत त्वचा आणि काळपटपणा दूर झाल्याने त्वचा उजळ दिसू लागते. बॉडी पॉलिशिंगदरम्यान शरीराला मसाज मिळतो. यामुळे ताणही हलका होतो. पॉलिशिंग केल्यानंतरही आपल्याला काळजी घ्यावी लागते. पॉलिशिंगनंतर काही दिवस तरी रसायनयुक्त लोशन, क्रीम्स वापरू नयेत. साधारण दोन ते तीन दिवस उन्हातही बाहेर पडू नये. उन्हात जाणं गरजेचं असेल तर पूर्ण बाह्यांचे कपडे घाला. चेहरा नीट झाकून घ्या. सनस्क्रीन लावायला विसरू नका. जखमा किंवा भाजल्याच्या खुणा असणाऱ्या भागात पॉलिशिंग करू नका. नियमित पोहायला जाणाऱ्यांनी बॉडी पॉलिशिंग करून घ्यायला हवं. पाण्यातल्या क्लोरिनमुळे त्वचा काळपट होते. पॉलिशिंगमुळे त्वचेला चमक मिळते. पाठीवर पुरळ उठल्यानंतर पडणारे डाग वाईट दिसतात. हे डाग पुसट करण्यासाठी स्क्रीन लाईटनिंग बॉडी मसाज करू शकता. लग्नप्रसंगी छान दिसण्यासाठी बॉडी पॉलिशिंग करून घेता येईल.

हेअर केअर

## थंडीसाठी हेअर मास्क



थंडीमध्ये त्वचेसोबत केसांचीही विशेष काळजी घ्यावी लागते. थंडीत केसांमध्ये कोंडा होतो, खाज सुटते. केस कोरडे होऊ लागतात. या दिवसात काही हेअर मास्क तुमच्या मदतीला येऊ शकतात. तुम्ही मिल्क प्रोटिनबद्दल ऐकलं आहे का? थंडीत दुधापासून पोषण मिळवता येईल. कपभर कच्च्या दुधात दीड चमचा मध घाला. हे मिश्रण केसांवर लावून अर्धा तास ठेवा. यानंतर केस शँपूने धुवा. आठवड्यातून दोन वेळा असं केल्यामुळे केस मुलायम होतील. अर्धा कप दह्यात एक पिकलेलं केळं घालून मास्क तयार करा. केस खूप राठ असतील तर या मास्कमध्ये दोन चमचे ऑलिव्ह ऑईल मिसळा. टाळूवर हा मास्क साधारण ४५ मिनिटं लावा. त्यानंतर शँपूने धुवून टाका.

स्मार्ट टिप्स

## नखांच्या सौंदर्यवर्धनासाठी...



लांबलचक्या नखांमुळे हात खूप छान दिसतात. नखांचं सौंदर्य वाढवण्यासाठी तुम्ही काही उपाय करू शकता. साधासा लसूण तुमच्या नखांचं सौंदर्य खुलवेल. लसणाचे तुकडे करून घ्या. त्यातला रस काढा. हा रस कापूस किंवा बोटांनी नखांना लावा. लसणाच्या रसामुळे नखं टणक होतात. त्यांची वाढही वेगाने होते. दररोज साधारण दोन ते तीन मिनिटं नखांवर लसूण चोळा. काही दिवसांनी नखांमध्ये फरक जाणवू लागेल.

किचन टिप्स

## टिकवून ठेवा चटणी



बऱ्याच पदार्थांसोबत हिरवी चटणी लागते. मग सारखी चटणी बनवत बसायला कंटाळा येतो. हिरवी चटणी साधारण आठवडाभर टिकते. मात्र काही टिप्स फॉलो करून तुम्हाला चटणी सहा महिने टिकवता येईल. चटणी तयार केल्यानंतर बर्फाच्या ट्रेमध्ये भरा. चटणीचा बर्फ होईल. खाण्याआधी काही काळ चटणी बाहेर काढून ठेवा. चटणीचा रंग बदलला तरी चव कायम राहील. चटणी अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी त्यात थोडं तेल घालता येईल. वाटीभर चटणीत छोटा चमचा ऑलिव्ह ऑईल घालता येईल. ही चटणी काचेच्या बाटलीत भरून फ्रीजमध्ये ठेवा आणि हवी तेव्हा खा.

## फडणवीस, बावनकुळेंच्या अनुमतीनेच
# चंद्रपूर मनपाचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



उबाठा आणि भाजप युतीबाबत मी स्वतः कोठेकर यांच्याशी दिवसातून चारदा चर्चा करायचो, बावनकुळे यांच्याशी चर्चा करायचो आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अनुमती घेतली. जेव्हा उबाठाला एक वर्ष देण्याची चर्चा सुरू असताना मुख्यमंत्र्यांना या संदर्भातील माहिती दिली तेव्हा मुख्यमंत्री म्हणाले एक वर्ष नाही गरज असेल तर सव्वावर्ष द्या. महापौर हा भाजपचा झाला पाहिजे, पहिले महापौर आमच्याकडे असावा, असे भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, चंद्रपूर भाजपमध्ये दोन गट आहे हे सर्वांना माहिती आहे त्यामुळे काही कार्यकर्ते चाणाक्य, किंगमेंकर अशी बॅनरबाजी करतात. कार्यकर्त्यांना गटनेता आपल्या गटाचा झाला नाही याचे वाईट वाटले होते पण महापौर आपला झाल्याने त्यांना आनंद झाला. कुणी क्रेडिट घेऊन काय फायदा करार कुणासोबत झाला आहे? असा टोला आमदार जोरगेवार यांना लगावला आहे.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अनुमतीने संगीताताई खांडेकर यांचे नाव रवींद्र चव्हाण यांनी लेखी दिल्यावर आमच्या पक्षाच्या दुसऱ्या एका नेत्याने सारिकाताई संदूरकर यांना भरीस घातले आणि कारण दिले की पक्षाच्या उमेदवाराचा अर्ज बाद झाला तर काय? मग तोच नियम त्यांच्या गटाचे उपमहापौर होते त्यांचे नाव आले तिथे तसे झाले नाही, असे म्हणत आमदार किशोर जोरगेवार यांच्यावर नाव न घेता टीका केली आहे.

# आता जमिनीसाठी एनए परवानगीची गरज नाही

## जमीन महसूल कायद्यात सरकारचा बदल : लाखो शेतकऱ्यांना दिलासा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर , दि. ११ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्याच्या जमीन महसूल कायद्यात मोठा बदल केला आहे. त्यानुसार, आता शेतकऱ्यांना बिगर कृषी (एनए) वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेण्याची कोणतीही गरज नाही.आता बांधकाम आराखडा मंजुरीलाच एनए मानले जाणार आहे. सरकाच्या या निर्णयाचा हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार जमीन महसूल कायद्यात बदल केला आहे. या बदलानुसार, आता अकृषक कर आकारला जाण्याची सुविधा पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. जमीन मालकांना फक्त एकरकमी 'रुपांतरण अधिमूल्य' भरावे लागेल.



या रकमेच्या भरपाईनंतर जमीन अकृषक वापरासाठी रुपांतरित करता येणार आहे. याशिवाय शेतकऱ्यांना सनद घेण्याची गरजही संपुष्टात आली आहे. बांधकाम आराखडा मंजुरीलाच एनए परवानगी मानली जाईल. यामुळे जमीन रुपांतर प्रक्रिया अधिक जलद, सोपी व पारदर्शक होईल.

उल्लेखनीय बाब म्हणजे आतापर्यंत अकृषक वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक होते. यासाठी विविध दस्तऐवज गोळा करताना शेतकऱ्यांच्या नाकीनऊ येत होते. पण महसूल विभागाने तयार केलेल्या नवीन कार्यपद्धतीनुसार शेतकऱ्यांचे काम अधिक सुलभ व सोपे होणार आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे जमीन रुपांतर प्रक्रियेत सुलभता येईल. याशिवाय अकृषक कराचाही त्रास संपेल. महसूल विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता येईल. जमीन मालकांच्या वेळेची बचत होऊन त्यांचा प्रशासनाकडे हेलपाटे मारण्याचा त्रास कमी होईल. विशेषतः यापुडे त्यांना जमिनीचा एनए मिळवण्यासाठी अनेक महिने किंवा वर्षांची प्रतिक्षा करावी लागणार नाही. केवळ रुपांतरण अधिमूल्य भरून ते आपली जमीन अकृषक वापरासाटी रुपांतरित करता येणार आहे.

दुसरीकडे, राज्य विधिमंडळाच्या मुंबईत होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सोमवार, २३ फेब्रुवारी ते बुधवार, २५ मार्च पर्यंत निश्चित करण्यात आले आहे. तसेच ६ मार्च रोजी अर्थसंकल्प मांडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहांमध्ये दिवंगत अजित पवारा यांच्या अपघाती निधनाविषयी शोक प्रस्ताव मांडण्यात येणार आहे.

अधिवेशन काळात शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी शासकीय सुट्टीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज होणार आहे आणि सोमवार, २ मार्च रोजी होळी आणि ३ मार्च रोजी धूलिवंदन असल्याने कामकाज होणार नाही. १९ मार्चला गुढीपाडव्याची सार्वजनिक सुट्टी असल्याने या दिवशी कामकाज होणार नाही. २० मार्च रोजी देखील विधिमंडळ कामकाज होणार नाही.

## ३७ प्रवासी जखमी

■ वाशिम, दि. ११ :
मार्गावरून जाणाऱ्या एसटी बसच्या मधात अचानक दुचाकी आली. त्या दुचाकी स्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात एसटी बस उलटून भीषण अपघात घाल्याची घटना वाशीम जिल्ह्यात बुधवारी दुपारी घडली.

३७ प्रवासी जखमी झाले असून, रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## डीजीसीए अहवालानंतरच चौकशी ठरेल : डॉ. भोयर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर , दि. ११ :
अजित पवार यांच्यासारखे नेते अपघातात गेल्यानंतर त्यांच्या जवळच्या व्यक्तीकडून अनेक वेगवेगळे विधान करण्यात आली. रोहित पवारांनी काल त्रयस्थ एजन्सी मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे. पण त्यांचे नेते शरद पवार यांनी यापूर्वीच सांगितले आहे की अजित पवारांच्या विमानाचा अपघात झाला आहे, यावर कुणी राजकारण करू नये. यावर ज्या ज्या शंका होत्या त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे आदेश आधीच दिले आहेत, असे राज्यमंत्री पंकज भोयर यांनी म्हटले आहे.



पंकज भोयर म्हणाले की, विमान अपघात प्रकरणी जे जे विभाग असतात त्यांच्या माध्यमातून चौकशी सुरू आहे.आपल्या देशातील चौकशी संस्था या सक्षम आहेत, चौकशीतून जे काही घडले ते समोर येईल. आपल्या ज्या संस्था आहेत ज्या चौकशी करत आहेत त्या सक्षम आहेत, यात जर काही चुकीचे घडले असेल तर संबंधितावर कारवाई करण्यात येईल. विमान कंपनीबाबत डीजीसीएच्या अहवालानंतर चौकशीचा निर्णय होईल, असेही भोयर यांनी म्हटले आहे.

पंकज भोयर म्हणाले की, सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री करण्याचा निर्णय त्यांचा पक्षाचा होता. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा केली आणि पुढील घडामोडी घडल्या असे म्हणत त्यांनी रोहित पवारांनी केलेला दावा खोडून काढला. सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री व्हायचे नव्हते, असे रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत म्हटले होते.

# स्टंट की स्टेटस? पालक कुठे चुकतात?

■ स्वप्निल दुधारे, मुंबई , दि. ११ :
अलीकडील काळात सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी तरुणांकडून धोकादायक बाईक स्टंट्स करण्याच्या घटना वाढत आहेत. स्टंट की स्टेटस, आणि पालक कुठे चुकतात? या विषयावर महासागर डिजिटल चैनल वर चर्चासत्राचा आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन महासागर डिजिटल चे संपादक स्वप्निल दुधारे यांनी केले. या चर्चासत्रात महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित, दैनिक महासागरचे समूह संपादक संदीप काळे, नवी मुंबईच्या पोलीस मित्र विजया कदम, पुण्यातील वरिष्ठ पत्रकार आशिष तिवारी तसेच प्राचार्य प्रशांत बुक्कावार सहभागी झाले होते. या चर्चेतून अनेक महत्त्वपूर्ण मुद्दे पुढे आले.

**कायदा आणि शिस्त यावर प्रवीण दीक्षित यांचे भाष्य**

माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी स्पष्ट केले की, बाईक स्टंट्स हा केवळ वैयक्तिक धोक्याचा विषय नसून तो सार्वजनिक सुरक्षेचाही प्रश्न आहे. रस्त्यावर स्टंट करणे हे कायद्याने गुन्हा असून यामुळे निरपराध नागरिकांचाही जीव धोक्यात येतो. केवळ दंडात्मक कारवाई पुरेशी नसून पालक आणि समाजानेही जबाबदारी घेतली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

**माध्यमांची भूमिका : संदीप काळे**

दैनिक महासागरचे समूह संपादक संदीप काळे यांनी सांगितले की, सोशल मीडियावरील व्हायरल संस्कृतीमुळे तरुणांमध्ये ह्ललाईक्सह्व आणि ह्लफॉलोअर्सह्व मिळवण्याची स्पर्धा वाढली आहे. काहीवेळा माध्यमांमधून अशा घटनांचे अतिरेकी चित्रण होते, ज्यामुळे चुकीचा संदेश जाऊ शकतो. सकारात्मक आदर्श निर्माण करणे ही माध्यमांची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.





**समाज आणि पालकांची जबाबदारी : विजया कदम**

नवी मुंबईच्या पोलीस मित्र विजया कदम यांनी सांगितले की, अनेकदा पालक मुलांना महागड्या बाईक्स देतात, पण त्यांना वाहतूक नियम आणि सुरक्षिततेचे शिक्षण देण्यात कमी पडतात. मुलांशी संवादाचा अभाव ही मोठी समस्या आहे. वेळोवेळी मार्गदर्शन आणि नियंत्रण आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**सोशल मीडियाचा प्रभाव आशिष तिवारी**

वरिष्ठ पत्रकार आशिष तिवारी यांनी नमूद केले की, सोशल मीडियावर स्टेटस टिकवण्यासाठी तरुण धोकादायक कृत्ये करतात. मित्रमंडळींमध्ये वेगळेपण दाखवण्याची मानसिकता आणि प्रसिद्धीची लालसा यामुळे स्टंट्सची प्रवृत्ती वाढते. या मानसिकतेवर काम करण्यासाठी शाळा, पालक आणि समाज यांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**शैक्षणिक दृष्टीकोन : प्राचार्य प्रशांत बुक्कावार**

प्राचार्य प्रशांत बुक्कावार यांनी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वाहतूक सुरक्षिततेबाबत जनजागृती कार्यक्रम राबवण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांना शिस्त, जबाबदारी आणि कायद्याचे भान लहानपणापासून दिले पाहिजे. पालकांनी मुलांच्या ऑनलाईन क्रियाकलापांवरही लक्ष ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

(महाराष्ट्रभरातील सर्व राजकीय विश्लेषण आणि घडामोडी पाहण्यासाठी आजच महासागर न्यूज ला सबस्क्राईब करा तसेच वरील चर्चासत्र लाईव्ह पाहण्यासाठी सोबत असलेल्या स्कॅनर वरती स्कॅन करा )

या चर्चासत्रातून स्पष्ट झाले की, स्टंट की स्टेटस हा केवळ तरुणांचा प्रश्न नसून तो कुटुंब, समाज, माध्यमे आणि प्रशासन या सर्वांचा आहे. केवळ कारवाई नव्हे तर योग्य मार्गदर्शन, संवाद आणि सकारात्मक वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे.धोकादायक स्टंट्सपेक्षा सुरक्षितता आणि जबाबदारी हेच खरे ह्लस्टेटसह्व आहे, असा एकमताचा सूर या चर्चेत उमटला.

या कार्यक्रमात पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल हे सहभागी होणार होते पण वरिष्ठांच्या महत्वपूर्ण बैठकीमुळे त्यांना सहभागी होता आले नाही.

# अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार

## गर्भवती झाल्यानंतर घटना उजेडात : पाचही आरोपी ताब्यात
## चांदूर रेल्वेच्या घटनेवरून सर्वत्र संतापाची लाट

■ महासागर प्रतिनिधी
चांदूर रेल्वे, दि. ११ :
चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर पाच जणांनी सामूहिक अत्याचार केल्याची गंभीर घटना समोर आली असून, या अत्याचारातून मुलगी गर्भवती राहिल्याचे उघडकीस आल्यानंतर सदर प्रकरण उजेडात आले आहे. या प्रकरणी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना ७ जुलै २०२५ ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घडली. पीडित अल्पवयीन मुलगी गावातून शाळेत जात असताना आरोपींशी तिचा संपर्क आला. त्यानंतर आरोपींनी वेगवेगळ्या धमक्या देत तिच्यावर अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, मुलीची प्रकृती अचानक बिघडल्याने तिच्या आईने तिला दवाखान्यात नेले. तपासणीदरम्यान मुलगी गर्भवती असल्याचे समोर आले व यानंतर संपूर्ण प्रकार उघडकीस आला. त्यावरून मुलीच्या आईने चांदूर रेल्वे ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून पोलिसांनी अजिंक्य गजानन शेलोकार (वय १९), संकेत विनोद काळे (वय २३), कार्तिक गजानन शेलोकार (वय २१) तसेच दोन विधीसंघर्षित बालक अशा पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सर्व आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास एसडीपीओ अशोक थोरात करीत आहे.

## डबल सुपर ओव्हरचा थरार; द. आफ्रिका विजयी

अहमदाबाद, दि. ११ वृत्तसंस्था

अफगाणिस्तान व दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामना अगदी थरारक झाला. दोन्ही संघांनी कडवी झुंज दिली आणि दोन सुपर ओव्हर झाल्यानंतर सामन्याचा निकाल लागला. पहिल्या सुपर ओव्हरमध्ये दोन्ही संघांनी १८-१८ धावा केल्याने सामना पुन्हा टाय झाला. त्यानंतर दुसरी ओव्हर खेळवली गेली. दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये मात्र अखेरच्या चेंडूवर ५ धावांची गरज असताना रहमानुल्ला गुरबाज झेलबाद झाला आणि दक्षिण आफ्रिकेने सामना जिंकला.



दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये ट्रिस्टन स्टब्स व डेव्हिड मिलर फलंदाजीला आले आणि अजमतुल्ला गोलंदाजी करत होता. पहिल्या चेंडूवर स्टब्सने षटकार खेचला. तर दुसऱ्या चेंडूवर १ धाव आणि तिसऱ्या चेंडूवर २ धावा घेतल्या. यानंतर सलग दोन चेंडूंवर मिलरने षटकार खेचले. यानंतर अखेरच्या चेंडूवर २ धावा घेतल्या आणि अफगाणिस्तानला विजयासाठी २४ धावांचं आव्हान दिलं. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानकडून मोहम्मद नबी व अजमतुल्ला फलंदाजीला उतरले. केशव महाराजने पहिला चेंडू डॉट बॉल टाकला. तर दुसऱ्या चेंडूवर नबी झेलबाद झाला. त्यानंतर रहमानुल्ला मैदानात आला. त्याने सलग ३ चेंडूंवर षटकार लगावले. तर सहावा चेंडू केशव महाराजने वाईड टाकला. यासह अखेरच्या चेंडूवर ५ धावांची गरज असताना रहमानुल्ला मोठा फटका खेळताना झेलबाद झाला. यासह अफगाणिस्तानने सामना गमावला. दक्षिण आफ्रिकेने सामन्यात विजय मिळवला असला तरी अफगाणिस्तानच्या कामगिरीने मात्र सर्वांची मने जिंकली आहेत.

## १७ ते १९ फेब्रुवारीदरम्यान मुंबई क्लायमेट वीकचे आयोजन

मुंबई, दि. ११ प्रतिनिधी

१७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मुंबईत पहिला 'मुंबई क्लायमेट वीक' (MCW) आयोजित केला जाणार असून, ग्लोबल साउथमधील मोठ्या प्रमाणावर नागरिकांच्या पुढाकारातून राबवला जाणारा हा पहिलाच हवामान कृती मंच ठरणार आहे. या उपक्रमात जागतिक नेते, धोरणकर्ते, उद्योगजगत, नागरिक संघटना आणि हवामान क्षेत्रातील नवोन्मेषक सहभागी होणार आहेत. या तीन दिवसांत उपराष्ट्रीय हवामान कृती, भविष्यकालीन शहरे आणि हवामान वित्तपुरवठा यांसारख्या विषयांवर विशेष अधिवेशने होणार आहेत. विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि वरिष्ठ नेते यात सहभागी होऊन नेट-झिरो आणि हवामान-प्रतिरोधक विकासात राज्ये व शहरांची भूमिका अधोरेखित करतील. १०० हून अधिक संस्थांमधील ४०० पेक्षा जास्त वक्ते या परिषदेत सहभागी होण्याची अपेक्षा आहे. बिल गेट्स, हिलरी क्लिंटन, केंद्रीय मंत्री, आंतरराष्ट्रीय सरकारी प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील नेते, समाजसेवक, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर तसेच भारतीय अवकाश क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींचाही सहभाग अपेक्षित आहे. ३० हून अधिक देशांचे प्रतिनिधीमंडळ उपस्थित राहणार आहे.

'प्रोजेक्ट मुंबई' या स्वयंसेवी संस्थेतर्फे महाराष्ट्र शासन, पर्यावरण व हवामान बदल विभाग, एमएमआरडीए आणि बृहन्मुंबई महापालिका यांच्या सहकार्याने या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतासह इतर ग्लोबल साउथ शहरांमध्ये विस्तारता येतील अशा हवामान उपाययोजनांसाठी मुंबईला 'लिव्हिंग टेस्ट-बेड' म्हणून सादर करण्याचा उद्देश आहे.

"मुंबई ही जिद्द आणि कल्पकतेची नगरी आहे. 'मुंबई क्लायमेट वीक'मध्ये हीच भावना हवामान संकटासमोर ठोस कृतीत उतरवली जाईल. मंत्र्यांपासून उद्योग नेते आणि तज्ज्ञांपर्यंत सर्वजण विद्यार्थी, अग्रभागी काम करणारे कर्मचारी आणि स्वयंसेवकांसोबत एकाच व्यासपीठावर येतील. ग्लोबल साउथमधील हवामान नेतृत्व कसे असावे, याचा संदेश मुंबई देईल," असे प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मुंबई क्लायमेट वीक हा शहरापासून जागतिक पातळीपर्यंत हवामान कृतीत भारताच्या नेतृत्वाचा दृढ संकल्प दर्शवतो. भारत आणि जगभरातील नेत्यांचे मुंबईत स्वागत करताना आम्ही स्पष्ट संदेश देत आहोत की महाराष्ट्र स्वच्छ, सुरक्षित आणि अधिक सक्षम भविष्यासाठी सर्व भागीदारांसोबत काम करण्यास तयार आहे."

## आम्ही एनडीएमध्ये आहोत आणि राहणार- तटकरे

नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था

आज सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. दरम्यान राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांनी या भेटीबद्दल, तसेच दोन्ही राष्ट्रवादी गटाच्या विलीनीकरणाबाबत महत्त्वाचे भाष्य केले आहे. आज राजकीय चर्चेचा विषय नव्हताच, आज फक्त दादांच्या दुर्दैवी अकाली निधनानंतर जी जबाबदारी धिरोदत्तपणे वहिनींनी सांभाळली आहे, त्याबद्दलच्याच संवेदना व्यक्त करण्यात आल्या असे सुनील तटकरे म्हणाले. तटकरे म्हणाले की, आम्ही एनडीएमध्ये आहोत. दादा असतानाच मी वारंवार भूमिका स्पष्ट केली की, आम्ही दादांच्या नेतृत्वाखाली सामूहिकरित्या एनडीए सोबत जाण्याचा निर्णय घेतला. तो कालही होता, आजही आहे आणि उद्या भविष्यामध्येही राहिल. त्यामुळे एनडीएमध्ये येण्याबाबतची स्पष्टता कोणीतरी करणे आवश्यक आहे, असे तटकरे म्हणाले.

कृषी उत्पन्न बाजार समिती, कारंजा लाड जि. वाशिम
कारंजा – मानोरा विधानसभा मतदार संघाच्या
मा.आ. श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
श्रीमती सईताई डहाके
आमदार कारंजा-मानोरा मतदार संघ तथा सभापती कृ.उ.बा.स. कारंजा लाड
• शासनाचे स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत राज्यातील २-या क्रमांकाची उत्कृष्ट सेवा देणारी बाजार समिती.
• शेतमाल विक्री करण्या शेतकरी बंधुसाठी ५ रु.मध्ये जेवणाची व्यवस्था
• शेतमाल तारण योजना • इलेक्ट्रॉनिक्स काट्यानेच तंतोतंत मोजमाप • तातडीने पेमेंट
• आर.ओ. थंड पाण्याची व्यवस्था
• शेतकऱ्यांसाठी ७/१२, फेरफार, कोतवाल बुक, हक्क नोंदणी काढण्याची (अद्ययत्र) मशिनद्वारे सुविधा.
• एस.एम.एस.द्वारे बाजारभाव • राष्ट्रीय कृषी बाजार (ई–नाम) योजना
निलेश नरेंद्र भाकरे — सचिव
प्रकाश वासुदेव लिंगाटे — उपसभापती
संचालक मंडळ : नितीन श्रीराम नेमाने, विरेंद्र विठ्ठलराव चारथळ, श्रीमती सुनंदाबाई देवीदास गुंजाटे, दिनेश सुभाषराव राठोड, साहेबराव जंगलाजी तुमसरे, हसन कालू चौधरी, बाबुराव मधुकर चौधरी, प्रविण मनोहर उर्फ भिमराव वानखडे, सौ. कावेरी मारोती पारे, रविंद्र मधुकर घुले, ब्रिजमोहन श्यामसुंदर मालपाणी, विजय नामदेवराव हिवाळे, देवेंद्र बाबाराव राऊत, अरुण सुधाकर वानखडे, बालचंद धनसिंग जाधव, अनिल गुलाबराव पाकधने
सर्व कर्मचारीवृंद कृषी उत्पन्न बाजार समिती, कारंजा, जि. वाशिम

## शासकीय धान्य गोदामाची सुरक्षा वाऱ्यावर



■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज , दि. ११ :
देसाईगंज-आरमोरी या महामार्गालगत विश्रामगृहासमोर शासकीय धान्य साठवण्यासाठी व सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून रेशन दुकानदारांना धान्य वितरण करण्यासाठी असलेल्या शासकीय गोदाम सभोवताल संरक्षण भिंत बांधण्यात आली आहे. मात्र, एका बाजूने भिंत बांधकाम अर्धवट असल्याने धान्य चोरीला जाऊन शासकीय धान्य गोदामाची सुरक्षा धोक्यात आली आहे.

देसाईगंज तालुक्यात २० ग्रामपंचायती अंतर्गत ३९ गावे असून प्रत्येक गावाला शासकीय रेशन दुकानांच्या माध्यमातून रेशनच्या धान्याचा पुरवठा करण्यात येतो. खरेदी केलेल्या धानाची स्थानिक राईसमिलर्स मार्फत भरडाई करून सिएमआर तांदूळ शासकीय गोदामात जमा करण्यात येतो. शिधापत्रिका धारकांना दिले जाणारे धान्य याच गोदामात साठवून सार्वजनिक वितरणाकरीता उपलब्ध करून दिले जाते.

सदरच्या गोदामात शासनाच्या कोट्यवधी रुपये किंमतीचे रेशनचे धान्य जमा असल्याने गोदामाची सुरक्षा करणे तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाची जबाबदारी आहे. असे असतांना सभोवताल संरक्षण भिंतीचे बांधकाम करून एका बाजूने बांधकाम अर्धवट ठेवण्यामागचे कारण मात्र गुलदस्त्यात आहे. पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर गोदामाची सुरक्षा वाऱ्यावर सोडून दिल्याचा आरोप केला जात आहे.

देसाईगंज शहराची लोकसंख्या ४० हजाराच्या घरात असून रेल्वेमुळे शहर दोन भागात विभागले गेले आहे. शहरात भुरट्या चोऱ्या, दारू तस्करी, प्रतिबंधीत सुगंधित तंबाखू तस्करी नित्याचीच बाब झाली असून शासकीय गोदामाची संरक्षण भिंत एका बाजूने खुली असल्याने चोरांसह तस्करांना लपण्यासाठी आयतेच रान मोकळे मिळत आहे. अलिकडे मजबूत शटर तोडून देखील चोरांनी चोऱ्या केल्याचे वास्तव असतांना पुरवठा विभागातील अधिकारी मात्र झोपेचं सोंग घेऊन आहेत.

दरम्यान शासकीय गोदामाचीच सुरक्षा वाऱ्यावर असल्यामुळे अन्न धान्याच्या पुरवठ्यात अनियमितता नसेल काय?असा प्रश्न उपस्थित केल्या जाऊ लागला आहे. जिल्हाधिकारी यांनी तात्काळ या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन खुल्या संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याचे आदेश पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांना देण्याची मागणी करण्यात येत आहे.

